TEXT PROBLEM
WITHIN THE
BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192548
UNIVERSAL LIBRARY

# अंतर

राजरत्न वा० वि० जोशी

उषा प्रकाशन, औंध

सप्टेंबर १९४१

प्रकाशक : वसन्त श्री० सातवळेकर, बी. ए
उषाप्रकाशन, औन्ध ( सातारा )

किंमत दीड रुपया

मुद्रक : व० श्री० सातवळेकर, बी. ए.
भारतमुद्रणालय, औन्ध ( सातारा)

# राजरत्न वा० वि० जोशी यांचीं पुस्तकें.

## कादंबऱ्या.

१. कठीण कसोटी ( मिश्रविवाहाबद्दल )

२. जन्माचा बंदिवास ( घटस्फोटाबद्दल )

३. पराधीन ( स्त्रियांच्या आर्थिक हक्काबद्दल )

४. ओघळलेले मोती ( अनौरस संतति–पुनर्विवाह )

५. न सुटलेलें कोडें ( लैंगिक प्रश्नाबद्दल )

६. अंतर ( विजोड्याबद्दल )

७. सूड ( बहुपत्नीकत्वाबद्दल ) छापत आहे.

८. दुराचारी ( देशभक्तांचें विविधदर्शन ) ,,

९. माया ( वात्सल्याबद्दल ) तयारींत

## विनोदी.

१०. रेशमी चिमटे

११. नरमगरम

## संसार–विषयक निबंध.

१२. विवाहितांचें नंदनवन

१३. अविवाहितांचे प्रश्न

१४. सुखी संसार छापत आहे

१५. बदसूर जोडपीं ,,

## सुधारणा-विषयक.

१६. स्त्रियांचे हक्क व सुधारणा

१७. Hindu Women's Property Rights

१८. Legal Disabilities of Hindu Women

## नाट्य-विषयक.

१९. नाट्य-निबंध

## नाटक.

गीत-सावधान

# अं त र

# १

"अन् हे काय हे?" इंदिराबाईच्या तोंडांतून एकदम उद्गार बाहेर पडले. तिने ओठ चावला, पण तिला हे बोलल्याबद्दल पश्चात्ताप मात्र झाला नव्हता.

"कोण? ... नाही! लहान मूल म्हणून ..."

बाजीराव अंथरुणावरून उठून उभे राहिले आणि इंदिराबाईच्या कानाशी येऊन बोलले. हातांनी इंदिराबाईस गप्प बसण्यास सांगितलें व तिचा हात धरला.

पण इंदिराबाई त्वेषाने एवढी बेफाम झाली होती की, तिला बाजीरावांची या वेळी जणू भीतीच वाटेनाशी झाली होती. तिने बाजीरावांच्या हातास हिसडा दिला आणि ती म्हणाली—

"शी:! कांही बोलायलाही वाटत नाही? माझ्या बरोबरीची-ती! माझ्या पाठराखणी म्हणून आलेली, अन् ती झोपेंत असतांना खुशाल तुम्ही तिचे मुके घेतलेत!"

" पण ती मला मुलीसारखीच नाही का? तिच्यापेक्षा माझ्या मुली मोठ्या असत्या. तेव्हा माझ्या मनांत तिच्याबद्दल वाईट विचार येणं शक्य आहे का ? "

" तुमच्या मुलाचे मुके घेतांना मी कधी पाहिलं नाही तें ? "

" माझा मुलगा इतका सुरेख कुठे आहे ? "

बाजीराव तेथून तोंड चुकवून निघून गेले. त्यांचा उतरलेला चेहराच त्यांच्या ढोंगीपणाची साक्ष देत होता.

इंदिरेचें डोकें संताप, पश्चात्ताप आणि शिसारी यांनी सुन्न झालें. ती खाली अंथरुणावर बसली. " हिच्यापेक्षा माझ्या मुली मोठ्या असत्या ! " हें बाजीरावांचें वाक्य तिच्या कानांत घुमत होतें आणि तीहि गोष्ट कांही खोटी नव्हती, असें तिचे मन तिला बजावीत होतें. " तर मग माझी दशा काय? मी तरी त्यांच्या मुलीपेक्षाहि वयानं लहान नाही का? अन् माझे वडील तर यांच्यापेक्षा वयानं पांच वर्षांनी लहान! शी: !! मग मी जो हा संसार करीत आहें तो ! ! मुलीचा प्रत्यक्ष बापाशीं संसार ! ! ! आणि तशांत असल्या या वृत्तीच्या पुरुषाशी ! " असें तिच्या मनांत आलें. ती बिछान्यावर पडून उशींत तोंड खुपसून कळकळून रडूं लागली.

बाजीराव जहागिरदारांची इंदिरा ही तिसरी बायको. त्या दोघांच्या वयांत तीस–पसतीस वर्षांचें अंतर. बाजीरावांचें दुसरें कुटुंब निवर्तलें, त्या वेळीं त्यांचें वय पन्नाशीच्या आंतबाहेर होतें. त्यांची शरीरप्रकृति चांगली, शरिराने ते देखणे आणि धिप्पाड, यामुळे ते दहा वर्षांनी कमीच दिसत. ते आपल्याकडून स्वत:चें वय इंदिरेच्या ध्यानांत न येण्यासाठी आटोकाट खबरदारी घेत. मिशा आणि डोक्यावरचे सर्व केस यांना वरचेवर इतक्या शिताफीने ते कलप लावीत की, पुष्कळ दिवस हे

केसांना कलप लावतात, ही गोष्ट इंदिरेच्या लक्ष्यांत आली नव्हती. कलपाच्या आच्छादनांतून डोकावणारे पांढरे बुंधे पाहून इंदिरेला धक्का बसला नव्हता, असें थोडेंच ? पण आज तिच्या मनाला जो धक्का बसला,त्यामुळे ती विव्हळ झाली. बाजीरावांच्या संभावितपणाखाली रसरसत असलेली नीच वृत्ति व प्रौढपणाखाली झाकून ठेवलेली छचोर वृत्ति पाहून, तिला आपला सर्वथैव घात झाला, असें वाटलें आणि तिचें रडें आवरेना. बाजरीरावांचें हें तिसरें लग्न होतें, त्यामुळे हा उष्टा संसार पत्करतांना तिला जेवढी शिसारी आली नसेल, तितकी बाजीरावांची ती नीच वृत्ति पाहून वाटूं लागली. वयांत तिपटीचें अंतर असलेल्या तिजवराशीं संसार करतांना इंदिरेच्या भोळ्या आणि भाबड्या मनाला जितका धक्का बसला नसेल, तितका त्यांच्या आजच्या नीच वागणुकीमुळे बसला.

इंदिराबाईचें लग्नांत वय फारतर सोळासतरा वर्षांचें असेल. शरिराने ती धिप्पाड आणि उफाड्याची, आणि वडिलांच्या गरिबीमुळे भागवितां न येणाऱ्या हुंड्याच्या अडचणीमुळे तिचा बाजीरावांशीं विवाह झाला. वडिलांवर आपल्या लग्नाबद्दलची आलेली आपत्ति आपण स्वत: भोगून नाहीशी करावयाची, अशा निस्सीम पतिव्रताधर्माचा निश्चय करूनच तिने बाजीरावांच्या घरांत पाऊल टाकलें होतें. तिच्या आणि बाजीरावांच्या वयांत अंतर फार होतें. त्या दोघांच्या आवडीनिवडींतही अंतर पुष्कळ होतें. इंदिरेला बाजीराव 'अहो, जाहो !' म्हणून संबोधीत; पण त्या कृत्रिम आणि शाब्दिक संबोधनांनी त्यांच्यांतील अंतर कसें भरून येणार होतें ! तरी पण इंदिरा आपल्या निश्चयाला चिकटून होती. वेळोवेळी तिला लहानमोठे धक्के बसत असूनही परिस्थितीशी मिळतें घेण्याची ती आपल्याकडून शिकस्त करीत होती. तिला रोजच्या व्यवहारांत पदोपदीं हें अंतर जाणवत असे. नातेवाईक मंडळी जी तिच्या-

पेक्षाहि वयाने मोठी असत, तीहि कोणी तिला काकी, तर कोणी मामी, कोणी सासुबाई, तर कोणी आजीबाई या नांवाने संबोधीत आणि तिच्या पायां पडत. या दरेक वेळीं तिच्या मनांत चर्रर होई. शेजारी-पाजारी आणि नातेवाईक बाजीरावांच्या वयाची चर्चा करीत, त्यांना म्हातारे म्हणत, त्या वेळीं तिचें मन हीनत्वाच्या ओशाळ गर्तीने हवाल-दिल होई. बाजीरावांच्या संपत्तीने अगर ऐषारामाने दिपून जाऊन, वयांतील अंतर विसरून जाणें शक्य नव्हतें. श्रीमंतीबद्दल इंदिरेला कधीच आदर वाटला नव्हता. पैशाच्या अभावीं माणसांचे काय काय हाल होतात, हें तिने प्रत्यक्ष माहेरीं अनुभवलें होतें आणि पैशाच्या अभावीं काय काय आपत्ति कायमच्या सोसाव्या लागतात, त्या तीं अनुभवीत होती. एखाद्या जिनसेने आपल्याला दगा द्यावा, म्हणजे त्या जिनसेबद्दल जसा आपल्याला तिरस्कार वाटूं लागतो, तसा तिला त्या श्रीमंतीबद्दल तिरस्कार वाटत असे.

भोवतालच्या ऐषारामांत, दागदागिन्यांत, कपड्यालत्त्यांत तिच्या हौसेचें, इच्छेचें अगर स्वार्थत्यागाचें कशाचेंच प्रतिबिंब दिसत नव्हतें. बाजीरावांचे बसण्याचे घोडे बदलले, तरी त्यांचा लगाम आणि खोगीर हीं जशीं कायम होतीं, तसेंच पहिल्या बायकांचे वापरण्याचे हिऱ्या-मोत्यांचे दागिने आणि जरीचे शेलेशालू दोन सवतींच्या मरणानंतर शिल्लक राहिलेले होते. खुद्द जिनसेएवढीच पहिल्या बायकांची किंमत! उपभोग्य वस्तु शृंगारून सुंदर बनविण्यासाठी कपडे आणि दागिने बायकांना घालावे लागतात एवढेंच. दोन्ही सवतींच्या मोठाल्या तसबिरी बाजीरावांच्या निजण्याच्या खोलींत टांगलेल्या असत. तीं निर्जीव चित्रेंहि इंदिरेच्या भातुकलीच्या खेळाकडे पाहून तिरस्काराने हसत आहेत, असें तिला वाटे! उष्टें खाण्यांत मानखंडना खरीच, पण ज्यांचा

उष्टीं ताटें चाटावयाचीं, त्याच सवती रागानें उभ्या राहून, आपली विटंबना पहात आहेत, या जाणिवेनें ती आंतून नेहमी व्याकूळ झालेली असे. अगदीं एकान्तांत असतांनाहि तिला निवान्तपणा वाटत नसे. सवतींचीं चित्रें जिवंत होऊन आपल्या सर्व व्यापारांकडे न्याहाळून पहात आहेत; इतकेंच नव्हे तर खुद्द बाजीरावांच्या मनांत घोळणारीं पूर्वीच्या दोन्ही संसारांचीं स्मृतिचित्रें तुलनेनें आपणांला हिणकस ठरवीत आहेत, असें तिला वाटे. स्त्रीपेक्षा पुरुष साधारणत: वयानें, शरिरानें आणि शक्तीनें अधिक सामर्थ्यवान् असला पाहिजे खरा; पण स्त्रीच्या वयाच्या, शरिराच्या, शक्तीच्या मानानें तो किंचित् जास्त सामर्थ्यवान् असावा, एवढाच त्याचा अर्थ ! दोघांच्या वयांत, शरिरांत आणि शक्तींत जमीनअस्मान अंतर असेल, तर तीं दोघें समान धर्माच्या अधिकारानें एकत्र येणार कशीं ? विश्वासांनी, मनांनी आणि आकांक्षांनी समरस होणार तरी कशीं ? बरोबरीच्या सोनचाफ्याच्या झाडाचा आसरा घेऊन, त्याला विळखे मारीत उंच वाढण्याची स्पर्धा करणारी मधुमालतीची वेल प्रकाशपाण्याचा सारखा हिस्सा मिळवून झाडाबरोबर स्वत: चांगली पोसली जाते, ऊनपाऊसवाऱ्याच्या माऱ्यापासून स्वत:चा व झाडाचा बचाव करते आणि इतर वेळीं स्वत:सह झाडाला शोभा आणते;पण एखाद्या जुनाट कडुलिंबाच्या वृक्षावर चढवलेली चमेलीची वेल त्याच्या अजस्र खांद्याफांद्यांनी पकडून धरलेली असली, तरी तिच्या विळख्याच्या आवाक्यांत तो वृक्ष कधीच येत नसल्यानें ती भीतीनें अलगअलगच राहते, केविलवाणी दिसते, वृक्षाची आणि स्वत:ची शोभा घालविते, सावटांत वाढेनाशी होते आणि पाऊसवाऱ्याच्या माऱ्यांनी एकदम निसटून पडते. वृक्षाच्या पोखरलेल्या फांद्या तुटूं लागल्या, तर त्यांना जागच्या जागीं घट्ट धरून ठेवण्याचें तिच्यांत सामर्थ्यहि नसतें. नवराबायकोंची स्थितीहि याचप्रमाणे

असते. समान वयाचीं, समान शक्तीचीं, समान शरिराची जोडपीं एकमेकांच्या संगतींत पोसलीं जातात, एकमेकांस अभिन्नत्वाने जन्मभर बिलगून राहतात, बाहेरच्या आपत्ति अगर आकर्षण यांपासून एकमेकांस बचावतात आणि स्वतः सुरक्षित राहूं शकतात. याच्या उलट वृद्ध पुरुषाची पोरवय बायको मनोभंगाने खुरटून जाते, शरीरशक्तीच्या भारांनीं मोडपून जाते, तिच्या वाढत्या आकांक्षांना नवऱ्याच्या वठत जाणाऱ्या विचारांशीं बिलगून राहतां येत नाही. नवऱ्याची संगत हीच तिला आपत्ति वाटूं लागते आणि खुद्द आपत्तीच्या वेळी तिला त्याचा आसरा हक्काने घ्यावासा वाटत नाही, किंवा विवाहबाह्य आकर्षणापासून ती नवऱ्याला अगर स्वतःच्या निराश मनालाहि थोपवून धरूं शकत नाही.

थोड्या वेळाने नंदा जागी झाली, इंदिरेला रडतांना पाहून चपापली, आणि जागेवर उठून बसली. नंदा ही इंदिरेपेक्षा एकदोन वर्षांनींच लहान. तिला इंदिरेचें दुर्दैव कळण्याएवढें समजूं लागलें होतें. बाजीरावांशीं इंदिरेचें लग्न ठरल्याचें समजलें, त्या दिवशी इंदिरा अशीच कळकळून रडली होती. कन्यादानाच्या वेळेला इंदिरेचे वडील अंगावरच्या उपरण्याने डोळे पुशीत होते. इंदिरेची आई कोठीच्या खोलीत जाऊन कोपऱ्यांत रडत होती; पण खुद्द इंदिरेने हिम्मत धरून, 'मी खरंच सुखी आहें, मला स्थळ माझ्या मनासारखं मिळालं,' असें सांगून दोघांचीहि समजूत घातली होती. त्या दिवसापासून ती अगदी हसून-खेळून आनंदांत वागत होती; पण आज तिला एकदम रडतांना पाहून, नंदा घाबरून गेली. 'इंदिरेने हा नुसता लपंडाव चालविला होता तर!' असें नंदाला वाटलें. ती हळूच इंदिरेजवळ गेली आणि हातांनी कुरवाळीत म्हणाली,

"ताई! असं काय बरं करतेस? तूंच नाही का मामामामींना

समजावलंस? अन् आता तूंच अशी रडूं लागलीस, तर कोण तुझं समाधान करणार? हें बघ, तुला आम्ही सर्व जण शहाणी शहाणी म्हणतों, आणखीन् तूं आता हें वेड्यासारखं काय करतेस? नशिबाला आलं तें भोगायला नको का?"

"नंदा! नशिबाला मी दोष देत नाहीं. नशिबानं माझ्यासाठी मांडून ठेवलेलीं सगळीं संकटं मी निमूटपणं सहन नाही का केलीं? पण माणसांच्या हातच्या गोष्टीसुद्धा मी कां सहन करूं? मला तरी मेलीला कांही मन आहे कीं नाही?"

"पण परिस्थितीप्रमाणं मन आता मारलं पाहिजे, नाही का?"

"अग, मन मारायचं, मन मारायचं, याला तरी कांही सीमा असते. कुठल्यातरी एका बाबतीपुरतं मन मारतां येतं. सर्वच बाजूंनी मनाला भाजीत मुटलं, म्हणजे मग असं होतं—"

इंदिरा उशींत जास्त डोकें खुपसून अधिकच रडूं लागली.

"ताई! मला सांग, काय झालं तें मला सांग! तुझा मुलगा फार चांगला आहे ... ... ...."

"माझा मुलगा! कोण!" इंदिरा तटकन् उठून नंदाला म्हणाली.

"अग, विश्राम तुझा मुलगा नाही का?"

"विश्राम त्यांचा मुलगा आहे."

"अग, पण तूं त्याची आई नाहीस का?"

"त्याच्या बापाची मी एक ठेवलेली. ." इंदिरेने ओठ चावला. डोळे पुसण्याच्या निमित्ताने तिने पदरांत तोंड झाकलें.

"म्हणजेच तूं सावत्र आई त्याची!"

" मी विश्रामची आई नाहीं. आईपेक्षा मुलगा दोन वर्षांनी मोठा असतो का कधी ? "

" विश्राम चांगले आहेत हो ? "

" मी नाही कुठं म्हणतें ? तुला वाटलं मी सावत्रपणा करतें. असंच ना ? "

" छे ! मला कशाला असं वाटेल ? पण ताई, सांग ना कशामुळं रडूं आलं होतं ? "

" खरं सांगूं ? तूंच म्हणतेस ना की मी लहान मुलाप्रमाणं एक-सारखी हसत असतें म्हणून ? लहान मुलं पुष्कळ हसलीं, म्हणजे नाही का उगीचच रडत ? त्यांतलंच हें ! "

" पण लहान मुलं कांही अशी चोरून तोंड लपवून नाही रडत ! माझ्यापासून चोरून ठेवूं नकोस ! "

" अग, मला सगळ्यांचीच चोरी ! असंच आहे माझं नशीब ! रागलोभ, आनंदखेद, उघड दाखविण्याची चोरी !! तोंडावाटे शब्द काढण्याचीसुद्धा चोरी !!! "

" पण इतकं माझ्यापासूनसुद्धा लपवून ठेवण्यासारखं काय घडलं ? तुला गळ्याची शपथ आहे माझ्या, न सांगशील तर ! " नंदाने तिचे दोन्ही हात आपल्या हातांत घेतले. " तूं खरं सांगितल्याशिवाय मी हात सोडणार नाहीं. "

इतक्यांत गडी वर आला, अन् नंदाकडे पहात म्हणाला, " धाकटे साहेब चहासाठी वाट पाहताहेत. "

" आलेंच ! " असें म्हणून नंदा जागेवरून उठली व घाईघाईनें ओचापदर सावरून ती मोरीवर जाऊन तोंड धुवून आली. आरशांत

पाहून पुढून हात फिरवून. तिने केस चापून बसविले आणि टॉवेलने हात पुशीत इंदिरेला म्हटलें, "ताई, तुला चहा घ्यायचा असेल ना ? चल की, आपण तिघं जणं बरोबरच चहा घेऊं. चल की ! नाही कां म्हणतेस ?"

"मला आज चहा नको आहे. अन् मी तुमच्याबरोबर चहा घेतलेला आवडायचाहि नाही. तूं आपली एकटी जा. विश्राम खोळंबले असतील तुझ्यासाठी; लवकर जा ! अन् ब्लाऊजची कॉलर—ही अशी नीट...." इंदिरा जागेवरून उठली आणि नंदाच्या ब्लाऊजची कॉलर तिनं चापूनचोपून नीट बसविली.

"इश्श ! तूं तरी फारच माझी चेष्टा चालविली आहेस की ? जशी कांही मला दाखवायलाच न्यायची आहे !"

"मी कशाला कुणाची चेष्टा करूं ? मी का आता पोर आहें ?"

"अशी काय ग, तूं मोठ्ठी साठ वर्षांची आजीबाई झाली आहेस ? माझ्यापेक्षा साऱ्या दोन वर्षांनी मोठी !!"

"लग्नाच्या अगोदर मी लहान होतें. आता माझं वय ना ? तिपटीनं वाढलं एकदम. पंचेचाळिसावं वर्ष म्हणेनास ! तेवढाच अदमास येतो विश्रामची आई शोभायला. नाही का ? अन् तसंच मला वागलं पाहिजे, नाही का ?"

"पण विश्रामची आई त्याच्याबरोबर चहा प्यायला बसायला न्याली नसती."

"अन् तिला कुणाची भीतीहि पण वाटली नसती, म्हणून ती खुश्शाल बसली असती !"

"तुला ग, कुणाची भीत्ति ?"

" माझ्या परिस्थितीची, माझ्या मनाची म्हण, जनाची म्हण, सगळ्यांचीच मला भीति ! "

" नाहीतर बाजीरावांना आवडायचं नाही, असं थोडंच? ते जर खुश्शाल माझ्याबरोबर चहा घ्यायला अगदी हौसेनं बसतात, तर तू आमच्याबरोबर चहा घ्यायला बसलीस, तर ते कांही कांही म्हणणार नाहीत. चलेनास का ! "

" उगीच मला आग्रह करूं नकोस. जा, तो केव्हाचा खोळंबला असेल. मला आज चहा नको आहे. वाटलाच घ्यावासा, तर मी लागेल तेव्हा करून घेईन. "

नंदा निघून गेली. " बरं बाई, तुझी मर्जी ! " असे ती जाताना पुटपुटली.

" होय. माझी म्हणजे माझ्या मालकांची मर्जी ! " असें पुटपुटत इंदिरा जिना उतरून खाली आली. इंदिरेने आज चहा घेतला नव्हता. चहाचें तयार आहे, हें बाजीरावांना सांगण्यासाठी जातांना तिचे लक्ष्य नंदाच्या खोलीकडे गेलें आणि तिथे तिने तो प्रकार पाहिला.

माजघरांत विश्राम नंदाची वाट पहात बसला होता. बाजीराव नाहीत, असें पाहून नंदा म्हणाली, " ताईला चहा घ्यायचा आहे का, विचारतें. तिला शंका वाटते. " ती आंत जाऊन बाहेर आली. ' येते आहे, ' असें ती पुटपुटली. नंदा तीन कप तयार करीत आहे, तों बाजी-राव आले आणि टेबलाजवळ बसले. नंदाने ब्राह्मणाला हाक मारली आणि चौथा कप आणण्यास सांगितलें.

" आणखीन् कुणासाठी? तीन तर कप आहेत ! "

" ताईसाठी. " नंदाने उत्तर दिलें.

" त्यांचा चहा झाला आहे ! अरे, नको आणूस चौथा कप. "

बाजीराव म्हणाले.

नंदाने हिरमुसलें होऊन विश्रामकडे पाहिलें; पण त्याने लाजेने मान खाली घातली. ती वर केलीच नाही.

"काय, तुम्ही आज कांही बोलत नाही?" बाजीरावांनी नंदाला बराच वेळ गप्प बसलेली पाहून विचारलें.

"ताई म्हणाली मला की, 'तूं फार बोलतेस.'"

"अस्सं!" बाजीरावांच्या कपाळाला आठ्या पडल्या, त्यांचा चेहरा एकदम लाल झाला; पण मोठ्या शिताफीने त्यांनी तें सर्व जागच्या जागीं दाबून टाकलें आणि थंडपणाने ते म्हणाले, "नंदाताई! तुम्ही शिकलेल्या, हे आमचे विश्रामहि शिकलेले, म्हणून तुमच्या गोष्टी व्हायच्याच. तुम्ही कुणाचं ऐकूं नका. खुशाल बोलत जा!"

नंदा कांहीच बोलली नाही, तिने वर मान करूनहि पाहिलें नाही. बाजीराव तेथून निघून गेले.

"गाडी जोडायला सांगितली आहे. मी मळयांत जाऊन येणार आहे. याल का बरोबर? आईना विचारा येतां का?" विश्राम हलक्या आवाजांत नंदाला म्हणाला.

"ताईनं आज मुळीच चहा घेतला नाही. तिच्याबरोबर मी चहा घेतें, अन् मग कपडे बदलून येते. ताईला विचारीन. म्हणत असाल तर. ती कशाला 'नाही' म्हणेल?"

"म्हणतीलहि कदाचित् 'नाही' म्हणून!"

"पुरुषांच्या आणि बायकांच्या स्वभावांत हेंच अंतर असतं."

विश्राम ओशाळला. नंदा माफी मागण्याच्या स्वरांत म्हणाली, "ताईचा चहा झाला की, मी येतेंच अं!"

# २

नंदा आणि विश्राम एकटीं फिरायला गेलीं असतांनाहि आज एकमेकांशीं बोलत नव्हतीं.

विश्राम आणि नंदा हीं दोघें गेले सातआठ दिवस एकटीच्या एकटीं फिरायला जात, मनमोकळेपणानें बोलत बसत असत. नंदा या वेळीं इंग्रजी सहाव्या इयत्तेंत शिकत होती आणि विश्राम बी. ए. च्या वर्गांत होता, तेव्हां शिक्षणाच्या दृष्टीनें त्या दोघांच्यांत थोडें अंतर होतें. परंतु नंदा शिक्षणांत जरी मागासलेली असली, तरी ती वयानें विश्रामपेक्षा पांचच वर्षांनी लहान आणि त्यांत पोरीची जात. तिला जगांतील व्यवहार विश्रामपेक्षा जास्त कळत होता. एका दृष्टीनें ती प्रौढपणांत विश्रामच्या बरोबरीचीच होती. परीक्षा सोडून दिल्या, तर नंदाचें एकंदर मराठी वाचन बरेंच विस्तृत होतें. नंदाचे वडील खेडेगावांत राहणारे, शाळेची सोय नव्हती, एवढ्यासाठीं नंदाचीं कांहीं वर्षें घरीं बसून वाया गेलीं; पण तेवढ्या अवधींत तिनें त्यांच्या गावांतल्या वाचनालयांतलीं

सर्व मराठी पुस्तकें वाचून काढली. तिला जो वाचनाचा हा नाद लागला, तो तिने शहरांत आल्यावरहि कायम ठेवला होता. यामुळे तिची बुद्धि प्रगल्भ झाली होती. तिला भोवतालच्या जगांतील घडामोडीचें आकलन चांगलें झालें होतें. विश्राम हा बुद्धिमान् खरा, परंतु परीक्षांत पहिला नंबर पटकावण्याच्या पाठीमागे लागलेला. अभ्यासक्रमांत नेमलेल्या पुस्तकांची अनेक पारायणे करण्यापायी त्याला अवांतर वाचण्याला फुरसत मिळाली नव्हती. ज्ञानाच्या दृष्टीने नंदा विश्रामच्या बरोबरीने प्रौढ झाली होती. त्यांचे स्वभाव आपोआपच एकमेकांशीं जमले आणि तीं दोघे जण जणू पूर्वींचीं पुष्कळ वर्षांचीं ओळखीचीं असावींत, अशी ? त्यांची अगदी बरोबरीच्या नात्याने आणि मनमोकळेपणाने बोलणी होत; पण आज किती वेळ झाला, तरी तीं एकमेकांशीं बोलत नव्हती.

“ नंदा, तुला एक विचारूं का ? ”

“ काय ? ”

“ खरं सांगशील ना ? ”

“ आम्ही गरीब असलो, तरी सरळ माणसं आहोत. आम्हांला आंत एक, बाहेर एक, असं वागतांच येत नाही. विचारा ना, मी काय असेल तें सांगेन. ”

“ माझ्याबद्दल तुम्हां मंडळींना फारसा आपलेपणा नसेल वाटत. नाही ? ”

“ तो कां म्हणून ? ”

“ कसा झालो तरी मी तुमच्या ताईचा सावत्र मुलगा. ”

" नाही, मी दुसऱ्याच्या सुखाच्या आड येतों. "

" तें कशावरून ? "

" मी सकाळीं चहासाठीं तुला बोलवायला आलों होतों, तर आईसाहेब डोळ्यांतून पाणी काढीत होत्या, अन् तूं त्यांची समजूत करीत होतीस. म्हणून विचारतों. पूर्वीच्या आईसाहेब होत्या ना, त्या तर मला पाह्यलं न पाह्यलं की संतापून जात आणि आमची दृष्टादृष्ट नको, म्हणून वडिलांनी मला बोर्डिंगांतच नेऊन ठेवलं. आई वारली की बापाच्या प्रेमांत असं अंतर पडतं. साहजिक आहे. पण मला एवढंच वाईट वाटतं की, माझ्यापासून दुसऱ्याला क्लेश व्हावेत. "

" अस्सं! आमची ताई फार सरळ स्वभावाची आहे. ती कुण्णाचा कुण्णाचा कधीं हेवादावा करायची नाही. तुमच्याबद्दल तिनं कधी अवाक्षरहि उच्चारलं नाही. तुमचा उगीचच गैरसमज झाला आहे. "

" मग आईसाहेबांच्या डोळ्यांतून पाणी कां येत होतं ? समजा, त्यांना इथं कांहीं त्रास होत असला, तर आपण जायच्या अगोदर त्याचा बंदोबस्त करूं. "

" तिला उगीच वाटलं असेल वाईट. गोष्टी निघाल्या म्हणून विचारतें, तुम्हांला आमच्या ताईचा द्वेष वाटत असेल नाही ? "

" द्वेष वाटण्याचं काय कारण ? माझ्या वडिलांनी लग्न करण्याचा बेत केला, आईसाहेबांच्या वडिलांनी मुलगी देऊं केली, त्यांत आईसाहेबांचा काय अपराध ? त्या नाहीं तर दुसऱ्या कुणीतरी माझ्या आईसाहेब झाल्याच असत्या. लग्न अटकावणं माझ्या हातचं नव्हतं. मला त्यांचा द्वेष कशाला वाटेल ? "

" मला एक गूढ पडलं आहे ! "

" कसलं ? "

" ताईनं आज सकाळीं चहा घेतला नाही, अन् ती तशीच येऊन रडत बसली. मी तिला समजाऊन खाली आणली. आपल्या बरोबर चहा प्यायला येणार होती; पण रावसाहेबच म्हणाले, 'त्यांनी चहा घेतला आहे, अन् चौथा कप नको आहे.' याचंच मला गूढ पडलं आहे. "

" आणि मलाहि तेंच गूढ पडलं आहे. अन् तुम्ही म्हणतां आई साहेब माझा द्वेष करीत नाहीत म्हणून ! तुम्हांजवळ कशाला त्य असल्या गोष्टी सांगतील ? पण कांहीतरी त्यांना माझ्याबद्दल वाटत असावं खरं. मी आल्याबरोबर आईसाहेबांना नमस्कार करायला गेलों. तरी रावसाहेब बरोबर आंत आलेच होते. मला वाटतं की, त्या मला कांही टाकून बोलतील, म्हणून वडील बरोबर आले, असं असेल आजच्या चहाची तीच तऱ्हा दिसते. तुमच्या तोंडावर बाहेर चह प्यायला येण्याचं त्यांनी कबूल केलं; पण त्यांनी रावसाहेबांना 'येत नाही' म्हणून सांगितलं, म्हणून त्या बाहेर आल्या नाहीत. "

" छे ! मला नाही वाटत तसं. कुण्णाकुण्णाचा ताई द्वेष करणार नाही, कुण्णाला दोष देणार नाही. एवढं भरभक्कम दुर्दैव दोष द्यायल असतांना कशाला दुसऱ्या कुणाला ताई दोष देईल ? आज तिचंहि वय आपल्यासारखंच हिंडण्याफिरण्याचं, हसण्याखेळण्याचं; पण या लग्नामुळं केवढं अंतर पडलं तिच्या आचारविचारांत ! शेतांत एकट्या घरांत वाढलेली ताई कशी अगदी झाडाझुडपाप्रमाणे निर्मळ आणि आनंदी दिसायची ! मुग्ध आनंदांत अगदी पाखराप्रमाणं इकडंतिकडं नाचायची. तिची ती निकोप प्रवृत्ति पाहून मी म्हणे सुद्धा की, 'इंदू, तूं शकुंतलेसारखी भोळी आहेस. इतका भोळेपणा अन् चांगूलपणा-

सुद्धा जगांत कांही चांगला नाही.' तीच इथं ऐषारामांत आहे, तर अशी आंतूनबाहेरून मोडपून गेली आहे."

"हूः! आपला काय इलाज होता? मी कांही म्हटलं, तर त्याचा अर्थ होतो, मी हेवादाव्यानं बोलतों म्हणून!"

"असला भलता अर्थ कोण करणार?"

"कोण म्हणजे? माझे वडील रावसाहेब! या लग्नाच्या अगोदर मी कारभाऱ्यांच्या जवळ म्हटलं की, 'लोक काय बाहेर बोलतात, ते ऐका.' तर त्यांनी वडिलांना जाऊन सांगितलं, 'धाकटे साहेब आपल्या लग्नाच्या विरुद्ध आहेत.' अन् मग जी काय शिवीगाळ मला ऐकावी लागली, ती विचारूं नका!"

"लोक तरी असं काय म्हणत होते?"

"लोक म्हणाले की, 'आता मुलगा लग्न करून देण्यासारखा मोठा झाला आहे, तर त्यांचं लग्न करून द्यायचं सोडून, स्वतःच वडील लग्नाला उभे राहिले!'"

"खरंच तुमचं लग्न कसं नाही केलं?"

"मीच होऊन 'नाही' म्हटलं!"

"ते कां?"

"विसूमामासारखी अवस्था नको व्हायला म्हणून!"

"विसूमामांची काय अवस्था?"

"कांही नाही. उगीच तोंडांतून चुकून गेला शब्द."

"नाही. मला सांगाल तरच मी पुढे जाऊन देईन." नंदाने पुढे होऊन दोन्ही हात पसरून त्याची वाट आडवून धरली.

विश्राम किंचित् वरमून म्हणाला, "सांगणार नव्हतों. आमच्या कुटुंबाच्या शीलाबद्दल तुमच्या मनाला धक्का बसेल. जाऊं द्या."

"मी कुण्णाला सांगणार नाहीं. अन् तुम्ही सांगितलं नाहीत, तर भलतेसलते आरोप मनांत येतील, म्हणून सांगाच. मी मुळीच जाऊं द्यायची नाहीं."

"आमच्या दुसऱ्या आईसाहेबांच्या बंधूंचे नांव विसूमामा. ते आमच्या इथंच रहात. पुढं त्यांचं रावसाहेबांनी लग्न करून दिलं. अन् झालं, विसूमामांना बायकोला मुकावं लागलं."

"म्हणजे काय? मी समजलें नाही."

"नसलं समजलं, तर फार उत्तम. आमची अब्रू बचावली."

"विसूमामांची बायको रावसाहेबांनी तर नाही ना...."

"होय तेंच झालं. म्हणून म्हटलं की माझा मी स्वतंत्र झालो, निराळा राहूलागलों, म्हणजे लग्न करीन. निदान माझी बायको तरी माझी राहील!"

"माझ्यासारखी एखादी खबरदार—" नंदाने ओठ चावला. लाजेने मान फिरविली.

"काय म्हणालांत? तुमच्यासारखी खबरदार बायको—"

"इश्श! मी दुसरंच बोलणार होतें. विश्राम, आपण आज फारच निराशेच्या गोष्टी बोललों, नाही का? अगदी जगाची रीत पाहून अंगावर शहारे येतात, नाही? जगांतून माणुसकीला मुळासकट खणून फेकून द्यावी, असं कांहीतरी जगांत चाललेलं आढळतं."

"असे माणुसकीचे धिडवडे काढलेले पाहिले, म्हणजे असं वाटतं,

तिला आपल्याशिवाय कुणी त्राता नाही. आपणच त्याग करून तिला जगविलं, तर ती जगणार आहे. मी तर निश्चय केला आहे."

"कसला?"

"की माणुसकी जतन करायची. वाटेल ते स्वार्थत्याग करावे लागले, तरी करायचे."

"आणि आता बरीक तुम्ही तरुणांसारखं बोलूं लागलां हं! कॉलेजांत असतांना तरुण असेच मोठमोठे निश्चय करतात, असं मी आपलं वाचलं आहे हो!"

"पहाल, मी माझा निश्चय शेवटास नेतों कीं नाहीं तें! निश्चय करून मोडणारे पुष्कळ असले, तरी निश्चय तडीस नेणारे तरुणहि कांही कमी नसतात."

"विश्राम, कित्ती कित्ती करारीपणानं तुम्ही हे शब्द उच्चारलेत! तुमच्याबद्दल मी अविश्वास दाखविला, त्याबद्दल मला वाईट वाटतं. मी आपली थट्टेनं बोललें हो."

"नंदा, माझी अशीच थट्टा करीत जा. मला बहिणभाऊ कोणीच बरोबरीचं नाही. घरांत मायेचंहि कुणी नाही. दुसऱ्यांच्या घरीं पहावं, काय एकमेक थट्टा करतात! मला नेहमी हिरमुसलं वाटतं, आपली कुणी थट्टा करायला नाही म्हणून. तुम्ही आल्यापासून मी इतकं कांही मन मोकळेपणानं बोलून घेतलं की, आजवर जन्मांत मी कधी इतकं पुष्कळ बोललों नव्हतों."

"आमच्या ताईलासुद्धा पुष्कळ थट्टा करायला हवी असे, बोलायला हवं असे, बरं का! पुरुषांना आपले निश्चय बोलून तरी

दाखवितां येतात. आम्हां बायकांचं निराळं असतं. बोलूनचालून पर-स्वाधीन जिणं !"

"तें कांही खोटं नाही; पण नंदा, तुम्ही खूप खूप शिका. शिकण्यानं माणसाच्या अंगांत तेज चढतं. तुम्हालांहि पराक्रमी होतां येईल. तुम्हीहि पण निश्चय करा की, आपण माणुसकीला जतन करूं."

"आम्ही पुष्कळ निश्चय केला, पण काय उपयोग ? कॉलेजचं शिक्षण घ्यायचं, म्हणजे पैसेवाल्यांचीं कामं आहेत. नुसतं इंग्रजी शाळेंतलं शिक्षण मिळण्याची मारामार पडली, तर खूपखूप शिक्षण कशानं होणार ?"

"पाहूं, तुम्ही मॅट्रीक तर व्हा. पुढच्या शिक्षणाचं पाहूं. तोंपर्यंत मला पैसेहि मिळायला लागतील. माझ्या बरोबरीचे मित्र नाही का आपल्या भाऊ–बहिणींचीं शिक्षणं करीत ? तर मग मी एका मैत्रिणीचं शिक्षण केलं तर ....!"

"पण मैत्रिणीला शिकवून तुम्हांला काय उपयोग होणार ?"

"बघूं. उपयोग करून घेण्याची वेळ येईल, तेव्हा पाहूं. बरं नंदा, तुम्हांला सांगतों—"

"काय ?"

"की यांतलं आईसाहेबांना कांही सांगायचं नाही हं !"

"कां ? तुमच्या मनांत ताईबद्दल द्वेष नाहीं, मग हें सांगायला काय हरकत आहे ?"

"नाही. तें सांगा पाहिजे तर, पण मी तुम्हांला शिकण्याला मदत देणार, तें सांगूं नका."

" कां म्हणून नको ? "

" त्याचा अर्थ भलताच होईल ! "

" होईना ! "

" आताच उगीच नको त्याची वाच्यता व्हायला ! "

" बरं मी कांही कांहीसुद्धा यांतलं बोलायची नाहीं. मग झालं ना ?"

" शाबास ! नंदा, चला, आपण या गड्यांनी आणलेलीं फळं खाऊं अन् पाणी पिऊं. पाह्यलंत किती आस्थेनं या लोकांनी या जिनसा मांडून ठेवल्या आहेत त्या ? "

नंदा व विश्राम बोलत बोलत पडळीजवळ येऊन पोहोचलीं. ओसरीवर बैठक घालून ठेवून खंडकरी विश्रामची वाट पहात होते. दोघे जाजमावर बसलीं आणि फळें खाऊं लागलीं. शेतकऱ्यांशीं विश्राम प्रेमळपणें बोलत होता आणि तेहि धनीसेवकभाव विसरून बोलत होते.

" इसराम सा महिन्यांच व्हतं, पहिल्या आईसाब गमावल्या तवां. हिथं पिलेकांत गमावल्या. मोट्ठं झालंत आता. इसराम, तुम्ही थेट आजोबावाणी दिसतां. आजोबावाणी रावबहादूर व्हा. नांव कमवा." असें म्हणत एक म्हातारा पुढे आला व त्याने विश्रामच्या पायावर डोकें ठेवलें.

" विठू, ऊठ. नंदा, मला या विठूनं दहा वर्षांचा होईतोंवर पोटच्या पोराप्रमाणं संभाळलान् बरं का ! सगळे जण मला चिडवीत लहानपणीं, विठू तुझी आई म्हणून. काय विठू, आठवतं ना रे तुला ? लई म्हातारा झालास की. मी आता रोजगारावर जाणार. तर तूं येणार ना माझ्याबरोबर रहायला ? "

"हां धनीसाब. तुमच्या पायरीवर हा इठू मरनार बघा." विठूने नंदाकडे भेदक दृष्टीने पाहिलें आणि म्हटलें, "मालक, बघा आता लगीन करा. समदा गडी बघा लाडू खायला टपला आहे."

विश्रामने नंदाकडे हसत पाहिलें, नंदाने लाजून मान खाली घातली; गाडींत येऊन बसेपर्यंत तिला वर पाहण्याचें धैर्य झालें नाही. गाडी चालू लागल्यावर नंदा म्हणाली,

"विश्राम, तुमचा विठू बराच आहे की मिस्कील!"

"अहो, हीं बोलूनचालून भाबडीं खेडवळ माणसं! जसं तीं पाहतात, तसं ती बोलतात."

"नर नर!" नंदाने मानेला हिसका देऊन हसून उत्तर दिलें.

# ३

'एखादा पदार्थ आपण खावा, पण भांड्याच्या तळाशी मेलेला झुरळ/किडा सापडावा, म्हणजे पोटांत गेलेलें अन्न जसें ढवळायला लागतें, तसाच इंदिरेच्या मनांत सकाळीं पाहिलेला प्रकार सारखा ढवळत होता आणि तिला मधूनमधून खरोखरीच शिसारीच्या ओकाऱ्या येत होत्या. पोटांतलें अन्न ओकून बाहेर काढून टाकतां येतें, तसा तिला जर बाजी-रावांचा संबंध ओकून अगर धुऊन टाकतां आला असता, तर तिनें खात्रीनें त्या मळमळीतून सुटका करून घेतली असती. अंधेरांत कशालातरी आपल्याला पक्कें जखडून बांधलेलें असावें आणि आपल्या अंगावर साप यथेच्छ वावरत रहावेत, म्हणजे किळस आणि भीति यांनी आपण बेचैन होऊं, तशाच शिसारीच्या कल्पनेने इंदिरा दिवसभर व्याकूळ झाली होती. अगदींच रानावनांत आणि साध्यासुध्या कुटुंबांत ती वाढलेली, झाडाफुलांप्रमाणे मुग्ध वातावरणांत वावरलेली, तिला पाप असें तें कधीं ऐकूनहि माहीत नव्हतें. पति हें स्त्रियांचें दैवत, असें तिने ऐकलेलें

होतें. तेव्हा बाजीरावांना ती देवाप्रमाणे भजे; पण तिच्या देवाच्या ठिकाणीं वसत असलेला अमंगळपणा पाहून तिच्या मनाचा नैतिक आधारच तुटला. तिला आज मधूनमधून रडूं येत होतें, तें बाजीरावांच्या नीच वृत्तीबद्दलच. वयाचें अंतर, शरिराचे अंतर, शक्तीचें अंतर, हीं सर्व अंतरें ती मोठ्या आयासाने विसरत आली होती; पण हें पाप ती विसरणें शक्य नव्हतें. बाजीरावांची छचोर वृत्ति पाहून तिला स्वतःच्या स्थितीबद्दलचा उलगडा झाला. एक उपभोगाची जिन्नस आहोंत, याच एका दृष्टीने बाजीराव आपणांकडे पहात असणार. आपण स्वतः नुसती उपभोगाची वस्तु आहोंत, ही केवढी देहाची विटंबना! आणि कुणाच्या उपभोगाची? तर बाजीरावांसारख्या एका छचोरवृत्ति वृद्ध पुरुषाची. शीः! शीः!! शीः!!! तिने त्रिवार शब्द उच्चारले, अंगावर शाहारे येऊन ती उठून उभी राहिली आणि अंगावर चढलेला कोळी झाडावा, तशासारखे तिने दोन्ही हात अंगावर फिरविले व झाडले. इतक्यांत नंदा तिच्या खोलींत आली आणि तिला म्हणाली,

"ताई, अंगावर कांही चढलं आहे का गऽ?"

"छेः! कुठं?"

"मग असं काय करीत होतीस?"

"उगीचच! अंगावर कुठलीतरी घाण उडाल्याचा भास झाला मला."

"कोंदट हवेंत बसून राहिलं, म्हणजे असं वाटतं. खरंच तूं मळ्यांत कां नाही जात फिरायला गाडीतून? मळ्यांत कसं मोकळं वाटतं. अगदी आपल्या घरची आठवण होते. खरंच, तूं आपली तास दोन तास जात जा. तुला पहिल्यासारखी मजा वाटेल अगदी."

" आता मला पहिल्यासारखी मजा कशानं वाटणार आहे ? "

" कां नाही वाटणार ? "

" लग्नाच्या अगोदर माझं मन आपल्या मळ्यांतल्या विहिरीच्या पाण्यासारखं स्वच्छ असे. वरच्या झाडाझुडपांच्या आकृत्या विहिरीच्या पाण्यांत दिसतात, अन् तळाचंसुद्धा स्वच्छ दिसतं, नाही ? अगदी तस्संच माझं मन होतं. माणसाचा संसार म्हणचे कुंडींतल्या झाडाचा विस्तार वाटे. "

" अन् आता तुझ्या मनाला काय झालं आहे ? "

" आता त्यांत घाण पडली, तें दुर्गंधी झालं आणि गढूळहि झालं आहे. "

" गढूळ झालं आहे, म्हणूनच त्याचा तळ मलाच काय, पण तुझा तुलाहि दिसत नाही. असंच ना ? "

" कसंहि म्हण. नंदा, वाटतं उगीच मी या भानगडींत येऊन पडलें. मी आपली सुखी होतें. आईवडिलांना शेतीच्या कामांत मदत केली असती. केव्हाच माझं आयुष्य निघून गेलं असतं. वडिलांना माझ्या निष्पाप मनाची पारख झाली नाही. त्यांना वाटलं, मी इतर मुलींसारखी असेन. नाहीतर त्यांनी मला तशीच कुमारिका राहूं दिली असती."

"पण तूं आपलं मन गढूळ कशाला होऊं देतेस ? "

"मी शेवटीं एक हिंदु बायको आहें. आमच्या संसारांतल्या सगळ्या बऱ्यावाईट गोष्टी मला शिरसा वंद्य मानाव्या लागतात. रोज जर नवीन नवीन घाण कुणी हट्टानं त्यांत कालवूंच लागलं, तर मी तर्र माझं मन स्वच्छ कसं ठेवणार ? वाटतं, इथून कसंतरी निसटावं, अन पुनः आपल्या घरीं राहायला जावं. तिथं कण्हेरीच्या, जास्वंदीच्या, गुल

बाक्षीच्या फुलांच्या लांबलांब माळा कराव्यात, अन् कुठल्या तरी दगडाच्या निर्जीव देवाला भावीकपणानं वहात बसावं."

"म्हणूनच म्हटलं तुला की, गाडींतून मळ्यांत जावं, खुश्शाल तास दोन तास बसावं."

"छे: !"

"कां गऽ?"

"कुणाला खपायचं नाही. पोटांत भीति आहे ना की, ही म्हातारपणची तिसरी बायको ?"

"मग ?"

"तिला जपली पाहिजे, नाहीतर बिघडेल. कुणी तिला पाहतां कामा नये, कुणी तिच्या नजरेस पडतां कामा नये, कुणाशीं ती बोलतां कामा नये. तुला वाटत असेल मी स्वतंत्र आहें, माझ्या तंत्रानं पुरुष वागतात; पण इथं खायचे दात निराळे अन् दाखवायचे दात निराळे आहेत. अंधाऱ्या खोलींत कोंडून ठेवणार नाहीत; पण अशी नजरकैद ठेवतील की, अंधारकोठडी पत्करली !"

"पण स्वभावानं तर शांत दिसतात."

"दिसतात ! शांत दिसणारीं माणसंच नंबर एकचीं मिस्किल असतात. दुसऱ्याला केसान् केसागणीक बांधून, जखडून ठेवतात."

"पण इतकी कां त्यांना तुझ्याबद्दल शंका येते ?"

"म्हणतात ना, माणसं आपल्यावरनं जगाला ओळखतात !"

"तूं अगदी बरोबर बोललीस ! जो पुरुष स्वत: वाईट चालीचा असतो, त्यालाच सगळ्या बायका वाईट दिसतात."

" अन् त्याला बायकांची कांही किमत नसते. बायको म्हणजे उपभोगाची जिन्नस मुळी बोलूनचालून, तर तिच्या मनाची कशाला अशा पुरुषांनी पर्वा करायची? "

" आणि म्हणून का तूं सकाळीं डोळ्यांतून पाणी काढीत होतीस? खरंच, मला तूं अजून सांगितलं नाहीस, कां तुला रडूं आलं होतं?"

" आज कांही नाही हो. निवांत वेळ सापडला, एकांत सापडला, बसलें होतें आपली मागच्या आठवणी काढीत." असें म्हणून इंदिरेने तोंड बाजूस फिरविलें, पदराने डोळ्यांचे कोपरे टिपल्यासारखें केलें.

" तूं एकांतांत बसून रडलीस असं तुला वाटतं; पण पाहिलंस? विश्रामांनीसुद्धा पाहिलं. ते मला विचारीत होते की, आईसाहेबांच्या डोळ्यांना पाणी कां येत होतं सकाळीं? "

" त्यांनी कुठून पाहिलं? "

" ते मला चहासाठी हाक मारायला आले होते. तुला त्यांनी रडतांना पाहिलं अन् ते परत गेले."

" अस्सं! बरीच तुमची मैत्री जमली आहे? अन् उलट मलाच म्हणालीस की, 'एवढा नट्टापट्टा कशाला करतेस माझा! मला कांही दाखवायला नाही न्यायची!' मी बोलणार होतें त्या वेळेलाच. पण म्हटलं गप्प रहावं, अन् पहावं काय काय होतं तें!"

" ताई, गोष्ट बदलूं नकोस. सांग, कां तुला रडूं आलं? बरं, नको सांगूस. मीहि पुष्कळ गोष्टी सांगणार होतें; पण आता कशाला सांगायला बसलें आहें?"

" कांही कारण झालं नाही. उगीच वाईट वाटलं, डोळ्यांतून पाणी आलं. अन् कारण तुला सांगण्यासारखंहि नाही."

" यांच्याबद्दल तुझ्या कानावर तर कांही वाईट गोष्टी आल्या नाहीत ना? "

" मी तशा कांही गोष्टी अजून ऐकल्या नाहीत; पण मला त्याबद्दल खात्री झाली आहे. अगऽ, नवराबायको जगाला फसवूं शकतील, पण एकमेकाला किती दिवस तीं फसविणार? "

" मग तुला तर कल्पना आली आहे अगोदरच! शीः! भारीच नीच वृत्ति आहे, नाही? विश्राम म्हणत होता की, नोकरीधंदा करून वेगळा राहूं लागलों म्हणजे मग लग्न करीन. "

" कां? त्याच्या बायकोला छळींन, असं का वाटतं त्याला? "

" छेः! तो चक्क म्हणाला; मी लग्न करून बायको आणली अन् वडिलांनीच तिला पटकावली, म्हणजे विसूमामासारखं व्हायचं; म्हणून एकत्रांत असेतोंवर लग्नच करायचं नाही. "

" विसूमामाचं काय प्रकरण आहे? " इंदिरा जवळ येऊन नंदाच्या कानाशीं लागली आणि म्हणाली, " नंदा जें काय ऐकलं असशील, तें सांग. सगळं ऐकण्याची माझ्या मनाची तयारी झालेली आहे. "

तिची त्या वेळची केविलवणी आर्जव नंदाच्याने नाकारणें शक्य नव्हतें. तिने विसूमामाचें प्रकरण सांगितलें. शिवाय विश्रामशी झालेल्या खडान् खडा गोष्टी सांगितल्या आणि शेवटीं ती इंदिरेला म्हणाली,

" ताई, विश्राम फारच चांगला मुलगा आहे हो. तो तुझ्या हाकेला धावून येईल असा आहे. तुम्ही एकमेकांशीं कां ग बोलत नाही? बोललांबसलांत तर एकमेकांचीं मनं शुद्ध होतील, गैरसमज दूर होतील. नाहीं तरी या थेरड्याच्या पश्चात् विश्रामशींच तुझी गाठ आहे ना? "

" चुकती आहेस तूं. विश्रामशी बोललेलं इकडं मुळीच आवडायचं नाही. कॉलेजांतून सुटींत घरीं आल्याबरोबर रीतीप्रमाणं विश्राम मला नमस्कार करायला आला, तर संशय आला की, न जाणो, हीं दोघं एका वयाचीं, एकमेकांशीं बोलतील. आपले त्याच्याबरोबर आंत आले. मला असं लाजल्यासारखं झालं! विश्रामला काय वाटलं असेल नाही? त्याला वाटलं असेल की, मी म्हणजे इतकी छचोर आहे की, मला अष्टौ प्रहर संभाळावी लागते."

" त्याला वाटलं, तूं त्याचा द्वेष करतेस, आणखीन् रागानं कांही टाकून बोलशील, म्हणून रावसाहेब बरोबर आले. पाह्यलंस कसे गैरसमज वाढतात ते?"

" आणि ह्यांच्या मनांत आमच्या दोघांत गैरसमज होतां होईल तों वाढवायचे आहेत. उद्देश एवढाच की, मी खरोखरीच विश्रामांचा द्वेष करावा, अशा युक्त्या असतात."

" पण तूं कां हें चालूं देतेस?"

" मी बोललें, तर माझीच शोभा होईल! मी आपल्या वडिलांच्या-पुढं कधीतरी उलट बोलतें का? वयामुळंच ना मी त्यांचं ऐकलं? अन् ते तर पांच वर्षांनी लहान असतील यांच्यापेक्षा! मग तूंच सांग, मी काय बोलणार? मी बोललें तर होईल काय, तर नजरकैद वाढेल. म्हणतात ना– 'जों जों राया बोले, तों तों पिंजऱ्यांत पडे!'"

इतक्यांत बाजीराव निजायला गेल्याची चाहूल लागली. तरी इंदिरा तशीच बसून होती. थोड्या वेळाने बाजीराव स्वतःच आले आणि हळूच दाराआडून म्हणाले, "दहा वाजले. निजायची वेळ झाली."

इंदिरा मुकाट्याने उठली आणि जातांजातां मोठ्याने म्हणाली,

" नंदा, नीज आता! अन् हें बघ, खोलीला किनई आंतून कडी लाऊन घेत जा."

नंदाने धाडकन् दार लावलें आणि कडी लावली. तिला बाजी-रावांच्या छचोरपणाची किळस आली होती, कीं इंदिरेशीं चाललेल्या गोष्टींत खंड पडला म्हणून संताप आला होता, ते नक्की सांगतां येत नव्हतें; पण तिला त्वेष आला होता खास!

इंदिरा खोलींत येतांच बाजीरावांनी विचारलें. " नंदानी दारसं लाऊंन घेतलन् आंतून? तिला सकाळीं उठवील कोण?"

" मीच सांगितलं आंतून कडी लाऊन घे म्हणून! उठवीन मी सकाळी तिला."

" तिला सकाळच्याबद्दल तुम्ही कांही बोललां तर नाही ना?"

" मी तिला तो प्रकार सांगितला, तर त्यांत माझीच अब्रू गेली असती, म्हणून मी तो सांगितला नाही, अन् सांगणाराहि नाहीं कधी."

" तुमची अब्रू गेली असती?"

" होय! माझे पतिदेव असे-असे आहेत, असं सांगण्यांत पतिव्रतेची स्वतःचीच विटंबना होत असते. लोक म्हणणारच, देव तसा त्याचा भक्त!"

" अजूनहि तुम्हांला त्या गोष्टी खऱ्याच वाटतात ना?"

" त्या खऱ्या असल्याबद्दलची खात्री पटली आहे."

बाजीराव जास्त बोलले नाहीत.

# ४

" विश्राम उद्या जाणार म्हणतात, तर त्यांना सांगा की, दोन दिवसांनी पुढं जा. दिवाळीचे चार दिवस पुरे होऊं द्या, अन् मग जा म्हणावं. बरं का ? " बाजीरावांनी आपल्या कारभाऱ्यांना बोलावून सांगितलें.

विश्राम आणि बाजीराव यांचीं बोलणीं कारभाऱ्यामार्फत होत असत. कारभारी थोड्या वेळांनी निरोपाचें उत्तर घेऊन आले.

" ते म्हणतात, मला उद्या गेलंच पाहिजे. अन् मी तशीं पत्रंहि टाकून ठेवलीं आहेत. टर्मच्या खर्चाची रक्कम मागविली आहे त्यांनी. "

" बरं, त्यांची इच्छा ! त्यांना विचारून लागेल ती रक्कम त्यांना आज संध्याकाळपर्यंत पोहोचवा. बरं, आपल्या त्या गहाणाच्या अपिलाची तारीख परवा आहे ना ? मग मला जायला कांही हरकत नाही उद्या ! नाही का ? "

इतकें बोलून बाजीराव दुसरीकडे निघून गेले. इंदिरा आणि नंदा या माजघरांत वेण्याफण्या करीत होत्या. त्यांनी तो संवाद ऐकला.

कुणी जवळपास नाहीसें पाहून, इंदिरेने नंदाला हळूच कानांत सांगितलें, " वर चल. "

दोघी वर गेल्या आणि अगदी हळू आवाजांत इंदिरेने नंदाला म्हटलें, " नंदा ! विश्राम उद्या जायचं म्हणताहेत. ऐन दिवाळींत ते जाणार ? उद्या भाऊबीज. तर त्यांना म्हणावं मी सांगितलं आहे की, दोन दिवसांनी पुढं जा. कारभाऱ्यांच्या हातीं निरोप अन् त्याचं उत्तर दुसरंतिसरं काय येणार होतं ? हें सांगायला तुला वरती बोलावलं. "

" एवढंच का ? मला वाटलं कांही गुपित आहे. अन् एवढं बोलायलासुद्धा कां तुला चोरी असावी ? "

" तुला माहीत नाही. घरांतल्या मोलकरणी, स्वयंपाकाची बाई सगळ्या जणी घाणेरड्या आहेत. अन् ह्यांच्याशीं हितगुज चाललेलं असतं. त्या माझ्या पाळतीवर असतात. पाळतीवर ठेवल्याहि असतील. अन् मी सांगितलं आणि विश्राम राहिले, असं कळलं कुणाला, तर त्याचा विपरीत अर्थ होईल. मी तुला काय सांगितलं? सगळ्यांची मला चोरी आहे. सगळ्या गोष्टी चोरून कराव्या लागतात. "

नंदा तडक विश्रामच्या खोलींत गेली अन् म्हणाली,

" विश्राम, उद्या जाणार तुम्ही ? रहा ना दोन दिवस जास्त ! उद्या तर भाऊबीज ! दोन दिवसांनी मीहि जाणार आहें. ताईचा निरोप आहे की, दोन दिवस रहा म्हणून. "

" असं ? "

" रहातां ना ? कांही हरकत नाही ना ? दोन दिवसांनी उशीरा गेलं, तरी चालण्यासारखं आहे. कॉलेज उघडायला अजून पांच दिवस अवकाश आहे. मग रहातां ना ? "

" बरं, आईसाहेब एवढ्या सांगताहेत तर राहूं. माझा विचार चालला होता उद्या जावं म्हणून. कुणी आग्रह केला असता तर राहणार होतोंच; पण पाह्यलं, मला कुणी आग्रहच करीना; म्हणून म्हटलं जावं झालं. "

" राह्यचं कबूल केलंत, ताईला कित्ती बरं वाटेल म्हणून सांगूं? अन् मलाहि पण खूप आनंद झालाय्. "

नंदा तशीच धावत इंदिरेकडे आली आणि तिच्या कानांत तिने ती आनंदाची बातमी सांगितली. इंदिरेला आनंद झाला. नंदा म्हणाली,

" पाह्यलंस? विश्रामांना मायेचं माणूसच नाही कुणी! नाही का? आईवाचून वाढलेलीं माणसं कशीं मायेसाठी आशेला आलेलीं असतात, नाही? "

" साहजिकच आहे! "

" तरी बरं. विश्रामांचं नशीब म्हणून तुझ्यासारखी त्यांना आई मिळाली आहे. "

" खरोखरच मी विश्रामांची आई असतें तर— "

" तर काय काय केलं असतंस? "

" मघाशी काय म्हणालीस? त्यांना मायेचं माणूस नाही कुणी होय ना? त्याचीहि सोय होती आहे. नाही का? "

" हें काय ग, ताई? " नंदाने मान वेळावून म्हटलें.

दुसऱ्या दिवसापर्यंत विश्राम राहणार असल्याचें कुणालाच कळलें नव्हतें आणि सांगणार कोण होतें? विश्राम दुपारच्या गाडीने जाणार या बेताप्रमाणे त्याची बांधाबांध गडीमाणसें करीत होतीं. बाजीराव हे सकाळीं लवकर उठून गाडीने रवाना झाले.

तो भाऊबिजेचा दिवस होता. गडी आणि कारभारी आज सुट्टीवर होते. घरांतले गडी, मोलकरीण, कामकरी माणसेंहि सुट्टीवरच होती. बाहेर एक गडी आणि घरांत नंदा आणि इंदिरा एवढींच काय तीं माणसें वावरत होतीं. 'विश्राम अंघोळीला जातील, तेव्हा लक्ष्य ठेव,' असें इंदिरेने नंदाला बजाविलें होतें, म्हणून ती त्यांची वाटच पहात होती. ते खाली येऊन, अंघोळीसाठी न्हाणीघराकडे जाऊं लागले, तशी इंदिरा नंदाला उद्देशून पण विश्रामांनाहि ऐकूं जाईल, इतक्या मोठ्या आवाजाने म्हणाली, "नंदा, त्यांना म्हणावं, अंगाला तेल, उटणं लावल्यावर अंघोळ करा. अन् तू त्यांच्या डोक्याला तेल लाव. भाऊबीज आहे आज. पुरुषांनी कुणाकडून तरी तेल लाऊन घ्यावं. ऐकलंस का? जा, त्यांना सांग जा. नाहीतर बघ ते अंघोळीला बसतील."

विश्राम न्हाणीघराशी घोटाळत उभा होता. इंदिरेचें भाषण कान देऊन ऐकत होता. नंदा लगबगीने बाहेर आली आणि म्हणाली,

"विश्राम, थांबा, मी तुमच्या डोक्याला तेल लावतें. आईसाहेबांनी सांगितलं आहे की, आज पुरुषांनी तशी अंघोळ करूं नये."

"तेल न लाऊन घेतां अंघोळ केली तर काय होतं?"

"थांबा! मी आईसाहेबांना विचारून येतें."

"छे:! त्यांना काय विचारतां? बरं, आणा. अगदी शास्त्राधारापुरतं लावा हं! नाहीतर ठेवाल पसाभर तेल डोक्यांत ओतून."

विश्रामांची अंघोळ होतांच इंदिरेने त्या दोघांचीं फराळाचीं पानें मांडलीं, आणि तीं स्वतः त्यांना वाढूं लागली. नंदा व विश्राम यांची खूप थट्टामस्करी चालली होती. विश्राम घरांत अगदी मुखस्तंभ असे; पण

आज त्याला मोकळेपणा वाटत होता आणि तो खूपच बोलत होता, हसत होता आणि हसवीत होता. नंदा इंदिरेस म्हणाली—

" ताई, तूं बैस ना फराळाला ! "

" नको. मी बसलें तर फराळाचं वाढील कोण ? "

" माझ्या पानांत तर इतके वाढून ठेवले आहेत पदार्थ की, मला आता जास्त कांहीच नको आहे. " विश्राम म्हणाला.

" अन् माझ्याहि पानांत जागा नाही जिन्नस वाढायला. मग ताई, तूं एक ताट घेऊन येईनास. ये की, आपण एकत्र बसूं. "

इंदिरा कांहीहि न बोलतां आंत गेली, थोड्या वेळाने चहाचा ट्रे तयार करून घेऊन आली, तेव्हा नंदा म्हणाली,

" वा: ! शर्थ आहे तुझी ! मला वाटलं तूं फराळाचं ताट तयार करून आणीत आहेस ! "

" मी फराळाला तुमच्याबरोबर बसले असतें, तर चहा कुणी केला असता ? आज सगळ्या नोकरांनी सुट्या घेतल्या आहेत. " इंदिरा म्हणाली.

" बरं. अजून आमचे फराळ कुठं संपले आहेत ? मी ताट घेऊन येतें तुझ्यासाठी, अन् कप घेऊन येते. " असें म्हणून नंदा आंत आली, तों तिला आंतल्या बाजूस फराळाचें ताट व एक कपबशी मांडून ठेवलेली दिसली. ती बाहेर आणून ती म्हणाली, " बरीच आहेस की ! ताट, कप तयार ठेवला होतास की. "

" मग काय करूं ? मला माहितीच की, तूं मला आग्रह करणारच. " इंदिरा म्हणाली.

" नंदा, तुमचा भलताच आग्रही स्वभाव आहे बुवा! आतापर्यंत आग्रहांचा वर्षाव माझ्यावर किती झाला आहे, तो पहा!" विश्राम म्हणाला.

" माणसं लाजाळू असलीं, म्हणजे आग्रह करावाच लागतो. नाही का ? "

चहाफराळ तब्बल तास दीड तास चालला. विश्राम थोडासा गभीर होऊन म्हणाला, " मी आता पांच महिन्यांनी परीक्षेला बसेन. अन् पुढचा बेत असा आहे की, परीक्षेचा निकाल जून महिन्यांत लागल्याबरोबर मी आय्. सी. एस्. च्या परीक्षेकरिता विलायतेला जावं. माझे प्रोफेसर माझ्या पाठीमागं लागले आहेत की, ' तुम्ही जरूर जा; खात्रीनं पास व्हाल.' अन् म्हणतात, ' तुमच्यासारख्यांनी नाही जायचं, तर कुणी जायचं ? पंधरावीस हजार रुपये खर्च होईल; पण पुढे प्राप्तीहि तशीच होईल. खर्चाचे पैसे भरून येतील.' माझा आपला जाण्याचा बेत नक्की आहे. बघावं रावसाहेब काय म्हणतात ते! अजून बेत पुष्कळ लांब आहे; पण पुन्हा अशी एकत्रपणें बसून विचार करायची संधी लाभेल न लाभेल, म्हणून मी आपलं बोलून ठेवतों. मी पास होईन, अशी मला खात्री वाटते. आजपर्यंत सारखा पास होत गेलों आहे. "

" विश्राम, तुम्ही जरूर जा अन् पास होऊन या! काय ताई, तुला काय वाटतं ? "

" जावं की! पैशाकडे काय पाह्यचं आहे ? ऐन वेळेला पैसा जर उपयोगाला आला नाही, तर त्या पैशाचा काय उपयोग ? " इंदिरा म्हणाली.

" तुम्हांला माहीत नसेल की, आपल्याला बरंच कर्ज आहे. "

" असं ? " नंदाने विचारलें व इंदिरेकडे पाहिलें.

*

" मग त्याचा याच्याशीं काय संबंध ? " इंदिरेने विचारलें.

" संबंध असा की विलायतेला जायचं म्हणजे जास्त कर्ज काढावं लागेल. इतरांना तें पसंत पडायचं नाही; पण असं कांही नाही केलं, तर कर्ज तरी कशानं फिटणार आहे ? " विश्राम म्हणाला.

" माझी कांहींसुद्धा हरकत नाही. " इंदिरा म्हणाली.

" अन् तुझी हरकत नसली, तर रावसाहेबांना तरी हरकत घेण्याचं काय कारण ? " नंदा म्हणाली.

" आपणांला पसंत आहे ना ? आपण असं करूं. दुपारच्या चहाचे वेळीं आणखीन् बोलूं. "

दुपारीं जेवणें झालीं. नंदा आणि विश्राम जेवायला बसली आणि इंदिरेने त्यांना वाढलें.

विश्रामांची गावाला जाण्याची वेळ झाली, म्हणून कारभारी त्यांना निरोप देण्यासाठी आले. त्यांना पाहतांच विश्राम म्हणाला, " दिवाणजी, मी आज जात नाही. आता पत्र आलं मित्राचं एका, म्हणून जाण्याचा बेत रहित केला. " कारभारी 'बरं' म्हणून निघून गेले.

दुपारचीं जेवणें झाल्यावर नंदा आणि इंदिरा बोलत बसल्या होत्या. अर्थात् त्यांच्या बोलण्याचा विषय विश्रामांचें विलायतेला जाणे हाच होता. मनमोकळेपणाने त्या दोघींना आज बोलतां-बसतां येत होतें, विश्रामांशीं गोष्टी बोलतां येत होत्या, या गोष्टींमुळे त्या आनंदांत होत्या: तथापि बाजीरावांना कर्ज होतें, ही गोष्ट त्यांना नव्यानेच समज-ल्यामुळे दोघीहि थोड्याफार उद्विग्न होत्या. नंदाच्याने राहवेना व ती म्हणाली,

" ताई, सगळ्याच बाजूंनी फसगत झाली तुझी."

" मला त्याबद्दल कांहीसुद्धा वाटत नाही. अन् तुला सांगू ? मुख्य गोष्टींतच दैवानं मला इतकं सपशेल चकवलं आहे की, अवांतर गोष्टींचं मला आता कांहीसुद्धा वाटत नाही."

" विश्राम भोळे दिसतात, नाही ? आपलं त्यांनी खुश्शाल सांगून टाकलं कर्ज आहे म्हणून. बाकी बाजीरावांनी तुला सांगितलं असेलच म्हणा !"

" भ्रम आहे तुला उगीच ! कसलासुद्धा माग लागूं द्यायचे नाहीत ! अन् त्यांतून मी म्हणजे त्यांना नातीसारखी. कशाला ते पैशा-आडक्याच्या गोष्टी माझ्याजवळ सांगणार ? अन् सांगत नाहीत, तेंच बरं आहे. उगीच न जाणो, मला या घरांत आपलेपणा वाटायला लागायचा अन् लोभांत पडायची मी."

" म्हणजे ! तूं काय करणार आहेस ?"

" सहन होईल तोंवर सहन करीन, नाहीतर आपली एखाद दिवशीं उठेन अन् बैरागीण होऊन घरीं राह्यला जाईन. कुठंहि काय पोटाला खाऊनच दिवस काढायचे आहेत ना ! मग माहेरींही मला पोटाला मिळेल केव्हाहि गेलें तरी. नाहीतर आहेच." इंदिरेच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. तिचें सांत्वन कसें करावें, हेंच नंदाला समजेना. ती म्हणाली,

" ताई ! धीर ठेव. विश्राम चांगले आहेत, नाही ? विलायतेहून शिकून आले, तर कर्ज फेडून टाकतील अन् तुला कमी पडून देणार नाहीत."

इंदिरा कांहीच बोलली नाही.

दुपारची चहाची वेळ होतांच दोघी खाली आल्या. चहाचें सर्व इंदिरेनेच तयार केलें आणि आता आढेवेढे न घेतां ती होऊन चहा घेण्यासाठी बसली. कांही मासिकांचे दिवाळी अंक तेथे पडले होते आणि बराच वेळपर्यंत इतर विषयांवरच गोष्टी चालल्या होत्या. विश्रामने आपणहून बोलणें काढलें. तो म्हणाला,

" विलायतेला जायचं म्हणजे असलेल्या कर्जांत भर पडेल; पण एवढं कर्ज फिटण्याचा दुसरा कांही मार्गहि दिसत नाही. "

" जावं ना ? मी म्हणतें कर्जाची कशाला काळजी करायला हवी ! फिटायचं असेल तर फिटेल. शिकण्याचं वय निघून गेल्यावर काय उपयोग ? " इंदिरा म्हणाली.

" बरं, मी कांही मित्रांना आज संध्याकाळीं फराळाला बोलवूं का ? " विश्रामने विचारलें.

" हो, बोलवा की ! अन् मी मनांत विचारच करीत होते कीं, तुमचे मित्र कसे नाही आले फराळाला अजून ! " नंदा म्हणाली.

" रावसाहेबांना खपत नाही कुणी मित्र आलेले. म्हणून मी कुणाला आणीतच नाही. मी बोलवूं ना ? आज माणसं सगळीं सुट्टीवर आहेत, म्हणून विचारतों. " विश्रामने विचारलें.

" बोलवावं. कांही ताजे पदार्थसुद्धा मी करीन. किती वाजतां येतील ? म्हणजे त्याप्रमाणं तयारी करायला. " इंदिरेनं विचारलें.

" आणखीन् दोनतीन तासांनी येतील. मी आता बाहेर जातों, अन् येतांना त्यांना घेऊन येतों. चालेल ना ? " विश्रामनें विचारलें.

" चालेल. आम्ही सगळी तयारी करून ठेवतों. " इंदिरा म्हणाली.

विश्राम बाहेर गेले. दोघी जणी फराळाच्या तयारीस लागल्या. इंदिरा अगदी हुरुपाने कामधाम करीत होती आज. सासरी आल्यापासून आज महिन्यानेच तिला स्वतंत्रपणें आणि बरोबरीच्या माणसांशीं वागण्याची संधि मिळाली होती आणि ती तर आनंदाने हुरळून गेली होती. नंदा तिला म्हणाली,

" ताई ! चांदीचीं भांडीं काढ ना ! "

" सगळं कुलपांत ! "

" अन् किल्ल्या कुणाजवळ ? "

" बरोबर. "

" वा ! कमालच आहे की ? "

" तुला माहीत नाही. समज, मी कुणाला कांही जिन्नस दिली म्हणजे ? "

" अन् तुझे दागदागिने ? "

" माझ्या सवतीचे म्हण ! तेहि कुलपांत. मला तरी ते कुठं घालावेसे वाटतात ! मीच म्हटल की, 'सगळे दागिने कुलपांतच राहूं द्यात.' अग, मी दागिने घातले, म्हणजे दररोज सकाळी काढून घ्यायचे, संध्याकाळीं काढून द्यायचे. मी म्हटलं, हा खटाटोप कुलुपकिल्ल्यांचा नकोच ! दागिन्यांची मला माहेरी कुठं सवय होती ? एका डुडेशिवाय काय असे अंगावर ? अन् हे जुने दुसऱ्यांनी घातलेले दागिने, माझ्या अंगाला खुपतातच. तूं कांही म्हणेनास ! "

" बरं बाई, तूं बैरागीण आहेस ! "

" पहिल्यापासून माझं असंच. मी सगळ्यांशीं जमवून घेतें. मनाला संताप तरी होत नाही. "

विश्राम कांहीं वेळाने मित्रांना घेऊन आला. मित्रांचे फराळ झाले व विश्रामासह ते फिरायला गेले.

रात्रीं विश्राम परत आल्यावर इंदिरेने नंदाला त्यांना घरांत बोलवायला सांगितलें. विश्राम आला आणि "काय?" म्हणून उभा राहिला.

"नंदा, त्यांना तूं ओवाळ. पाट मांडून दे. मी ओवाळण्याचं तयार करून ठेवलं आहे बघ. आज किनई पुरुषांनी ओवाळून घेतल्याशिवाय राहूं नये."

नंदाने पाट मांडला. विश्राम मुकाट्याने बसला. नंदा त्याला ओवाळणार, इतक्यांत विश्राम म्हणाला,

"थांबा ! मी ओवाळणी घेऊन येतो."

"माझ्याजवळ आहे रुपाया ! तो घालावा." इंदिरेने रुपया जवळ ठेऊन म्हटलें.

"नको ! नंदा ओवाळणार, तर आपल्या नांवलौकिकाप्रमाण ओवाळणी नाही घातली, तर त्या नाराज होतील. अन् मी जर चांगली स्कॉलरशिप मिळवतो आहे, तर माझ्या पैशांतून मी ओवाळणी घालीन." असें म्हणून विश्राम खोलीत गेला आणि परत येऊन बसला. ओवाळतांच नंदाला त्याने दहा रुपये ओवाळणी घातली.

"वा ! दहा रुपये ओवाळणी मिळाली !" नंदा पैसे गोळा करतांना म्हणाली.

"गेल्या दहा वर्षांत मला कुणी ओवाळलंच नाही. ही दहा वर्षांची साठलेली आहे. पुढच्या वर्षी ओवाळाल तर एवढे नाही कांही मिळणार !"

"मग ह्याच्यापेक्षा जास्त मिळतील ना ? चालेल मला."

" बघूं ! पुढल्या वर्षाची बात पुढल्या वर्षी. बरं नंदा, मी उद्या जाऊं का ? माझे मित्र उद्या जाणार आहेत, अन् ते आग्रह करीत आहेत. आज राहिलों, खूप मजा आली नाही? अशी मजा असली, तर मी दर सुट्टींत घरीं येत जाईन."

" नाही तर दर सुट्टींत कुठं जातां ? " नंदाने विचारलें.

" राहतों कॉलेजांतच ! नाहीतर जातों कुठेतरी प्रवासाला ! तुम्ही उन्हाळ्याच्या सुट्टींत येणार आहांत ना ? तुम्ही येणार असाल तर मीहि येईन." इंदिरेकडे वळून विश्राम म्हणाला, " यांना इकडे बोलावून घ्यावं नाही ? या असल्या म्हणजे वेळ गंमतीत जातो."

" होय. येईल की ती ! मी बोलावलं, तर तिचे वडील नाही नाही म्हणायचे."

# ५

विश्राम गेला, दोन दिवसांनी नंदाहि गेली आणि इंदिरा रोजच्या व्यवहारांत मग्न झाली.

पण या तिघांच्या मनावर झालेले परिणाम मात्र अनेकरंगी होते. तिघांनाहि एक भावना सारखीच विकल करीत होती आणि ती म्हणजे, त्या तिघांच्यासाठी मांडून ठेवलेली आयुष्याची रंगभूमि, ही आनंदापेक्षा उद्वेगी वातावरणांनी घेरलेली होती आणि त्यामुळेच त्यांना मिळणारा क्षणिक आनंद उल्हासाऐवजी हुरहूरच मनांत पेरून जाई. भाऊबिजेच्या दिवशीं समवयस्क तिघे जण एकत्र बसलीं, मनमोकळेपणाने बोलली, एकमेकांच्या अधिक जवळ आलींहि खरीं; परंतु दरेकाचें दुखावलेलें मनच दुसऱ्याला अधिक दिसलें, कांही कांही नवीनच संकटांची चाहूल त्यांच्या कानावर आली, त्यांच्यापासून लपवून ठेवलेल्या भयंकर गोष्टी त्यांच्या नजरेस पडल्या. इंदिरा आणि विश्राम हीं दोघें एकाच परिस्थिती-च्या जात्यांत वेगवेगळया वेळीं आणि वेगवेगळया प्रकारांनी भरडलीं

जात होतीं. नंदाला विश्रामबद्दल आदर आणि इंदिरेविषयीं कींव वाटत होती आणि तीहि त्यांच्याशीं तितकीच तादात्म्य होऊन, त्यांच्या भवितव्याबद्दल चिंतातुर झाली होती. तिघेंहि एकाच परिस्थितीकडे भीतीनें पहात होतीं, एकमेकांच्या मदतीची अपेक्षा करीत होतीं, थोड्याफार प्रमाणांत परिस्थितीचे चटके सहन करावयास आंतून तयार झालीं होतीं. त्यांनी आपलीं मनें उघड करून दाखविली नव्हतीं, तरी तीं दुसऱ्यास पुरेपूर कळली होती. त्यांची वयें आणि विचार समसमान होते, भावनांच्या संवेदनांना आपोआप स्फुरण चढत होतें, सर्वगुप्तसुप्त विचारांच्या मूक संदेशांची देवघेव होऊन चुकली होती.

नंदा परत फिरली, तरी तिचें एक पाऊल इंदिरेकडे ओढत होतें आणि एक विश्रामकडे ओढत होतें. इंदिरेवर ओढवलेल्या आपत्तीमुळे ती भयभीत झाली; पण खरी चिंता तिला निराळीच वाटे. इंदिरा सहनशीलतेमुळे बाजीरावांचे सर्व प्रकारचे छळ आणि अनाचार निमूटपणें चालूं देईल आणि अधिकाधिक संकटें ओढवून घेईल, असें तिला वाटे. इंदिरेने खंबीरपणा ठेवावा, सर्व प्रकारांना आळा घालावा, असें ती तिला हजार वेळा म्हणाली. तिच्या घरी राहून तिला धीर आपण दिला, तर तिला कसेतरी दिवस काढतां येतील. म्हणून तिचें मन इंदिरेकडे ओढत होतें. शिवाय इंदिरेचे घर म्हणजेच विश्रामचें घर. विश्रामची खुशाली, त्याचे बेत, परीक्षेतलें यश वगैरे गोष्टी तिला त्या घरांत असतांनाच अधिक समजावयाच्या होत्या आणि खुद्द विश्रामकडे तिचा अधिकाधिकच ओढा वाढूं लागला होता. सावत्रपणाच्या जाचांत आणि नंतर वसतिगृहाच्या हद्दपारींत वाढल्यामुळे मायेच्या माणसासाठीं आशेला आलेल्या विश्रामची तिला कींव वाटे, त्याच्या सुस्वभावाबद्दल आदर वाटे, त्याच्या संगतीबद्दल उत्कंठा लागे.

" प्रकृतीला जपत जा. खुशालीचं पत्र धाडीत जा. "

विश्राम नमस्कार करून निरोप घेण्यासाठी गेला असतां, आईसाहेबांनी सांगितलेले हे शब्द त्याला सारखे आठवत होते. आपली आई जिवंत असती, तर तिनेहि असेंच नसतें का म्हटलें? पण तिला मला उघडपणें पत्र धाडून खुशाली कळवितां आली असती. आईसाहेबांच्या सुस्वभावाची तर त्याला तारीफच करीत बसावेंसें वाटे, आणि प्रेमळपणामुळे जणू आपली सख्खी आईच पुन: अवतरली आहे, असेंहि त्याला वाटे. सुस्वभाव, प्रेमळपणा, सोशीकपणा, समाधान, धर्मभीरुता, सच्छीलता इत्यादि त्यांच्या गुणांची त्याला हळूहळू ओळख पटत चालली आणि आईसाहेबांच्याबद्दलचा त्याचा आदर एकसारखा वाढत गेला. आपणांकडून त्यांना यत्किंचितहि त्रास पोचूं द्यावयाचा नाही आणि त्यांच्याबद्दलच्या येऊन पडणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या नेकीने पार पाडावयाच्या, असा त्याने आपल्या मनाशीं निश्चय ठरविला होता. विश्राम दर पंधरा दिवसांनी नियमाने घरीं खुशालीचें पत्र लिहूं लागला. तो मुद्दामच कार्डावर लिही आणि 'ती० सौ० मातोश्रींना नमस्कार' असें लिहिण्यास चुकत नसे. अलीकडे विश्रामला घरून येणाऱ्याजाणाऱ्याबरोबर फराळाचे डबे नियमाने येऊं लागले. घरून फराळाचें आल्याचा अनुभव त्याला उभ्या आयुष्यांत पहिल्यानेच येत होता. आईसाहेबांच्या वात्सल्याचा त्याला प्रत्यय येऊं लागला. आईसाहेबांच्याइतकीच ओढ नंदाकडे त्याची लागली होती. विश्रामची मोठी बहीण विश्राम पांचसात वर्षांचा असतांनाच निवर्तली, तेव्हापासून त्याला कुणाचीच संगत नव्हती. विश्राम स्वभावाने लाजाळू. स्नेहीसोबत्यांच्या येथे गेला तरी त्यांच्या बहिणींशीं तो बोलण्याचें मुद्दामच टाळी. याला दुसरेंहि एक कारण होतें. बाजीरावांच्याबद्दल त्या प्रांतांत फारच बोभाटा झालेला

होता आणि तो सगळा विश्रामला माहीत होता. 'बापाचाच मुलगा!' असे कुत्सित उद्गार त्याच्या कानावर कांहीहि न करतां आले होते व त्यालाच तो विशेषेंकरून भीत होता. त्याची बरोबरीच्या मैत्रिणीची भूक तशीच कायम होती. तारुण्यांत माणसांना विजातीय मित्रमैत्रिणींची संगतच जास्त हवीहवीशी वाटते आणि भित्रा विश्राम या नियमाला अपवाद कसा असणार? पण त्याच्या भित्र्या स्वभावामुळेच तो मैत्रिणींची ओळख करण्याच्या मार्गापासून अलिप्त राहिला होता. नाहीतर पहिल्या वर्गात पास होणारा श्रीमंत जहागिरदाराचा एकुलता एक मुलगा असतांना त्याच्याभोवती कितीतरी उपवर मुलीच्या वडिलांनी आपणहून मुलींना आणून सोडलें असतें, कितीतरी स्वैरिणींनी त्याला आपणहून गराडा दिला असता! बहीण मरतांना तिने आईची शेवटची इच्छा विश्रामला कळविली होती. " मोठा झालास म्हणजे गुरुचरित्राची पोथी वाचीत जा. अन् वर्तनानं चांगला रहा. वडिलांच्यासारखा नको निघूस." हे शब्द त्याच्या कानांत नेहमी गुणगुणत. बहिणीने त्याला ते शब्द सांगितले, त्या वेळीं त्यांचा अर्थ समजण्याचें त्याचें वय नव्हतें; पण आता त्याला त्यांचा अर्थ चांगला समजूं लागला होता. गुरुचरित्राची पोथी तो वाचीत असे आणि दुसऱ्या आज्ञेचें योग्य परिपालन होत आहे, याबद्दल तो जागरूक असे. तो सर्व प्रेमव्यापारांपासून अलिप्त असे, याला दुसरेंहि एक कारण होतें आणि तें म्हणजे परीक्षेंत वर नंबर पटकावल्यावाचून त्याची दुसरी कोणतीच महत्त्वाकांक्षा प्रबळ नव्हती. त्याने आपल्या भावना मुद्दाम दृष्टिआड केल्या होत्या, तरी भावना त्याला विसरल्या नव्हत्या. सहज प्रवृत्ति त्याला विसंबली नव्हती. नंदाच्या सहवासाने त्याच्या ठिकाणची विजातीय मैत्रीची ओढ एकदम जागृत झाली, वाढत गेली आणि त्याला आपल्या जीवनाला कुठलीतरी एक अमोघ

शक्ति येऊन मिळाल्याचा साक्षात्कार होऊन, त्याची आयुष्याविषयींची दृष्टि उल्हसित आणि आशामय झाली. नंदाबद्दल त्याच्या मनांत आदर, आस्था हीं उत्पन्न झालीं, हें जितकें खरें, तितकेंच हेंहि खरें की, त्या आदरांत प्रेमाचा ओलावा होता आणि त्या आस्थेच्या बुडाशीं आपले-पणाची भावना होती. नंदाची भेट होण्याची शक्यता घरामुळे आणि घरीं जास्त असल्याने या कारणाने त्याचा घराकडे आपोआप ओढा लागला.

इंदिरेला मात्र या प्रसंगाने अधिकच भांबावून सोडलें. तिच्या संसारसुखाभोवती पसरलेले काटे तिला बोचूं लागले नव्हते, तरी ते अगदी शक्य तितक्या दारुणतेने तिला अगदी थोड्या अंतरावरून भेडसावूं लागले. श्रीमंतीचें ऐश्वर्य पोकळ निघालें, सोज्वलतेची वागणूक बेगडी ठरली, तारुण्याचे बळेच अंगीं बाणलेले छचोर चाळे विपरीत आणि किळसवाणे वाटूं लागले. तिच्या संसारसुखाच्या आकांक्षा चढल्या कमानीला, तर त्यांची परिपूर्तीची तयारी पडत्या कमानीला लागली होती, याचा प्रत्यय तिला हळूहळू येऊं लागला होता. चालू संसारचित्र जितकें कुरूप आणि असंतोषकारक त्याच्या कितीतरी पटीने भावी चित्र निराशाजनक आणि क्लेशदायक तिला दिसूं लागलें. तिच्या मनाचा खंबीरपणा डगमगला, ईश्वराच्या न्यायावरचा विश्वास गडगडला आणि अगदी माणूस म्हणून ती दीन होऊन अंधारांत इकडेतिकडे चाचपडूं लागली. तिला त्या अंधारांत एकच आशेचा किरण आणि एकच सोबती दिसत होता. विश्राम हा तो आशेचा किरण आणि नंदा ही तिची पाठि-राखी. विश्रामासंबंधी तिला पहिल्याने वाटे की, तो आपला द्वेषही करील; पण जेव्हा द्वेष न ठेवतां आपल्याबद्दल आदर दाखवितांना विश्रामला तिने पाहिलें, त्या वेळीं तिला समाधान वाटलें. त्याचा सुखभाव,

प्रेमळपणा, आज्ञाधारकपणा, हुशारी आणि विनय यांमुळे एकदम इंदिरेला त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला. विश्राम वयाने साधारणपणें तिच्याच बरोबरीचा होता. ही एकच गोष्ट तिला वरच्या वर मनाला टोंचे, तिला कावरीबावरी करी. विश्रामबद्दलच्या तिच्या भावना तिने स्वतःच्या मनापासूनसुद्धा लपवून ठेवल्यासारख्या दिसत. त्याच्याबद्दल अहोरात्र विचार तिच्या मनांत येत; पण 'नंदासाठीच मी विचार करीत आहें' असें मनाला बजावून त्याला आशाळेपणापासून ती बचावीत असे. आईचें नातें असलें, तरी तें सावत्रपणाचें आणि मुलगा म्हटला तरी तो स्वतःपेक्षा वयाने थोडासा मोठाच, या दोन कल्पनाच तिच्या मनांत भीतीचें काहूर माजवीत, विश्रामबद्दलच्या कुठल्याही भावनेला स्पष्ट स्वरूपांत जास्त वेळ टिकूं देत नसत. विश्रामचें खुशालीचें आलेलें कार्ड ती नियमाने वाची आणि 'तीº सौº मातोश्रींना माझे नमस्कार' हे शब्द तर ती पुनःपुनः वाची, न्याहाळी. येणाऱ्याजाणाऱ्याबरोबर पाठविलेले फराळाचे डबे, हेच त्या पत्रांचे इंदिरेने पाठविलेले जबाब होते.

# ६

उन्हाळयाची सुट्टी सुरू होतांच नंदा इंदिरेकडे राहण्यासाठी आली होती.

आणि लगेच चारपांच दिवसानी विश्रामही आला; पण या वेळी विश्रामने आपला एक स्नेही भार्गव यास बरोबर आणलें होतें.

भार्गव हा दिसण्यांत विश्रामपेक्षा जास्त देखणा होता. विश्राम आपल्या आईसारखाच रंगाने काळा आणि नाकडोळे साधारणच होते. मात्र तो उंचीने आणि शरिराने मोठा होता. त्याच्या उलट भार्गव हा दिसण्यांत देखणा, नाकींडोळीं सुरेख, रंगाने गोरा, मध्यम उंचीचा, तेव्हा तो जात्याच जास्त गोंडस दिसे. भार्गवाची राहणीहि भपकेबाज असे. विश्राम एवढा श्रीमंताचा एकुलता एक मुलगा होता, तरी त्याच्या मानाने त्याचा पोषाख अगदीच साधा आणि गबाळाच असे आणि खरें म्हटलें तर त्याचें लक्ष्य पोषाखाकडे फारसें नसेंहि. विश्रामाला पोषाखाचा शोक नव्हता, तशा त्याच्या खाण्यापिण्यांत

आवडीनिवडीहि कांही नव्हत्या. लहानपणापासून वसतिगृहांत राहिल्याने पुढे येईल तो जिन्नस खायचा, खावा लागायचा, तेव्हा त्याच्या आवडीनिवडी त्या काय शिल्लक राहणार? भार्गवकडे पाहिलें, म्हणजे वाटे की, हा राजबिंडा कोणीतरी जहागिरदाराचा मुलगा असावा. भार्गवाची घरची साधारण गरीबीच. त्याचे वडील लहानपणींच वारले, आई नर्सचें काम करून पैसे कमावून मुलाचें शिक्षण करीत होती; परंतु भार्गवची राहणी मात्र टापटिपीचीच काय, परंतु श्रीमंतीचीच दिसे. भार्गवच्या कपड्यालत्त्यांत, चालण्याबोलण्यांत, सर्वच बाबतीत अशी रेखीव टापटीप असे की, पाहणाऱ्यावर तो तेव्हाच छाप पाडीत असे.

भार्गव दोनच दिवस राहून परत गेला. नंदाची आणि भार्गवची ओळख विश्रामनेच करून दिली होती आणि त्या तिघांनी मोठ्या आनंदांत हसून खेळून ते दोन दिवस घालविले. भार्गवला गातां चांगलें येत असे, त्यामुळे त्यांच्या करमणुकींत जास्तच भर पडली.

भार्गव जातांच बिश्रामने बाजीरावांना कारभाऱ्यांच्या हातीं कळविलें की, "परीक्षेंत पहिल्या वर्गांत पास होणार आहे आणि पुढे आय्. सी. एस्. चा अभ्यास करण्यासाठी विलायतेला जाण्याचा बेत करीत आहें." दिवाणजींनी परत निरोप विश्रामांना सांगितला, "मालक म्हणतात पाहूं."

दोन दिवसांनी बडे पाहुणे येणार असल्याचें बाजीरावांनी सांगितलें आणि त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली. बाजीरावांच्या येथे इंग्रज अधिकारी आणि मोठमोठे अंमलदार नेहमीच पाहूणचार घेण्यासाठी येत असत. बाजीराव त्यांना आग्रह करीत आणि त्यांच्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करीत. बाजीरावांची महत्त्वाकांक्षा रावबहाद्दुरी मिळविण्याची होती. अजून कुठलीहि पदवी त्यांना मिळाली

नव्हती; पण या अवाढव्य खर्चापायीं कर्जाचा आकडा मात्र एकसारखा फुगत होता. त्यांच्या या नेहमीच्या पाहुण्यांपैकीच हे कोणीतरी असावेत सर्वांना असें वाटलें. कोण पाहुणे येणार आहेत, याचा मागमूसहि त्यांनी दुसऱ्या कोणाला लागूं दिला नाही. नंदाची उत्कंठा वाढत गेली आणि ती इंदिरेला म्हणाली,

"ताई, तुला कसं माहीत नाही कोण येणार तें? तूं त्यांना विचारीत कशी नाहींस?"

"मला विचारून काय करायचं आहे? त्यांना एकट्यानं त्यांचा संसार करण्याची उमेद आहे. मी म्हणतें, नाचेनात एकटे! माझा संसार हा आहे, असं मी कधींच समजत नाहीं, अन् हेहि असंच मला पदोपदी भासवितात की, संसार त्यांचा एकट्याचा आहे, माझं त्यांत कांहीच नाहीं. मी म्हणतें, आपल्याला उपाधी कमी. बरं करतात! उगीच माझा जीव घरादारावर, चीजवस्तूवर लागला, तर त्याच्यासाठी उगीचच्या उगीच तो घोटाळत राहील."

"ताई, अशी ग काय यांची ही तऱ्हेवाईक वागणूक? तुझे वडील, अन् माझे दादा नाही का ग बायकांशीं सगळ्या गोष्टींची वाटाघाट करीत? अगदी भाजी कोणती करायची, त्याची सुद्धा नवराबायको वाटाघाट करतात. अन् हे कुठल्याच गोष्टीचा थांग लागूं देत नाहीत!"

"अग, नवराबायकोंत वयाचं, स्वभावाचं, कुठल्याहि प्रकारचं अंतर असलं, म्हणजे तीं एकमेकांच्या विश्वासाला अंतरतातच! तुझे आईकडचे आजोबा तुझ्या आजीशीं वाटाघाट करतात, म्हणून तुझ्याशीं वाटाघाट करतात का कधी?"

"पण ते म्हातारे, मी लहान मुलगी. माझ्याशीं कशाला ते आपल्या गोष्टी बोलतील ?"

"तोच प्रकार इथं आहे ! अगदी तोच प्रकार !"

"अग, पण तुम्ही नवराबायको ना ?"

"आमचं लग्नच लागलं आहे, तेव्हा नवराबायकोचं नातं कसं नाकबूल करतां येणार ?"

"मग तुम्ही बोलतां तरी काय ?"

"ते बोलतात."

"आणि तू ?"

"मी ऐकत असतें, मनांतल्या मनांत रामनामाचा जप करीत असतें."

"शर्थ असो तुझ्या बावळटपणाची !"

"जावें त्याच्या वंशा, तेव्हा कळे ! मी एवढी खबरदार, सगळ्यांना गप्प करीन, कह्यांत ठेवीन; पण मीच इतकी दीन झालें आहें सर्व प्रकारांनी की, मीच दुसऱ्याच्या कह्यांत गेलें आहे. मला अणूएवढं सुखसमाधान असतं ना कुठल्याहि बाबतींत, तरी मी कर्तबगारी दाखविली असती. सुखाचा सर्वतोप्रकारानं ठणठणाट, अन् जाच, नजरकैदेचा जंजाळ! सांग, तू जरी माझ्या ठिकाणीं असतीस, तर काय केलं असतंस ?"

"मग इतकं होतं तर यांनी लग्न तरी कशाला केलं ?"

"त्याचाहि उलगडा त्यांनी करायचा ठेवला नाही बरं ! म्हातारपणीं शुश्रुषेसाठी माणूस पाहिजे, म्हणून लग्न केलं आहे, असं ते म्हणतात नेहमी. माझं पुढं बोलणंच खुंटलं ! मी मनांत ठरवलं की, हा

माझा मुळी संसार नाहीच आहे, तर मला ते विचारांत घेत नाहीत, त्यांत वाईट वाटण्याचं कांहीच कारण नाही."

त्यांचें पुढचें बोलणें तसेंच त्यांना मध्यंतरीं सोडावें लागलें. कारण पाहुणे आल्याची वर्दी आली. दोघींहि उत्कंठेने कोण मंडळी आली आहेत, तें पाहण्यासाठी मार्डाच्या दाराआडून पाहूं लागल्या.

एक मध्यम वयाचे गृहस्थ आणि त्यांच्याबरोबर एक अठरा-एकोणीस वर्षांची तरुणी, असे हे दोन मुख्य पाहुणे व त्यांच्याबरोबर एक गडी, एक हुजऱ्या, अशीं मंडळी एका खाजगी मालकीच्या मोटारी-तून उतरतांना दिसलीं. "ही या म्हाताऱ्याची तिसरीचौथी बायको दिसते आहे." असें नंदा म्हणाली. "इकडचे स्नेही असेच एकेक असायचे! इकडचे स्नेही एकत्र जमले म्हणजे म्हाताऱ्यांचा पांजरपोळच थाटलेला दिसतो. कुणाला दिसत नसतं, तर कुणाला ऐकूं येत नसतं, कुणाचे दात पडलेले असतात, तर कुणाचे सांधे धरलेले असतात अन् त्यांच्या गोष्टीसुद्धा औषधपाण्याच्या, झोप न येण्याच्या, अन्न न सोसण्याच्या! अन् त्यांच्या त्या गोष्टी ऐकल्या, म्हणजे माझ्या काळजांत चर्रर होतं; यांचे स्वाभाविक विचार आणि माझे विचार यांच्यांतलं अंतर फारच दिसूं लागतं. चल, खाली जाऊन बघूं." दोघी जणी खाली आल्या.

त्या तरुणीचें नांव आशादेवी होतें आणि ती एका संस्थानिकाची मुलगी होती आणि तिच्याबरोबर आलेले गृहस्थ तिचे मामा होते. मामांनी आपल्या बरोबरीचीं माणसें शोधून काढलीं. कारभाऱ्यांच्या खोलींत आणि संगतींत दोन दिवस चिलीम ओढून ते आनंद करीत होते.

आशादेवी अर्थात् घरांत बायकांतच वावरत होती आणि नंदाची तिची अन्नारसें गाठ पडली. आशादेवी स्वरूपाने सुरेख होती.

तिचे नाकडोळे नीटस, रंग गोरा, शरिराने सडपातळ आणि उंची यांमुळे तिच्या ठिकाणीं सौंदर्याचें चंचल तेज आणि आविर्भावांतील नटवेपणा यांचाच प्रादुर्भाव विशेषेंकरून दिसून येई. विशेषतः तिच्या वागण्यांत मोकळेपणा आणि ऐट हीं दिसत. तशांत तिचे कपडे उंची आणि क्षणोक्षणीं पालटणारे व आधुनिक सौंदर्यसाधनांच्या मदतीने नटलेली तिला पाहून नंदा पराजयाच्या कल्पनेने खजील झाली. नंदा स्वरूपाने चांगली म्हणजे चारचौघीजणींसारखी होती. तिला कपड्यालत्त्याची जोड नव्हती. ती आपल्याकडून पुष्कळ धीटपणाने वागत होती, मोकळेपणाने बसतबोलत होती, तरी आशादेवीच्या मानाने तिचें वागणें अगदीच जुन्या वळणाचें आणि भेकड ठरलें.

आशा सगळ्यांशींच बरोबरीच्या नात्याने वागत होती. एवढे बाजीराव तेहि तिची अगदी थुंकी झेलीत होते आणि आशाहि अशी वस्ताद क़ी, बाजीरावांना ती यथेच्छ राबवीत होती. बाजीरावांचे ते पोरचाळे पाहून इंदिरेच्या तळव्याची आग मस्तकाला गेली आणि ती नंदाला म्हणाली, " पाह्यलंस ? पोरीसोरी, दुसऱ्यांच्या बायका पाह्यल्या म्हणजे कसे अगदी रंगून जातात ते ! गंभीरपणा, म्हातारपण सगळं बायकोच्या वेळेला ! ! "

" ताई, " नंदा म्हणाली, " तुझा उगीच भलता ग्रह झाला आहे. माझ्याशीं नाही ग, कुठं ते लघळपणा करीत ? "

" पण मी चोवीस तास तुझ्या पायाशीं पाय बांधून असतें ना ? "

आशा जेव्हा विश्रामशीं जास्त सलगीने बोलूंबसूं लागली, तेव्हा नंदा आंतून कासावीस झाली. आशा इंग्रजी चांगली बोले, मोटार स्वतः हाकी, टेनिस् वगैरे खेळ तिला येत आणि तिला पुरुषांशीं बोल-

ण्याची सवय असल्यामुळे ती विश्रामशीं एखाद्या पुरुषमित्राप्रमाणे बोले, त्याची थट्टाहि करी. तिने विश्रामला मळा दाखवायला चला म्हणून म्हटलें व आपण एकटीच मोटारींत हाकण्याच्या जागेवर बसली आणि गड्याला बरोबर येऊं नकोस, म्हणून म्हणाली. विश्राम मोटारींत बसायला गेला, त्या वेळीं त्याने तो प्रकार पाहिला. शिवाय आशेने विश्रामला आपल्या जवळ पुढच्या सीटवर बसण्याची विनंती केली. दारांत नंदा येऊन उभी राहिली होती. विश्राम वरमला आणि म्हणाला, " आपण नंदाला बरोबर घेऊं. नंदाताई, तुम्ही चला आमच्याबरोबर. हं, बसा पुढं अन् त्यांना वाट दाखवा. मी मागच्या सीटवर बसतों. "

तीं तिघें मळ्यांत आलीं. इकडेतिकडे हिंडतांना ती आपापसांत बोलूं लागलीं. पोषाखावरून सहज बोलणें निघालें.

" माणसांनी पोषाखांत साधेपणा ठेवावा, नाही ? " नंदा म्हणाली.

विश्राम– अन् माझंहि तसंच मत आहे.

आशा– वाहवा ! मी म्हणत होतें मनाशीं की, तुमचा हा बावळट पोषाख तुम्ही चुकून केला असेल; पण काय म्हणतां ? माणसांनी साधा म्हणजे असला बावळट पोशाख करावा ? वा: ! चांगलं !! दुसऱ्या वर्गाचे सरदार, घरचे जहागिरदार अन् बी. ए. च्या परीक्षेंतहि पहिल्या वर्गांत पास होणारे ! अन् पोषाख काय आहे पण !

विश्राम– काय बुवा ? पोषाखांत काय कमी आहे ? नंदाताई, तुम्ही सांगा !

आशा— नंदाताईंना कशाला विचारतां ? एखाद्या कामकरी बाईला विचारा ! तुम्ही आय्. सी. एस्. ला जाणार आहांत ना ?

विश्राम— बरं, मग पोषाखाचा त्याचा काय संबंध ?

आशा— काय संबंध? अशा बावळट पोषाखांत गेलांत तर तोंडी परीक्षेंत नापासच व्हाल. मला स्वतःला नाही आवडत माणसांनी असं गैदीपणानं राहिलेलं!

विश्राम— हा ज्याच्यात्याच्या आवडीनिवडीचा प्रश्न आहे. मला तर त्यांत कांहीच गैर दिसत नाही.

आशा— खरंच, विश्राम, तुम्ही शाकाहारी की मांसाहारी आहांत?

विश्राम— अर्थात् शाकाहारी. मी अजून अभक्ष्यभक्षण केलं नाही.

आशा— अभक्ष्य मीहि भक्षण केलं नाही. मांसाहार मात्र करते. मांसाहार कां करते म्हणून विचाराल तर तो अभक्ष्यभक्षण नाही म्हणून!

नंदा— आशादेवी, रोज गुरुचरित्राचा एक अध्याय वाचल्या-शिवाय तोंडांत अन्न न घालणारे मांसाहार कसा करतील?

आशा— म्हणजे मि० विश्राम, तुम्ही गुरुचरित्राची पोथी वाचतां की काय?

विश्राम— होय!

आशा— कमालच केलीत की! या कालांत खौरीशास्त्री, भटजी-सुद्धा कुणी गुरुचरित्र हातांत धरणार नाहीत आणि तुम्ही आपले पोथी वाचतां? काय म्हणावं तुम्हांला?

विश्राम— मी वाचतों आणि जिवंत जीव आहे तोंवर पोथी वाचणार!

आशा— मग तुमचे वडील बरेच सुधारलेल्या मताचे दिसतात!

नंदा— कशावरून?

आशा— नाही, ते मला कालच म्हणाले की, ते स्वतः मधून-मधून मांसाहार घेतात म्हणून.

विश्राम— आईबापांपैकी कुणाचंतरी वळण उचलायचं ना? मी आईचं वळण उचललं. ती गुरुचरित्र वाची. मी वाचावं अशी तिची शेवटची इच्छा होती, ती पुरी करणं मुलगा म्हणून माझं कर्तव्य आहे.

आशा— असं बघा! हे खुळे प्रकार आता सोडून दिले पाहिजेत तुम्हांला! उद्या तुम्ही आय्. सी. एस्. साठी जाणार, तर काय दशम्या खाऊन दिवस काढणार? परीक्षा पास झाल्यावर युरोपियन् लोकांच्या इथं पार्ट्यांना जाणार, तर काय वऱ्याचे तांदूळ बरोबर बांधून नेणार?

विश्राम— पाहूं पुढं. मांसाहार करायला कांही धारिष्ट लागत नाही. तो नाकारण्यांत मात्र मनाचं धैर्य लागतं!

आशा— उलट बोलताहां! मांस न खाण्यांत भेकडपणा; मांस खाण्यांत धैर्य असतं!

विश्राम— महार घेड धैर्यवान् ठरतात तर? अन् मांजरंकुत्रीं तर सर्वांत पराक्रमी ठरतात, नाही?

आशा— वाहवा! तुमचं हें अजब तर्कशास्त्र ऐकून मी तर आश्चर्यानं थंड झालें. तर्कशास्त्रांत तुम्ही नैपुण्य मिळविलेलं दिसतं?

विश्राम— नैपुण्य कुठल्याच विषयांत नाही मिळवतां आलं. पहिले नंबर मिळविले आहेत फक्त!

आशा— एकंदरींत घडे रिकामेच म्हणायचे?

आशा एवढ्या मोठ्याने, इतक्या उद्दाम कुत्सितपणाने हसली की, विश्राम खजिल झाला. त्याने वरकरणीं हसून वेळ मारून नेली;

पण तें उसनें हसूं हृदयांत झालेल्या अपमानशल्यावर पांघरूण घाल-ण्याचा वृथा प्रयत्न करीत होते.

नंदाने सर्व हकीगत इंदिरेला सांगितली. " बरं झालं, विश्रामला तिचा स्वभाव कळला. नाहीतर त्याचा काय नेम? आशाही उल्लू अन् विश्राम तरी बापाचाच मुलगा. मला या दोघांच्या ओळखीचं काय पुढं होणार, याची काळजीच पडली होती."

आशा घरांत वावरतांना इंदिरेला अगदी कस्पटासमान मानी. नंदा इंदिरेची नातलग होती, हें आशेला माहीत होतें; पण आशा नंदाच्या अगर इंदिरेच्या भावनांची मुळीच पर्वा करीत नव्हती. ती नंदाला म्हणाली, "इंदिराबाई विश्रामच्या सख्ख्या आई शोभतात! रूपानं, रंगानं मी नाही हो म्हणत! रूपाबद्दल माणसांनी दुसऱ्याला नांवं ठेवूं नयेत, असं म्हणतात ना? म्हणून बोलतां येत नाही; पण स्वभावानं अगदी सारखीं, जुन्या, बुरसलेल्या विचारांचीं, खुळ्या समजुतींचीं आहेत, नाही दोघं? बाजीरावांना कांही ही बायको शोभत नाही. वयानं नाही हो म्हणत! बाजीराव अगदी सुधारक आहेत, स्त्री-स्वातंत्र्याचे कैवारी आहेत; पण याच जुन्या काळच्या, त्यामुळे त्यांचा नाइलाज आहे, असं ते म्हणत होते."

आशा निघून गेली. इंदिरा, नंदा आणि विश्राम यांना हायसें झालें. एका संस्थानिकाची मुलगी दोन दिवस पाहुणी येते व जाते, या गोष्टीचें सर्वांनाच कोडें पडलें. बाजीरावांनी कांही थांग लागूं दिला नाही; पण लगेच तिसऱ्या दिवशीं त्या गोष्टीचा उलगडा व्हावा, अशी हकीगत घडून आली.

विश्राम पहिल्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा पास झाल्याची तार

आली आणि पाठोपाठ दुसरी एक तार आली. त्या दोन्ही तारा बाजी-रावांनी विश्रामकडे वाचण्यासाठी पाठविल्या. दुसऱ्या तारेंतला मजकूर वाचून विश्राम बुचकळ्यांत पडला.

" असामान्य यशाबद्दल अंत:करणपूर्वक अभिनंदन. पसंत आहे. पुढील बोलणें करण्यासाठी कुठें भेटतां, तें कळवावें. वाट पहात आहोंत."

— राजासाहेब.

विश्रामने तर्कानें दुसऱ्या तारेचा आशय काढला आणि " या दुसऱ्या तारेशीं माझा कांही संबंध नाही," असा त्यावर शेरा करून ती गड्याहातीं परत बाजीरावांच्याकडे पाठविली.

रात्रीचीं जेवणें झाल्यावर बाजीरावांनी विश्रामला एकट्याला माडीवर बरोबर नेलें आणि थोड्याच वेळाने दोघांचे मोठमोठ्याने भांडल्या-सारखे आवाज ऐकूं येऊं लागले. इंदिरा हळूच वर गेली. तिच्या कानी दाराआडून पितापुत्रांचा संवाद ऐकूं आला, तो असा–

" एवढी संस्थानिकाची मुलगी सांगून आली आहे. तरी तूं का नाही म्हणतोस ? "

" मी सांगितलं ना, की मला आय्. सी. एस्. ला जायचं आहे म्हणून! तूर्त मला लग्न करायचं नाही. "

" आय्.सी. एस्. ला जायचं म्हणतोस, तर पैसे कोठून आणणार ? पंधरान् वीस हजार तुला खर्चाला लागणार, तर आणायची कुठून एवढी थोरली रक्कम ? "

" कर्ज काढाव ! "

" पूर्वीचंच कर्ज एवढं झालं आहे की, उत्पन्नांतून व्याजसुद्धा भागणार नाही. जास्त कर्ज आता कुणी देणार नाही. "

“मग सोनंनाणं विकून टाका !”

“दागदागिने विकून टाकून मी आपल्या बायकोला काय भिकेला लावूं होय ? तूं आयू. सी. एस्. झाला नाहीस, तरी त्याची मला पर्वा नाही. सारे दागदागिने तिचे आहेत, समजलास ?”

“माझ्या आईचे कांहीच का दागिने नाहीत ?”

“दागदागिने माझ्या मालकीचे होते सगळे. मी हिला सगळे देऊन टाकले आहेत.”

“बरं, माझी मी पाहतों कर्ज उभारण्याची व्यवस्था करून. हिंदु विद्यार्थ्यांना परदेशांत जाण्यासाठी कर्ज देणारी एक संस्था आहे, तिच्यांतून मला कर्ज मिळणार आहे.”

“कशावर ?”

“मिळकतींतल्या माझ्या निम्म्या हिश्श्यावर ?”

“पाहतों कोण तुला कर्ज देतों ते ! निम्मा हिस्सा ? मी जिवंत आहें, तोंवर तुझा काडीचाहि हक्क नाही. अन् मी चालूं देणार नाही !”

“बरं ! मी जातों. पुढं बोलण्याचं कांही रहात नाही.”

“विश्या ! ऐक. मी राजेसाहेबांना शब्द देऊन बसलों आहे.”

“कशाबद्दल ?”

“की आशाला मी करून घेईन.”

“मग, लावा तिच्याशीं लग्न ?”

“हें तूं काय आणि कुणाला बोलतो आहेस ?”

“आपल्यालाच उद्देशून बोलत आहें.”

" तूं तिच्याशीं लग्न केलंस अन् नंतर आय्. सी. एस्. ला गेलास, तर ते सगळा खर्च देणार आहेत."

"मला साफ नको आहे. मी तिच्याशीं लग्न लाऊन परदेशीं जाणार आणि तिच्या बापाच्या खर्चानं ?"

" त्यांत काय झालं ?"

" आपला अपमान करूं इच्छीत नाहीं, म्हणून पुढं काय होईल तिचं, तें मी सांगूं इच्छीत नाही. मला जास्त बोलण्याची इच्छा नाही."

विश्राम तेथून दाणदाण पाय आपटीत निघून गेला. बाजीराव रागाने मोठमोठ्याने ओरडत होते, विश्रामला अद्वातद्वा बोलत होते. इंदिरेचा त्यांच्यापुढे जाण्याचा धीर होईना आणि बराच वेळ तसेच ते. बडबडत होते.

नंतर ते आपल्या निजण्याच्या खोलींत आले आणि इंदिरेला म्हणाले,

" पाह्यलंत ? काय कारटा उद्दाम झाला आहे ? यापेक्षा नापास झाला असता, तरी बरं होतं. मी आशादेवीच्या वडिलांना शब्द देऊन बसलों, आता माझ्या तोंडाला काळं फासण्याची वेळ आली ना ? अन् आपलीं दोन इनाम गावं त्या संस्थानच्या ताब्यांत आहेत. राजेसाहेब रागावतील, आपली इनामं खालसा करतील; पण या कारट्याला त्याची काय गुमान आहे ?"

"येऊनजाऊन ते विलायतला जाण्याचं म्हणतात, एवढंच ना ? मग मी म्हणतें घरांतले दागदागिने मोडायला काय हरकत आहे ? नाहीतरी मी ते कधी घालतच नाहीं."

" तुम्ही गप्प बसा ! यांतलं तुम्हांला कांही समजत नाही."

" मी आपल्या दागिन्यापुरतंच बोलतें !"

" दागिने तुमचे नाहीत, समजलांत ? "

" मग कुणाचे आहेत ? "

" माझे आहेत, माझ्या मालकीचे आहेत. माझ्या मनाला येईल, त्याला मी देईन."

" मग माझा मालकीचा असा कांहीच कां जिन्नस नाही त्यांत ? "

" मंगळसूत्राशिवाय कांहीसुद्धा दागिना तुमच्या मालकीचा नाही. या घरांत तुमची काडीचीहि सत्ता नाही. सगळ्याचा मालक मी आहें, समजलांत ? "

" मी जाणूनच होतें सगळं! एकदा तोंडून वदवायचं होतं, तें वदलांत. चांगलं ! "

असें म्हणून इंदिरा ताडकन् जागेवरून उठली. तिने हातांतल्या गोठपाटल्या, कानांतलीं कुडीं भराभर ओरबाडून बाजीरावांच्या पुढे फेकून दिलीं, दार दाणकन उघडलें आणि बाहेर पाऊल टाकणार, इतक्यांत बाजीराव कडाडले–

" माघारी ये! कुठं चाललीस? "

" माझं डोकं ठिकाणावर नाही. मला जाऊं द्या ! "

" मी तुला सांगतों आहे. जायचं नाही."

" मी ऐकलं तें! अन् मी जाणार."

"कशी जातेस तें पाहतों!" बाजीरावांनी तिचा हात धरण्याचा प्रयत्न केला; पण इंदिरेनं असा हिसका दिला की, तेहि त्या धक्क्याने मागे सरले. इंदिरेच्या शक्तीचा त्यांना पहिल्यानेच अनुभव आला आणि तिच्या रागीट स्वभावाची त्यांना पहिल्यानेच ओळख झाली; आणि ह्या दोन्ही गोष्टींमुळे इंदिरेला ताब्यांत ठेवणें आपल्या आटोक्याच्या बाहेरचें आहे, असें त्यांना कळून चुकलें. त्यांनी कच खाल्ली, ते दोन पावलें मागे झाले आणि म्हणाले, "हें तूं चांगलं नाही करीत!"

"आजवर मी चांगलं वागून पाह्यलं. कुणाला किंमत नाही चांगल्या वागण्याची! दुसऱ्याला उपदेश करण्याच्या अगोदर स्वत:च्या पायाशीं काय जळतं आहे, तें पहावं माणसांनी! माझं या घरांत कांहीच नाही राह्यलं आता! अन् मी आता कुणाला भीत नाहीं."

"लग्नाच्या बायकोला हें असलं बोलणं शोभत नाही."

"आणि नवऱ्यांनाही असलं करणं शोभत नाही."

"काय करणं शोभत नाही?"

"मी उच्चार करीत नाहीं! लग्नानंतर तरी बाहेरख्यालीपणा शोभत नाही पुरुषांना!"

"हें तूं काय बोलते आहेस?"

"मी डोळ्यांनी पाहतें रोज तेंच बोलते आहें. मोलकरणी, कामकरी बाया यांच्याशीं चाललेले चाळे मी सगळे पहात असतें, बरं का?"

"तूं म्हणतेस हें शक्य तरी आहे का? तुला माहिती आहेच की माझ्यांत शक्ति उरली नाहीं आता?"

"माझ्यापुरतीं तीं सगळीं ढोंगं आहेत. शीः! एकंदर वागणूक पाह्यली की, शिसारी येते. नंदा," खोलीच्या बाहेर डोकाऊन इंदिरा पुढें म्हणाली, "तूं आपल्या खोलींत पुढं हो. इथं काय ऐकत उभी राह्यली आहेस?"

बाजीराव जागच्या जागीं स्तब्ध उभे राहिले.

इंदिरा नंदाच्या खोलीत येतांच तिने आवाज होईल इतक्या मोठ्याने दार धाड्कन् लावलें, आणि आंतून कडी लावली.

नंदाच्या गळ्यांत पडून ती ओक्साबोक्सी रडूं लागली.

# ७

विश्राम आय्. सी. एस्.च्या परीक्षेसाठी विलायतेला निघून गेला. बाजीरावांनी कुठून तरी कर्ज काढलें आणि विश्रामला परदेशांत लागणाऱ्या खर्चाची तरतूद केली.

विलायतेस जाण्याच्या अगोदर विश्रामने इंदिरेचा निरोप घेतला, त्या दिवशीं अनायासें बाजीराव परगावीं गेले होते; त्यामुळे नंदा, इंदिरा व विश्राम यांना तरी मनमोकळेपणाने बोलतां आलें. इंदिरेने आपणहून गुरुचरित्राची पोथी रोज वाचण्याचें आणि गुरुवार करण्याचें कबूल केलें. विश्रामने नंदाला खुशालीचें पत्र धाडण्याचें कबूल केलें.

विश्राम विलायतेला गेल्यावरसुद्धा नंदा दर सुट्टींत इंदिरेकडे राहण्यास येई. नंदाच्या आईवडिलांची अशी समजूत झाली की, नंदाचें आणि विश्रामचें लग्नाचें नक्की ठरलें आहे. म्हणून नंदाला वरचेवर इंदिरेकडे राहण्यास येतां येई. नंदाला विश्रामचें खुशालीचें पत्र येई व नंदा तीं सर्व पत्रें इंदिरेला दाखविण्यासाठी बरोबर घेऊन येई. त्या

पत्रांत इंदिरेबद्दलहि खुशाली विचारलेली असे, आणि नंदा विश्रामला उत्तरें लिही, त्यांत इंदिरेची खुशाली कळवीत असे.

विश्राम विलायतेला गेला आणि बाजीरावांच्याकडची सर्व परिस्थिति एकदमच पालटली. कर्जाचा बोजा वाढल्यामुळे सावकारांचे तगादे होऊं लागले. बाजीराव सावकारांना वायदे करतांना अगदी रंजीस आले. तथापि दरेकास बाजीराव आश्वासनें देत की, " विश्राम वर्ष-सहा महिन्यांत कलेक्टर होऊन येईल, अन् सर्वांचे पैसे तेंव्हाच आपण फेकून देऊं." सावकारहि ह्या आश्वासनावर विसंबून परत जात.

बाजीराव आणि इंदिरा यांचीं मनें दिवसेंदिवस जास्त-जास्तच विटत चाललीं. नंदालाहि त्यांचा बेबनाव कांही माहीत नव्हता, असें थोडेंच ? परंतु तिच्या नजरेस त्या बेबनावाचें निकराचें स्वरूप पडलें, तेंव्हा तीहि विस्मय पावली. इंदिरा नंदाच्या खोलींतच निजूं लागली होती. नंदाने तिला विचारलें,

" ताई, तूं माझ्या सोबत कशाला निजतेस ? "

" अग, तसं नाही ! पण गप्पागोष्टी बोलतां येतात. "

" मग दिवसभर आपण काय कमी गोष्टी बोलतों ? "

" मी याच खोलींत आताशा एकटी निजत असतें. "

" कां ? "

" कां म्हणजे ? आता मला असंच राहण्याची सवय केली पाहिजे ! "

" कां म्हणून ? "

" कां म्हणून काय विचारतेस ? असंच आता. "

" पण बाजीरावांना बरं पसंत पडतं ? "

" त्यांनीच सांगितलं की, तुम्ही आपल्या आता देवधर्माला लागा."

" म्हणजे ?"

" आमच्यांतलं नवराबायकोचं नातं केव्हाच संपलं आहे. मला कुठं जायला जागाच नाही, म्हणून केवळ पोटाच्या लाचारीनं या तुरुंगखान्यांत पडून रहावं लागतं."

" हा तुरुंगखाना म्हणतेस ?"

" तुरुंगखान्यापेक्षाहि वाईट ! माझ्यावर एकसारखी पाळत ठेवतात, की काय करतें, काय वाचतें, कुणाशीं बोलतें, कुणाकडे पाहतें. माझी ट्रंक धुंडाळतील, फणी—करंड्याची पेटी शोधून पाहतील, केरांत पुड्याचं चिटारं सापडलं तरी तें उजेडांत नेऊन उलटपालट करून पाहतील; पण ज्याला कर नाही, त्याला डर तरी कसली ? मी म्हणतें, खुश्शाल पहारे ठेवा. मला राग येतो, तो याचा मुळीच नाही. बायकोला जपण्याचा प्रत्येक नवऱ्याला हक्क आहे. त्यांतून मी म्हाताऱ्याची तरुण बायको! पण मला संताप येतो तो अशाचा."

" कशाचा ?"

" की स्वत:चे पोरचाळे मात्र कमी न होतां उलट वाढत आहेत. जों जों वय झालं, तों तो छचोरपणा वाढतच चालला आहे. शी: ! घाणेरड्या बायकांशीं लगट काय करतात ! अशांशीं संपर्कहि ठेऊं नयेसं वाटतं. मी म्हणतें, त्यांनी होऊनच सांगितलं संबंध सोडायला, सुटलें मी त्या किळसवाण्या जिण्यांतून !"

"त्यांनी आपलं खुश्शाल तुला सांगितलं, की तूं आपली निराळी रहा म्हणून ?"

"आमच्यामधलं सगळं संपुष्टांत आलेलंच होतं. कांही अर्थ नव्हताच राह्यला."

"पण तुझं सगळं आयुष्य कसं जाणार ?"

"याचा विचार माझ्या वडिलांनीं करायला पाहिजे होता! पस्तीस–चाळीस वर्षांचं अंतर असलेल्या म्हाताऱ्याला आपण मुलगी देतो, तर तिला संसारसुख मिळायचंच नाही, हें काय त्यांना दिसलं नसेल थोडंच ? पण मी कुणालाच दोष देत नाही. दैवाला दोष देतें. ज्यांचे नवरे लहानपणीं मरतात, त्या नाही का तशाच दिवस काढीत? मग मीहि तसेच दिवस काढीन."

"एवढं वयाचं अंतर नवराबायकोंत असूं नये, नाही ?"

"वयांतच काय ? पण स्वभावांत, आवडीनिवडींत, परिस्थितींत, वागणुकींत, कशांतच अंतर असलं की, तीं सुखाला अंतरलींच म्हणून समजावं."

"आणि स्वरूपांतलं अंतर ?"

"तेंहि फार असूं नये. अगदी सुस्वरूप आणि अगदी कुरूप अशा जोडप्याला सुख लागणं कठीण."

"आशादेवी आली होती. मला भीति वाटत होती. त्याचा काय नेम ? स्वरूपानं ती सुरेख अन् श्रीमंताची मुलगी! विश्रामशीं लग्नाचं तिचं नक्की होणार, अशी मला धास्ती पडली होती."

"अग, अजून त्याचा काय नेम सांगावा? मलासुद्धा एक

*

माझ्या बरोबरीच्या वयाच्या मुलाचं स्थळ पाह्यलं होतं. नक्कीहि झालं होतं; पण वडिलांनी तें नाकारलं. कां? तर तो गरिबाचा म्हणून. श्रीमंताच्या घरांत द्यायची होती, मग मुलगी जन्मभर तडफडत राहिली तरी याची कुठं त्यांनी पर्वा केली?"

"तसं नाही, पण विश्रामचं आशेशीं पटलं नसतं. मुळी-मुळी पटलं नसतं कधीसुद्धा!"

"विश्राम शांत स्वभावाचा आहे. कुणीतरी एकानं पड खाल्ली ना, म्हणजे जमतं."

"जमतं असं नाही, पण उघडीक होत नाही, असं म्हण."

"असंच कां म्हणेनास!"

"अन् भार्गव कसा टापटिपीनं राही, नाही? पाहिली, तर त्याची गरिबी. स्वरूपानंहि कसा सुरेख आहे, नाही?"

"भार्गवची कशानं आठवण झाली ग तुला?"

"कशानं असं नाही, पण उगीच! मला काय त्याच्याशीं करायचं आहे म्हणा? पण उगीचच आठवण झाली."

"नंदा, तुला बजाऊन ठेवतें. नवरा गरीब असला तरी आपल्या बरोबरीचा पहा ग बाई! मग तो रूपानं तुझ्यासारखा साधारण असला तरी चालेल. दोघांचे स्वभाव पटतील असं पहा. रूप, श्रीमंती हीं वरवरचीं लक्षणं आहेत. स्वभाव जमले नाहीत, तर सगळ्या संसाराचं मातेरं होतं. अन् स्वभाव जमले असले म्हणजे मग त्यांच्यांत सुरूप-कुरूप लहान-मोठं, असा भेदच उरत नाही."

"एकंदर संसाराचा घरोघरीं चाललेला चिचका पाह्यला म्हणजे

वाटूं लागतं की, मुळी लग्नच करूं नये. यंदा मी जर मॅट्रिक पास झालें, तर खूप शिकेन पुढं. लग्न करणारच नाहीं."

"उद्याच्या गोष्टी कुणी सांगाव्यात ? मी लहानपणीं बिजवर नवऱ्याची अशी कांही टवाळी करीत होतें की, कांही विचारूं नकोस! पण देवानं कसं नेमकं माझ्या नशिबीं तेंच आणलंन् !"

# ८

विश्राम आय्. सी. एस्. ची परीक्षा नापास झाला.

आणि हें वर्तमान येऊनं पोहोचतांच बाजीरावांच्या घरांत आणि परिस्थितींत एकाएकीं मोठा स्फोट झाला. बाजीरावांनी ही बातमी ऐकतांच संतापून अद्वातद्वा बोलण्यास सुरवात केली. "कारटा नापास झाला, त्याऐवजीं मेला कां नाही? आता मी या सावकारांना कोणत्या तोंडानं थांबण्यास सांगूं? राजेसाहेबांना तरी मी काय जबाब देऊं? विश्या, खात्रीनं सांगतों की, विलायतेला कांहीतरी वाईट मार्गाला लागला आणि म्हणून नापास झाला. त्याचं तोंडसुद्धा मी पाहणार नाहीं." हे त्यांचे शिव्याशाप इंदिरेलाच काय, परंतु गडीमाणसें आणि नोकर यांनाहि ऐकवेनात. त्यांचे कारभारी शेवटीं येऊन म्हणाले, "मालक, आपणांला एकच्या एक चिरंजीव हयात राहिले आहेत. सर्व दौलतीला एकटेच काय ते मालक आहेत. अन् परीक्षेंत नापास झाले असतील, तेव्हा इतका राग करण्याचं कारण नाही." पण त्यांनाही त्यांनी "आपली पायरी ओळखून

बोला!" असें सांगतांच ते हिरमुसले होऊन निघून गेले. बाजीरावांची आरडाओरड थांबली, तरी त्यांचा संताप कांही थांबला नव्हता आणि कुणाजवळ तरी राग ओकून टाकावा, या हेतूने ते इंदिरेपाशी म्हणाले–

"विशा अगदी कुचकामाचा निघाला. याच्यापेक्षा मेला असता, तरी पुरवता!"

"हें पहा, मला असलं वेडंविद्रं बोलणं ऐकण्याची सवय नाही. विश्रामांनी मरून जावं, तर काय आपण म्हाताऱ्या माणसांनी हजार वर्षं जगायचं का आहे त्यांच्याऐवजीं?"

"विशा माझा मुलगा आहे. मी त्याच्याबद्दल वाटेल तें बोलणार, समजलीस?"

"माझ्या देखत बोलूं नये."

"कां?"

"त्यांच्याबद्दल असलं अभद्र बोललेलं मला खपत नाही. माणसाचे विकार कांहीतरी ताब्यांत असावे लागतात. सगळ्याच बाबतींत उल्लूपणा शोभत नाही, आता या वयाला!"

"या वयाला म्हणजे?"

"म्हणजे म्हातारपणांत! पोटच्या पोराबद्दल जर असं बोलतां, जर असं तुम्हांला वाटतं, तर माझ्यासारखीबद्दल काय वाटत असेल?"

"मी म्हातारा आहें? अन् तुम्हीमात्र तरण्या आहांत का?"

"मीहि पण मनानं म्हातारीपेक्षा म्हातारी झालें आहे. पोटच्या पोराबद्दल असलं हें बोलणं मुळीच शोभत नाही."

" पण तुम्हांलाहि सावत्र मुलाची कड घेऊन माझ्या तोंडाशीं तोंड देणं शोभत नाही."

" कां म्हणून ?"

" मी ओळखत नाहीं, असं नका समजूं! तो तुमच्या बरोबरीचा आहे, म्हणून त्याच्याकडे जास्त ओढा असतो तुमचा."

" कशावरून ?"

" तुम्ही त्याच्या फोटोकडे सारख्या येतांजातांना पहात होतांत कीं नाही ?"

" अन् म्हणून का त्यांचा फोटो काढून टाकला तिथून ?"

" होय. माझ्याशिवाय दुसऱ्या कुणाहि पुरुषाकडे तुम्ही पाहतां कामा नये."

" पण विश्राम माझा मुलगा नव्हे का ? तो परपुरुष का आहे ?"

" तुमचा तो सावत्र मुलगा आहे."

" तिऱ्हाईत तरुण मुलीचा ती झोपेंत असतांना मुका घेतां, तें चालतं! अन् मी मुलाची प्रत्यक्ष आई, तिनं मुलाच्या फोटोकडे पाहिलेलं चालत नाही ? नवल आहे!"

" मला हें असं खपायचं नाही."

" आणि मलाहि असलं भलतंसलतं बोलणं खपायचं नाही."

" काय कराल तुम्ही ?"

" मी काय करणार ! माझ्या हातांत सत्ता असती, तर यापूर्वीच करून दाखविलं असतं काय करायचं तें. मी या कैदखान्यांत तडफडत

"नवऱ्याचं घर तुम्हांला कैदखाना वाटतो? त्याच्या घरांत राहणं, म्हणजे तडफडत राहणं असं वाटतं?"

"हज्जार वेळा कैदखाना वाटतो. तुम्हीच विचार करा की, मला तुम्ही कैद्यासारखं वागवतां कीं नाही तें! आता आपल्यांतला नवरा-बायकोचा संबंध काय शिल्लक राहला आहे?"

"संबंध सुटला, त्यालाहि तुम्हीच जबाबदार आहांत."

"तुमच्याच बदफैलीपणामुळं किळस येऊन संबंध सुटला. मी म्हणतें, सुटलें मी नरकवासांतून."

"तुम्हांला माहीत आहे की, मी म्हातारा झालों, अन् माझ्यांत आता कांही राम राहला नाही, अन् तुम्हीच माझ्यावर बदफैलीपणाचा आरोप करतां?"

"दर घडीला जर मी छचोर चाळे पाहतें आहे, तर ...."

"बस्, बस्."

"मीहि सांगून ठेवतें. तुमच्याशीं बोलण्यानं माझ्यासुद्धा डोक्याला त्रास होतो. कामाशिवाय बोलणं नकोच आता."

बाजीराव संतापानें लाल झाले. पुढे बोलणेंच शिल्लक राहिलें नव्हतें. ते गप्प बसले खरे, परंतु त्यांचा मन:संताप अधिकच वाढला.

विश्रामचें दुसऱ्याच डाकेने पत्र आलें. त्यांत आणखीन् सहा महिने आपण राहिलों, तर लंडन विश्वविद्यालयाची एखादी पदवी मिळेल. हिंदुस्थानांत दुसरी कसलीतरी नोकरी लागेल, असा मजकूर होता. बाजीरावांनी त्याचें तावडतोब उत्तर दिलें की, 'यापुढे एक पैसाहि पाठविला जाणार नाही.'

आणि बाजीरावांची पैशाची स्थितीहि इतक्या निकृष्टतेला येऊन पोहोचली होती की, त्यांना रोजचा प्रपंचखर्चहि भागवितां येत नव्हता, तर मग विश्रामला रक्कम पाठविणें दुरापास्तच होतें. सावकारांचे तगादे एकसारखे चालू होतेच. विश्रामच्या पास होण्यावर केलेले सर्व वायदे निष्फळ ठरले. सर्व सावकारांनी एकसारखा तगादा लावला. नाइलाज होऊन बाजीरावांनी कोर्ट ऑफ वॉर्ड्‌स्‌मधून कर्ज घेऊन सरकार-जप्तींत सर्व मिळकत सोपवून दिली. सरकारी जप्तींत मिळकत तात्पुरती आणि ताबडतोब घेण्यांत आल्याने सावकारांचा तगादा बंद पडला, तरी बाजीरावांची पत एकदम गेली, त्यांना कुणी पै-पैशाचा जिन्नसाहि उधार देईना. बाजीरावांना आपला सर्व इतमाम एकदम कमी करावा लागला. चालू खर्चासाठी सरकारांतून त्यांना फक्त पाऊणशे रुपये दरमहा मिळत आणि तेवढ्यांतच सर्व रमारमी करणेंहि अत्यंत कठीण झालें.

विश्रामचीहि स्थिति चमत्कारिक झाली. एवढा मोठा खर्च करून तो विलायतेला येऊन राहिला, तो सर्वच्या सर्व व्यर्थ गेला. तो सर्व पैसा त्याच्या वडिलांनी दुसऱ्याकडून कर्जाऊ आणलेला होता, हीच गोष्ट त्याच्या मनाला विशेष लागली. बरें, दुसरी कांही पदवी मिळवितां आली, तर निदान तिच्या जोरावर हिंदुस्थानांत दुसऱ्या कुठल्या तरी खात्यांत बऱ्यापैकी नोकरी लागेल; पण तेवढ्यासाठी आणखी कांही काल जास्त राहणें जरूर होतें; पण बाजीरावांचें तर निक्षून लिहून आलें की, मुळींच कांही रक्कम पाठवितां येणार नाही. कर्जाचा बुजबुजाट होऊन शेवटीं सरकारजप्तींत सर्व जहागीर द्यावी लागली, हें शेवटच्या पत्रांतलें वर्तमान वाचून, तर तो हताशच झाला आणि त्याने तसेंच परत येण्याचें ठरविलें.

निघणार, इतक्यांत त्याच्या हातांत आशादेवींच्या वडिलांचें पत्र येऊन पडलें. त्यांत त्यांनी गौरवून लिहिलें होतें की, " तुम्ही आमच्या संस्थानांतले पहिल्या प्रतीचे सरदार, जहागिरदार घराण्यांतले, आय्.सी. एस्.ची परीक्षा नापास झालांत, तरी निराश होण्याचें कारण ठेवूं नये. आपण दुसऱ्या कुठल्यातरी विषयाचा अभ्यास करून तिकडील विश्वविद्यालयाची पदवी घेऊन यावें. आणि आपणांस तसें कांही दिवस राहतां यावें यासाठी यापुढील खर्चाचा सर्व भार आमचें संस्थान उचलणार आहे. तरी येण्याची घाई न करितां तिथेच रहावें आणि खर्चाचा अंदाजी आकडा कळवावा. " हें राजेसाहेबांचें पत्र वाचून विश्राम बुचकळ्यांत पडला. बुचकळ्यांत पडला, तो एवढ्यासाठीच की, राजेसाहेबांनी पत्र पाठवून मदत देण्याचें कबूल कां केलें ? त्याला मदतीची अत्यंत आवश्यकता होती, त्यामुळे मदतीचा स्वीकार करण्याचा प्रश्नच नव्हता. त्याने परत येण्याचा बेत रहित केला आणि कृतज्ञतापूर्वक मदतीचा स्वीकार केल्याचें उत्तर राजेसाहेबांना पाठविलें.

आशा विश्रामला मधूनमधून जुजबी खुशालीचीं पत्रें लिहीत असे आणि केवळ शिष्टाचार म्हणून विश्रामहि तिच्या पत्रांचीं तितक्याच तत्परतेने उत्तरें पाठवीत असे. त्याला अशी शंका आली की, आशेनेच आपल्या वडिलांना सांगून ही मदत करण्याची युक्ति योजली असावी. आशेने विश्रामला त्यानंतर पत्र पाठविलें, त्यांत या गोष्टीचा तिने मुळीच उल्लेख केला नव्हता. आशेच्या ठिकाणीं एवढा विनय वसत असेल काय, कीं ती आपल्या मदतीचा नुसता ओझरता उल्लेखहि करण्याचें टाळीत आहे, असें त्याला वाटलें. आशेला तो यानंतर जास्त जिव्हाळ्याचीं पत्रें लिहूं लागला, एवढें मात्र खरें.

विश्राम नियमाने नंदेला पत्र यापूर्वी लिहीत असे, तो त्याचा

क्रम त्याने चालू ठेवला होता; परंतु पत्रांतल्या मजकुरांत त्रोटकपणा आणि भावनेंत तिऱ्हाईतपणा दिवसेंदिवस अधिकाधिक व्यक्त होऊं लागला. विश्रामवर आर्थिक आपत्ति सर्व बाजूंनी इतक्या कोसळत होत्या की, त्याच्या मनोराज्यांतले मनोरे यापूर्वीच जमीनदोस्त झाले होते ! नंदासाठी बांधलेलें मनोमंदिर या पडझडींत केव्हाच गाडलें गेलें होतें ! निष्कांचन स्थितींत नंदाबद्दल अभिलाष ठेवणें, हेंही गैर होईल, असें तो मानूं लागला. आपल्या दारिद्र्यामुळे नंदाला त्रास होईल, कदाचित् आपण निर्धन झाल्याचें समजल्यावर नंदा आपोआपच आपल्यावरचें प्रेम कमी करील, असेंहि त्याच्या मनांत येई.

# १

बाजीरावांची दुराचारी आणि निष्ठुर वागणूक व कर्जबाजारीपणा, विश्रामचें परीक्षेंतलें अपयश आणि निराशादायक भवितव्य, इंदिरेची होणारी छळणूक आणि तिला भोगावी लागणारी हलाखी, या सर्वांचा परिणाम नंदाच्या वडिलांच्या मनावर अनिष्टच झाला. अशा ठिकाणीं आपली मुलगी देऊं नये, असेंच त्यांचें मत होऊं लागलें होतें. नंदा या वेळीं मॅट्रीक झाली होती. तिला आपले विचार बोलून दाखविण्याची मोकळीकही होती; परंतु परिस्थिति अशी कांही सर्व बाजूंनी पालटली होती की, तिला आपण विश्रामशींच लग्न करणार, असें स्पष्ट सांगतां येत नव्हतें. विश्रामचीं त्रोटक आणि तटस्थपणाचीं पत्रें वाचून, तिला जास्तच धास्ती वाटे. विश्राम निराश झाल्यामुळे अशीं पत्रें लिहीत असेल, असें तिचें मन सांगे, तर दुसरें मन असेंही सांगे की, आपल्याला जर त्यांनी स्वतःचीं सुखदुःखे सांगायचीं नाहीत, तर दुसऱ्या कुणाला सांगायचीं ? पण या दोन्ही संदेहांबद्दल तिला

विश्रामला पत्रांतून विचारण्याचें धैर्य होईना. विश्रामच्या कुटुंबाची पैशासंबंधी इतकी कांही हलाखीची स्थिति उत्पन्न झाली होती की, आपण तें स्थळ पत्करणार, असें तिला आपल्या वडिलांनाहि सांगतां येण्यासारखें नव्हतें. तशांत विश्रामच्या मनाचा अलीकडे कांहीच थांग लागेनासा झाला होता. अशा स्थितींत तिने तरी कोठल्या आधारावर स्वत:चा निश्चय जाहीरपणें सांगावा ? वडिलांनी दुसरी स्थळें पाहिली, तर मला यंदा लग्न करायचं नाही, अशा लाडाच्या हट्टाशिवाय तिला त्यांना कांहीच सांगतां येत नव्हतें. विश्रामांना प्रत्यक्ष भेटूनच उलगडा होणार होता आणि विश्राम परत हिंदुस्थानांत येण्याचीच ती वाट पहात होती.

विश्राम लंडन विश्वविद्यालयाची बी. ए. ची परीक्षा वरच्या वर्गांत पास झाल्याची तार आली व बाजीराव, इंदिरा आणि नंदा यांना हायसें झालें. विश्रामला आता इकडे आल्यावर कांहीतरी नोकरीधंदा लागेल, यांत शंका नव्हती आणि याच एका गोष्टीने बाजीराव शांत झाले, इंदिरेला समाधान वाटलें आणि नंदाला आशा वाटूं लागली.

विश्राम हिंदुस्थानला येण्यास निघाला व त्याला घेण्यासाठी बाजीराव मुंबईस आले. विश्रामला पोचवायला ते एकटेच आले होते; परंतु या खेपेस इंदिरेलाहि त्यांनी मुद्दाम मुंबईस नेलें. बाजीराव आपल्या एका स्नेह्याच्या येथे उतरले होते आणि इंदिरा आपल्या मावशीच्या घरी उतरली. नंदाहि इंदिरेच्या बरोबर आली होती. इंदिरेची समजूत अशी की, बाजीराव बंदरावर आपल्याला घेऊन जातील; पण इंदिरेस तिच्या मावशीकडे आणून सोडल्यानंतर बाजीराव तिला येऊन भेटलेच नाहीत. पण नंदाच्याने राहवेना ! शेजारच्या एका माहितगार माणसाला घेऊन, ती बॅलर्ड पियरवर जायला निघाली. इंदिरेला बरोबर येण्याविषयी तिने

आग्रह केला; परंतु "तूंच जा ! मी तिथं आलेलं आवडायचं नाही. नाहीतर मला न्यायला आले नसते का ?" इतकेंच ती बोलली आणि उसन्या हासण्याच्या आच्छादनाखालीं हिरमुसला चेहरा झाकण्याचा तिने निष्फळ प्रयत्न केला.

नंदा तिला म्हणाली, "ताई ! तूं बाई फारच गरीबपणानं वागतेस ! चल. मी तुला घेतल्याखेरीज जाणारच नाहीं."

इतक्यांत इंदिरेच्या मावशीचे यजमान नानासाहेब आंतून बाहेर आले आणि म्हणाले, "आपण सगळेच जण विश्रामना घ्यायला जाऊं. विश्राम आले, तर त्यांना उतरायला इकडेच घेऊन येऊं."

"मग मी घरांत राहतें. गड्याकडून आवराआवर करतें. फळं, भाजीपाला आणून ठेवतें." इंदिरेची मावशी म्हणाली.

नंदा, इंदिरा आणि मावशीचे यजमान अशीं तिघे जण बॅलर्ड-पियरवर येऊन बाहेरच्या मोठ्या हॉलमध्ये उभीं राहिलीं. परदेशाहून येणाऱ्या इसमांच्या नातेवाईक, स्नेह्यांनी हॉल फुलून गेला होता. त्यांपैकीं पुष्कळांच्या हातांत फुलांचे हारहि होते. जवळ उभ्या राहिलेल्या एका बंगाली तरुणीकडे नंदा टक लावून पहात होती. हातांत घेतलेल्या हाराकडे तिने ओशाळेपणाने पाहिलें. इंदिरेच्या लक्ष्यांत हें तेव्हाच आलें, तिने नानासाहेबांच्या कानांत कांहीतरी सांगितलें व ते पंधरावीस मिनिटांनी हार घेऊन परत आले. दरम्यान नंदाने त्या बंगाली तरुणीशीं कुशल प्रश्न केले होते. तिचा भावी नवरा याच बोटीने परत येणार होता, असें तिच्याकडून कळलें. सभोवार उभी राहिलेली मंडळी प्रिय जनांना भेटण्याच्या आतुरतेने इतकी अधीर झाली होती कीं, बसण्यासाठी ठेवलेल्या बाकांवर कुणीच न बसतां इकडेतिकडे ती

येरझारेच घालीत होती. प्रवासी येण्याच्या दारापाशी जाऊन डोकावावें; बोट धक्क्याला लागल्याला बराच वेळ झाला, तरीसुद्धा प्रवाशांना लगेच बाहेर पडतां येत नाही, या योजनेबद्दल आपापसांत रागाचे उद्गार काढावेत; येणाऱ्याजाणाऱ्या पोर्टरना, "माणसं केव्हा बाहेर येतील ?" म्हणून विचारावें आणि त्यांनी "झालीच वेळ आता. येतील एका तासाभरांत." असें सांगतांच "हा यांचा तास कधी संपणार आहे, कुणास ठाऊक ! तासाभरांत बाहेर पडतील, असं सांगितल्यालासुद्धा एक तास झाला !" असे रागाचे उद्गार एकमेकांजवळ काढावेत, अशी त्यांची वरखाली स्थिति झाली होती. आशेचे वडील राजेसाहेब आणि त्यांच्याबरोबर बाजीराव असे दोघे जण येऊन दाखल झाले, तोंच प्रवाश्यांची पहिली तुकडी बाहेर आली. त्या बंगाली तरुणीचा प्रियकर याच टोळींत होता. त्याला पाहतांच एखादें लहान मूल ओळखीच्या माणसाकडे जाण्यासाठी उसळून धावत निघावें, तशी ती त्याच्याकडे धावत गेली. त्या धांदलींत त्याच्या गळयांत हार घालण्याचें भानच तिला राहिलें नाही. ती त्याच्याजवळ जातांच त्या तरुणाने तिचे दोन्ही हात घट्ट धरले. आनंदातिशयाने व्याकुळ होऊन ती घळघळ रडूं लागली. 'चला, आपण जाऊं' असें म्हणून त्याने तिच्या कमरेभोवती अलगद आपला डावा हात ठेवला आणि उजव्या हाताने गर्दीतून रस्ता काढण्याचा आविर्भाव करीत तो चालूं लागला. त्या तरुणीने हातांतला हार तसाच घट्ट धरून ठेवला होता. सर्वांसमक्ष ती इतकी लाजली होती की, तिने मान वर केलीच नाही. हा सर्व देखावा पाहून इंदिरा गालांतल्या गालांत हसत होती, नंदाकडे चोरून पहात खुणावीत होती. तिने फुलांचा हार सोडून, नंदाच्या हातांत दिला होता. नंदा मात्र कावरीबावरी झाली होती. आशेचे वडील राजेसाहेब आणि बाजीराव यांचें लक्ष्य या मंडळी-

कडे गेलें नव्हतें व ते दोघे जण यांच्याकडे पाठ करूनच उभे होते; परंतु आशेच्या वडिलांचें बाजीरावांच्या बरोबर येणें, तिला कसेसेंच वाटलें. ती भीति व आनंद यांच्या आलटून पालटून फेरींनी शहारे देत होती आणि लटलट कापत होती. तिच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता. इतक्यांत प्रवाशांची दुसरी तुकडी आली आणि त्यांत विश्राम तिला दिसला. विश्राम दरवाज्यांतून बाहेर पडतांच आशेच्या वडिलांनी त्याच्याशीं हस्तांदोलन करून बाजूला घेतलें. पाठोपाठ आशा आली. तिला त्यांनी हळूच जवळ घेतली आणि दोघांना जवळजवळ उभे करून त्यांनी आपल्या हातांनी दोघांच्याहि गळ्यांत हार घातले, पाठीवरून हात फिरविला आणि 'चला' म्हणून ते पुढे चालूं लागले. हें एकंदर दृश्य पाहून नंदा खजिल झाली, तिचें भानच जावें, असें झालें. विश्राम समोरून जाऊं लागतांच मावशीचे यजमान मोठ्याने म्हणाले, 'अग नंदा, त्यांना हार घाल ना?' विश्राम दचकून जागेवर उभा राहून पाठीमागे पाहूं लागला आणि नंदा शुद्धीवर येऊन हार सावरून जागेवर उभी राहिली. विश्राम आपणहून नंदा व इंदिरा यांच्याकडे आला. "आईसाहेब, आपण आलांत? वा: ! खुशाल आहेत ना मंडळी सगळी ? अन् नंदाताई, तुम्ही हें हातांत काय आणलं आहे?" असें तो हसून म्हणाला.

"नंदा! हार घाल ना यांना." इंदिरा म्हणाली.

नंदाने विश्रामच्या गळ्यांत भीतभीत हार घातला. ती भेदरली होतीच; परंतु आशेने तिच्याकडे अशी कांही तिरस्काराची दृष्टि रोखली होती की, नंदाचे हातपाय लटपटूं लागले.

"बरं नंदाताई, तुम्ही कुठं उतरला आहांत? मी संध्याकाळीं

येतों. अन् आईसाहेब, तुम्हीन् या एके ठिकाणींच उतरला आहांत ना ? मी आता जातों. संध्याकाळीं जरूर येतों." विश्राम म्हणाला.

"आपण आमच्याकडेच उतरण्यास चलावं. मी तेवढ्यासाठी न्यायला आलों आहें." नानासाहेबांनी नम्रपणाने विनंती केली.

विश्रामने त्यांना तितक्याच नम्रपणाने नमस्कार केला आणि त्याने इंदिरेकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलें.

"माझ्या मावशीकडे उतरायला चलावं, असं सांगताहेत." इंदिरेने सांगितलें.

"असं, माफ करा अं ! आईसाहेबांच्या मावशीचे यजमान आपण ? मी पूर्वी पाहिलं नव्हतं, म्हणून ओळखलं नाही ! बरं, मी असं केलं तर चालेल का ? मी आता यांच्याबरोबर जातों, अन् संध्याकाळीं आपणांकडे जेवायला येतो, म्हणजे झालं ! काय नंदा ? म्हणजे निवांतीनं दोन घटका बोलायला बसायला बरं."

"बरं ! नाना, यांना आपला पत्ता देऊन ठेवा." इंदिरा म्हणाली.

मावशीचे यजमान खिशांतल्या एका कागदावर पत्ता लिहून देत होते.

"तुम्ही इथं कशाला आलांत ?" असे बाजीराव सर्वांना ऐकूं जाईल, एवढ्या मोठ्याने इंदिरेला म्हणाले. इंदिरा रागाने लाल झाली व अपमानाने तिच्या डोळ्यांत टचदिशी पाणी आलें.

पत्ता हातीं पडतांच "बरं, मी संध्याकाळीं सहा वाजतां येतों. बरं जातों बरं, का ?" असें म्हणत विश्रामने सर्वांना पुनः एकदा हसून नमस्कार केला आणि तो आशेच्या पाठोपाठ निघून गेला.

मावशीचे यजमान ट्रॅम-स्टँडकडे येतांना इंदिरेला म्हणाले, 'इंदू, तुझ्या यजमानांना रात्रीं जेवायला बोलावलं पाहिजे, नाही? अन् ते आता कुठं भेटणार?"

"कांहीं नको बोलवायला!" इंदिरेने तुटकपणें उत्तर केलें.

"वडीलपणानं म्हणजे मी त्यांना जावई म्हणून बोलावलं पाहिजे." मावशीचे यजमान म्हणाले.

"नाना! खरंच, तुम्ही भोळे आहांत! तुमच्यापेक्षा वयानं पांच दहा वर्षं जास्तच असेल वय! अन् तुम्ही वडील कसे? दुसऱ्याची जशी वागणूक, तशी आपली वागणूक ठेवावी." इंदिरा उद्गारली.

नंदा आणि इंदिरा ट्रॅममध्ये बायकांच्या बाकावर बसल्या. नाना लांब बसले. ट्रॅम सुरू झाली, तशी त्यांच्या जिभेला चालना मिळाली आणि मनांत कोंडून ठेवलेले विचार बाहेर पडूं लागले.

"नंदा, ही आशा कशी ग आंतून आली?"

"म्हटलं नव्हतं तुला की, आशा कुठंतरी लांबलांब गेली आहे म्हणून?"

"मला वाटलं, लांब म्हणजे गेली असेल कुठं पंढरपूरला, नाहीतर मुंबईला!"

"तिचे वडील तिला न्यायला आले असतील; पण त्यांच्याबरोबर बाजीराव ग कशाला होते? अन् राजेसाहेबांनी दोन हार आशा अन् विश्राम यांच्या गळ्यांत घातले आणि विश्राम उतरायलासुद्धा आशेकडे गेले. मला तर याचा कांही उलगडा होत नाही."

"असेल कांही पुरुषापुरुषांचं ठरलेलं! आपल्याला काय समज-

णार त्यांतलं ? आज संध्याकाळीं येणार आहे ना विश्राम ? त्याला विचारलं म्हणजे समजेल."

" पण इथं मुंबईस म्हणजे माणसांना बोलायबसायला स्वतंत्र जागाच नसते. तुझ्या इथं बरं आहे, नाही का ? मोठा वाडा, कुठल्या-कुठं माणसं बसलीं बोललीं, तरी कांही समजत नाही. नाही ?"

" कुणाशीं बोलत बसावं, अशी माणसंच नाहीत, एवढंच काय तें ! बरं नंदा, आपण असं करूं. माझ्या मावसभावाची अभ्यासाची खोली आहे ना शेवटच्या मजल्यावर ? तर त्याला सांगूं, तूं संध्याकाळीं बाहेर जा, अन् तुम्ही त्या खोलींत बसा."

" तूंहि बसायला ये बरं का ?"

" का ग ? मी कशाला ? बरं, मीहि येईन. नंदा, आता विश्राम किती चांगला दिसतो नाही ? साहेबी पोषाखांत तो पुष्कळच उंच दिसतो की ?"

" हूं:" नंदाने सुस्कारा सोडला.

" आणि रंगांतहि पुष्कळच उजळलेला दिसतो. एवढा विलायतेला राहून आला; पण आदबीनं वागणं तसंच आहे. नाहीतर ती आशा. कशी फुगलेली असते गर्वानं. एवढी आपल्या इथं दोन दिवस येऊन राहून गेली; पण एका शब्दानं तरी तिनं विचारलं का ?"

" अन् मी विश्रामला हार घातला ना ? तर ती कशी माझ्याकडे मारक्या म्हशीसारखी पहात होती."

" संस्थानिकाची मुलगी आहे ना ! आकाश ठेंगणं वाटतं आहे तिला."

त्या घरीं आल्या. मावशींनी विचारलेल्या प्रश्नांचीं मनमोकळे-पणानें उत्तरें देण्याची दोघींचीहि मन:स्थिति नव्हती. विश्राम संध्याकाळीं जेवायला येणार, याच आनंदांत मावशी आणि तिचे यजमान बेताची वाटाघाट करण्यांत दंग होते.

दुपारीं जेवणें होतांच बाजीराव एकदम आले आणि इंदिरेला म्हणाले,

" तुम्हांला राणीसाहेबांच्याकडे चार वाजतां जायचं आहे आज."

" कां ?"

" नाहीं, कांही कामासाठी जायचं आहे !"

" माझं काय काम आहे त्यांच्याजवळ ? मी त्यांना अजून काळ्या कीं गोऱ्या पाह्यल्यासुद्धा नाहीत."

" त्यांनी तुम्हांला बोलावलं आहे." बाजीराव उंच स्वरांत म्हणाले.

" बोलावणं कांही आलं नाही माझ्याजवळ अजून. त्यांचं बोलावणं आलं, म्हणजे बघेन जायचं कीं नाही तें."

" माझ्याजवळ त्यांनी सांगितलं आहे –"

" –की मला घेऊन या. असंच ना ?"

" हो."

" मी जाणार नाहीं." इंदिरा जोराने उद्गारली.

" मर्जी तुमची ! अपमान सहन केला पाहिजे."

" मी आजवर पदोपदीं अपमान सहन केले ते ? अजून तीन ताससुद्धा झाले नाहीत ! राजेसाहेबांच्या देखत माझा अपमान झाला, तर मला त्याचं कांहीच का नसेल वाटलं ?"

" बघा बुवा! राजेसाहेबांच्याकडून आपणांला अजून पुष्कळ कामं करून घ्यायचीं आहेत. सरकार-वहिवाटींत जहागीर कायमची घेण्यासाठी त्यांचाच शब्द खर्च करण्यास सांगावं लागणार आहे. विश्रामला नोकरी लावायची, त्याचीहि तेच खटपट करणार आहेत.. त्याच्या लग्नाचंहि तेच जमवणार आहेत."

" यांतलं माझं असं कांहीच काम नाही. विश्राम तर बोलून-चालून माझा सावत्र मुलगा! त्याच्यासाठी मी कां म्हणून नाक घाशीन?"

बाजीरावांनी एकंदर रंग ओळखला, जास्त अपमान करून घेण्यास ते तयार नव्हते. रागारागानेच ते निघून गेले.

बायका माहेरीं असल्या, म्हणजे सिंहाचें धैर्य त्यांच्या अंगीं येतें आणि तसेंच त्यांना असेल नसेल तें सर्व दुःख आठवतें. नंदाने इंदिरेला म्हटलें,

" ताई, तुम्ही आताशा अशी सारखी धुसफूस कां करतां दोघं जणं?"

" नंदा, तुला समजायचं नाही त्यांतलं! त्याचीं कारणं फार निराळींच असतात. कुणावर तो प्रसंग येऊं नये, हेंच खरं! नाहीतर म्हणणार होतें, मोठी झालीस, म्हणजे तुला समजेल."

" ताई, राजेसाहेब विश्रामचं लग्नाचं ठरविणार आहेत, असं कायसं काय ग बाजीराव म्हणाले?"

" आशेची घोरपड बांधणार असतील विश्रामच्या गळ्यांत! दुसरं काय? स्वार्थाकरता काय करतील, त्याचा कांही नेम नाही."

" स्वार्थ कसला?"

" हाच पैशाअडक्याचा ! अन् आशा सुरेख आहे, नटवी आहे, धीट आहे, यांना पाहिजे तश्शी आहे. तिच्याशी ओळख-देख, नातं जोडण्याचा स्वार्थ. याचीं धोरणं ते अशी बांधतील की, कुणाला पत्ता लागायचा नाही."

" पण यांना आशेचं चरित्र माहीत आहे ना ? "

" नसायला काय झालं माहीत ? सगळं गाव जिथं उघड उघड बोलतं, तिथं यांना अन् असल्या गोष्टी माहीत नाहीत ? गोष्टच नको."

" आणि विश्रामला ? "

" त्याला पोराला कुठून माहीत असणार ? "

" अन् तो फसला तर नसेल ना ? "

" आपण काय सांगावं ? "

नंदा गप्प झाली, तिचें डोकें सुन्न झालें, चक्कर आल्यासारखें तिला वाटूं लागलें. ती ग्यालरीत येऊन येरझारे घालूं लागली. इंदिरेनें तिची समजूत करण्याचा प्रयत्न केला नाही. तिने नंदाचें दुःख ओळखलें होतें. तें आवरणें शक्य नव्हतें, असेंहि तिला कळून चुकलें होतें. संध्याकाळीं विश्राम आल्यावरच त्याची शहानिशा होईल, असें तिने तिला जवळ घेऊन सांगितलें; तरी त्या शहानिशेंतून आशादायक कांहीं निघेल, अशी मात्र तिला उमेद वाटली नव्हती.

संध्याकाळीं ठरल्या वेळेला विश्राम आला. त्याला घेऊन नंदा शेवटच्या मजल्यावर गेली. पाठोपाठ मावशीहि विश्रामला पाहण्यासाठी गेली. थोड्या वेळाने " मावशी, ताईला पाठवून द्या, " असें नंदा म्हणाली. " होय, चहाचं घेऊन ताईलाच पाठवतें, " असें म्हणून मावशी निघून गेल्या.

नंदा व विश्राम यांच्या खुशालीच्या गोष्टी सुरू झाल्या. विश्राम पूर्वीसारखा मोकळ्या मनाने आणि अदबीने बोलत होता. नंदा मात्र तितकीशी खुल्या दिलाने बोलत नव्हती. त्यांच्या कुशल प्रश्नांच्या गोष्टी संपतात, तोंच इंदिरा चहाचें सामान गड्याबरोबर देऊन वर आली. विश्राम खुर्चीवरून उठून खाली सतरंजीवर बसला, अन् म्हणाला. " आपण असें खालीच बसूं आरामशीर! कितीतरी दिवसांनी खाली बसायला मिळालं. मला टेबलखुर्चीवर बसणं बांधल्यासारखं झालं होतं."

"पण आता असं गबाळेपणानं वागून चालायचं नाही." चहाचें सामान मांडीत इंदिरा म्हणाली. "अरे, खाण्यापिण्याचं घेऊन ये, बरं का!" असें तिने गड्यास सांगितलें.

" काय म्हणालांत आईसाहेब?" विश्राम म्हणाला.

"नाही, म्हटलं की, आता असं गबाळेपणानं वागून चालायचं नाही."

"कां?"

"आता मोठी पदवी घेऊन आलांत विलायतेहून! मोठी नोकरी लागेल."

"म्हणून काय झालं?"

"अन् असं वागलेलं आवडायचंही नाही आता!"

"कुणाला आवडायचं नाही?"

"कुणाला म्हणजे आशादेवींना!"

इंदिरा हें वाक्य म्हणाली, अन् तिने विश्रामच्या चेहऱ्याकडे भेदक दृष्टीने पाहिलें. तोंड चुकाविण्यासाठी विश्रामने नजर नंदाकडे वळविली,

तों नंदाचे अश्रूंनी भरलेले डोळे त्याच्या चेहऱ्याकडे अगोदरच रोखलेले होते. विश्राम गोंधळला, विरमला आणि त्याने एक सुस्कारा सोडला. मुद्दाम गोष्ट उडविण्याच्या हेतूने नव्हे, तर चहा पिण्यांत व्यत्यय येऊं नये म्हणून, तो चहा तयार करूं लागला अन् म्हणाला, " बसा, भोवताली. मी आज चहा करून देतों. विलायतेंतली चहा तयार करण्याची रीत दाखवितों. आईसाहेब, आपल्याला साखर चालेल ना दोन चमचे, अन् नंदाताई, तुम्हांला साखर चालेल ना तेवढीच? मुद्दाम विचारलं. मी आताशा खूप कडक चहा घ्यायला शिकलों आहें. अन् साखर थोडी घालतों. "

सर्व जणांनी चहा घेतला, फराळाचें खाण्यास सुरवात केली, एकीकडे गोष्टी चालल्याच होत्या.

इंदिरा— नोकरीचं काय कुठं घाटत आहे का?

विश्राम— एका सरकारी कॉलेजांत प्रोफेसराची जागा रिकामी आहे अन् मी त्याच विषयाची पदवी घेतली आहे. राजेसाहेब याबद्दल सरकारांत खटपट करणार आहेत.

नंदा— पगार किती मिळेल?

विश्राम— सुरवातीला चारशे मिळेल.

इंदिरा— चारशे म्हणजे संस्थानिकाच्या मानाने कमीच नाही का?

विश्राम— कमी तर खराच! मी त्यांना सांगितलंसुद्धा की, माझ्या डोक्यावर वडिलार्जित कर्जाचा बोजा आहे. माझ्या शिक्षणासाठी झालेलं कर्ज निराळंच! हीं कर्जे फिटतील, तेव्हा आमची जहागीर हातीं येईल. अन् नोकरी लागली, तरी पगार अगदी थोडा आहे.

इंदिरा— मग ते काय म्हणाले ?

विश्राम— शिक्षणाचं कर्ज हें त्यांच्याकडूनच काढलं होतं, तर तें ते माफ करणार आहेत.

नंदा— त्यांच्याकडून का पैसे घेतले होते तुम्ही ?

विश्राम— होय.

इंदिरा— आशाबाईना हें कबूल आहे का ?

विश्राम— होय म्हणाली आहे.

नंदा— तुमची तिची गाठ कुठं पडली ?

विश्राम— ती देश पाहायला निघाली होती. पोर्टसय्यदलाच त्या मी ज्या बोटीं होतों, त्याच बोटीत येऊन भेटल्या. आम्ही गेले चारआठ दिवस बरोबरच होतों बोटीवर.

इंदिरा—मग झाली आहेत ना तुमची सगळ्याबद्दलचीं बोलणीं ? लग्नाच्या आगोदर आपली हकीगत त्यांना कळलेली बरी. कसें झालें तरी ते संस्थानिक. आपण त्यांच्या मानानं गरीबच. अन् आता तर काय ! मला वाटतं की, नवराबायकोच्यांत अंतर फार असूं नये. सुख लागत नाही.

नंदाच्याने यापुढचें बोलणें ऐकवेना. तिने चहाचें सामान आवरलें आणि तें नेण्याच्या मिषाने ती खाली आली आणि कोपऱ्यांत डोकें खुपसून धुमसून रडत बसली.

" मी तर आशेला सगळ्या हकिगती सांगितल्या आहेत. तिनं कबूल केलं आहे. बघावं आता काय होईल तें. "

" तिचे आचारविचार तुमच्याशी जमतील का ? "

" म्हणते आहे की, जमवून घेईन. नाहीतर मी जमवून घेईन! कुणीतरी एकानं संसारांत पड खायची असते. मी जमवून घेईन."

" त्यांच्या आशा पुष्कळ असतील! खर्चेहि भारी असतील! त्या सर्व पुऱ्या होतील ना? नाहीतर असं व्हायचं की, त्याचीच काळजी लागून राह्यची. पुरुषाला बायकोला आपण कसं खूष ठेवूं, अशी काळजी लागूं लागली की तो निस्तेज होतो. आपण शिकून आलांत! मी एक अशिक्षित अनुभवशून्य बायकोमाणूस, मी काय आपल्याला सांगणार! या गोष्टी ज्याच्या त्याच्या आईबापांनी सांगायच्या असतात, पाह्यच्या असतात. मला आपलं राहवेना म्हणून मी म्हटलं. माझा आशादेवीशीं हेवादावा नाही हो."

" छे छे! मला कांही तसं वाटणार नाही."

" बरं, लग्नाची वाटाघाट चालली आहे की नक्की ठरलं आहे?"

" लग्नाचं नक्की ठरलं आहे. लग्न केव्हा आणि कुठं करायचं त्याची वाटाघाट होणार होती दुपारी."

" अस्सं! मला माहिती नाही. राणीसाहेबांच्याकडे मला बोलावलं होतं, मला वाटलं उगीच बोलावलं असेल. मी नाही म्हटलं अशाकरिता की, इथं कपडे आणले नाहीत, दागिने आणले नाहीत. मी दागिने घालीत नाही कधी, तेवढ्यासाठी घालायचे. म्हणून नाही म्हटलं."

" आपणांला जायचं काय कारण? राणीसाहेबांना वाटलं तर त्यांनी आपल्याला भेटायला यावं, असं मी आशेला सांगितलंसुद्धा. अन् तीहि 'बरोबर आहे.' म्हणून म्हणाली."

" बरं चला! चांगलं झालं. संस्थानिकाशी शरीरसंबंध झाला. आशादेवी चांगल्या आहेत हो स्वभावान. थोड्याशा अल्लड आहेत.

त्यांनातरी दुसऱ्याशीं कसं वागावं, हें कशानं समजणार? होतील अनुभवानं शाहण्या. चांगलं झालं दोघंहि बरोबरीचीं आहांत, शिकलेलीं आहांत. सुखानं संसार होईल. कुणी कांही म्हटलं, तरी मी येईन, संसार मांडून देईन. राणीसाहेबांना सांगावं, उद्यां दुपारीं मी येईन. गाडी पाठवावी. आशादेवींना वाईट वाटेल. राणीसाहेब तिच्या सख्ख्या आई असल्या, तर आपणहून आल्या असल्या. एखाद्याचं कांही व्यंग असलं, तर आपण त्याच्यावर पांघरूण घातलं पाहिजे, नाही?"

"उद्या आपण भेटाल म्हणतां? भेटलांत तर बरं!"

"खुश्शाल भेटेन जाऊन! आशादेवींनाहि मला भेटायचं आहे. चांगल्या मनमिळाऊ अन् आनंदी आहेत, नाही?"

विश्रामचे डोळे आनंदाने चमकूं लागले. एकदम विश्रामला कसलीतरी आठवण होऊन, तो वरमला आणि म्हणाला,

"नंदाताई कुठं आहेत? त्यांची मला क्षमा मागितली पाहिजे."

"कशाबद्दल?"

"त्यांना निराश केल्याबद्दल! माझी आय्. सी. एस्. ची परीक्षा पास झाली असती ना, म्हणजे सगळे बेत आपोआप पार पाडले असते. आता तर काय, आमच्या कुटुंबाची अब्रू कुणीहि पैशानं विकत घ्यावी असंच झालं आहे."

"त्याचं काय एवढं? नंदा समजूतदार मुलगी आहे! मी तिची समजूत घालीन. ती माझं ऐकेल."

"तिला सांगा, तिनं मला भाऊबिजेच्या दिवशीं ओवाळलं आहे. सगळ्या जन्मांत मला ओवाळलं असं तिनंच, अन् मी तिला जन्मभर

बहीण म्हणून मानीन, तिच्या उपयोगी पडेन."

"बरं! मी तिची समजूत घालतें. मी खाली जाऊन पाहतें. अन् वर घेऊन येतें तिला. बाहेर राजेसाहेबांची मोटार उभी असेल ना? अजून जेवायला अवकाश आहे तासभर. पाहिजे तर नंदाला घेऊन गाडींतून फिरून यावं."

इंदिरा खालीं आली. नंदाचें रडें थांबलें होतें. तिच्या कानांत इंदिरा चारदोन वाक्यें कुजबुजली. नंदाने नेसणें बदललें आणि विश्राम-बरोबर ती फिरायला गेली.

# १०

विश्रामचें आशेशी लग्न मुंबईस लगेच तिसऱ्या दिवशीं लागलें आणि मधुचंद्र उजविण्यासाठी विश्राम आशेला घेऊन महाबळेश्वरास गेला. महाबळेश्वरास राजेसाहेबांचा बंगला होता. तिथेच हे दोघे जण राहिले.

चार दिवसांच्या निकट सहवासानंतर दोघांचेहि स्वभावविशेष एकमेकांपासून लपवून ठेवतां येणें शक्य नव्हतें आणि एकेक विसंगति दृष्टोत्पत्तीस येऊं लागली, तसा विश्राम जमवून घेण्याच्या इराद्याने अधिकाधिक आज्ञाधारकपणाने वागूं लागला, तर आशा अधिकाधिक निर्भीडपणाने विश्रामची कानउघाडणी करूं लागली. मधुचंद्राच्या उन्मादकारी चंद्रिकेंत तीं त्या वेळीं न्हात होतीं, विचारविनिमयापेक्षा विकारविनिमयाच्या व्यापारांतच तीं दंग होती. भविष्यकालच्या मनोराज्यांतले मनोरे रचण्यापेक्षा सद्य:कालांतील सुखोपभोगाच्या उथळ पुष्करणींत तीं डुंबत होती. विरंगनीच्या अधूनमधून उठणाऱ्या गार

वाऱ्याच्या सोसाट्याने तीं संयुक्त बचावासाठी एकमेकांस उसन्या आवेशाने बिलगत होतीं, तर उन्मादाच्या भरांत वाटेल त्या आणाशपथा खात होतीं. पुष्करणींत डुंबूं लागले, म्हणजे तळाचा केरकचरा पृष्ठभागावर येऊन, पाणी गढूळ व्हायचेंच; विषयसेवनाच्या गाफील दंगलींत शारीरिक आणि मानसिक न्यूनें उघड दिसावयाचींच. शारीरिक व्यंगांवर विषयतृप्तीसरशीं आपल्या हातांनीं प्रणयी जनांनी आच्छादनें घातलीं, तरी उन्मादाच्या लहरींत शरीरदर्शनाबद्दलचें औत्सुक्य पुन्हा जागृत होतें. स्वभावांतील व्यंगें जरी तृप्तीच्या समाधानांत विलीन झालीं, तरी मल्लपणा घालवून क्रीडोन्मुख करण्यासाठी त्या व्यंगांनाहि डिवचून जागृति द्यावीशी वाटते आणि त्यांच्या संमिश्रणाने चित्रित झालेला प्रेमळपणा अधिक लोभनीय वाटूं लागतो; परंतु बेफिकीरपणाने शारीरिक व्यंगें तशींच उघडीं राहूं देणारीं जोडपीं . आकर्षक औत्सुक्याच्या ऐवजीं शिसारीला आव्हान करतात. समाधानाच्या संथपणें चालणाऱ्या प्रवाहांत खडकाप्रमाणे मानसिक व्यंगें अचल ठेवल्याने विरोधाच्या लाटांचा बदसूरी खळखळाट घुमूं लागतो, विश्वासाचें शांत वातावरण उत्पन्न होण्याची संधीच येऊं देत नाही. आशा आणि विश्राम यांच्या मधलें गरीबीश्रीमंतीचें अंतरच एवढें जबरदस्त होतें की, आशेने आपल्या श्रीमंतीबद्दल गर्विष्ठ राहून, विश्रामला कःपदार्थ लेखावें आणि विश्रामने ओशाळें होऊन तें सर्व तिचें उद्दामपणाचें बोलणें हसून गोड करून घ्यावें, हा एकच सलोख्याचा मार्ग शिल्लक राहिला होता.

"विश्राम, तुम्ही किनई पुष्कळ पुष्कळ पैसा मिळवा. बरं का! मला खूप खूप आवडाल मग तुम्ही. माझ्या सगळ्या बहिणींत माझ्या-इतक्या गरीब स्थळी कुणीच पडली नाही."

"मी पैसे मिळवायला तयार आहें. मला खूप पैसे मिळविण्याची

अतिशय जरुरी आहे. मोठी नोकरी लागली तर ठीक होतं. प्रोफेसराची नोकरी मिळाली, तर पगारही बरा मिळेल."

"बरा म्हणजे चारशे रुपयेच ना? त्यांत हो कसं आपलं भागणार? माझ्या इतमामाप्रमाणं तुम्हाला राहलं पाहिजे. तुम्ही व्यापार कां नाही करीत? कांही तरी खूप पैसे मिळवायचा मार्ग काढा शोधून."

"व्यापाराला भांडवल लागतं. त्याची माहिती लागते."

"तुमची जहागीर म्हणतां सगळी कर्जापायी जमीत! मग माझा संभाळ तरी कसा करणार? खरं सांगूं तुम्हांला?"

"काय?"

रागाऊं नका हं! माझ्या वडिलांनी मला सांगितलं, म्हणून मी तुमच्याशी लग्न केलं. माझे नातेवाईक सगळे मला हसले, मी असं गरीब स्थळ पत्करल्याबद्दल! तुम्ही आय्. सी. एस्. होऊन आला असतां ना, तर निराळं होतं."

"वडिलांनी आग्रह केला, म्हणून तुम्ही लग्न केलंत?"

"आग्रहच नाही, पण मला तुमच्याशी लग्न करायला भागच पाडलं म्हणानात! तुम्ही मला सुखांत ठेवाल ना? पैसा आडका खूप मिळवाल ना?"

"जरूर सुखांत ठेवीन."

"अन् तुम्ही आता जरा माझ्या मनाप्रमाणं वागाल ना? अगदी मी सांगेन तस्सं?"

"म्हणजे कस वागायचं?"

" हें पहा, तुम्हांला किनई अगदीच रीतभात माहीत नाही ! युरोपियन लोकांच्यांत, मोठमोठ्या अंमलदारांच्यांत माझ्या ओळखी आहेत. ते लोक माझ्याकडे येतील-जातील, तर त्यांच्याशीं बोलण्या-बसण्याचे शिष्टाचार शिकले पाहिजेत. मला वाटलं, तुम्ही विलायतेला जाऊन आलांत, रीतभात सगळी माहीत असेल तुम्हांला! पण पाह्यलं तर, कांहीच तुम्हांला रीतभात माहीत नाही! सकाळी सर आणि लेडी वेक्फील्ड भेटले; तुम्ही त्यांच्याशीं बोललांदेखील नाही. मला वाटलं होतं, तुम्ही विलायतेहून शिष्टाचार शिकून आलां असाल."

" मी विलायतेला परीक्षा देण्यासाठीं गेलो होतो, शिष्टाचार शिकण्यासाठी गेलों नव्हतों."

" पण परीक्षा तर नापास झाली, अन् शिष्टाचार तर येत नाहीत. ते कांही नाही. आता तुम्हांला सर्व रीतभात शिकली पाहिजे. आणखीन्-सुद्धा पुष्कळ शिकल्या पाहिजेत गोष्टी."

" कोणकोणत्या ?"

" मला शिकारीचा नाद आहे, घोड्यावर बसण्याची हौस आहे, ब्रिज खेळल्याशिवाय चैन पडत नाही, आणखीन् गाण्याचा तर मला शोक आहे."

" अरे बाप रे! शिकार, घोड्यावर बसणं, ब्रिज खेळणं, गाणं-बजावणं, अबब! कितीतरी कला मला शिकाव्या लागणार या! अन् हे जमणार कसं? मी म्हणतों, तुझ्या वडिलांनो इतक्या कला कशाला तुला शिकवून ठेवल्या कोण जाणे!"

" मला कला शिकवल्या, त्या मी एक राजकुमारी म्हणून. जरूरी च्या तेवढ्या शिकवल्या. त्यांना काय स्वप्न पडलं होतं की. आपली

मुलगी भटाभिक्षुकाच्या इथं पडेल म्हणून! नाहीतर त्यांनी मला दळण-कांडणच शिकवलं असतं, तुमच्यासारखं मूढ ठेवलं असतं. खरंच, तुम्हाला कोणतीच कला कशी येत नाही?"

"माझी आई लहानपणीं वारली, सावत्र आईच्या जाचामुळं मला वसतिगृहांत रहावं लागलं. अभ्यास शिकलों आणि सगळ्या परीक्षांत पहिल्या वर्गांत पास होत आलों."

"पण शेवटच्या मुख्य परीक्षेंत नापास झालांत ना? तुमच्या वडिलांनी तुमच्याकडे लक्ष्य नाही दिलं; पण तुम्ही आपणहून कोणतीच कला कशी अवगत केली नाहींत! अन् अजूनही कांहीं म्हणत नाही तुम्ही की, बरं, मी सगळ्या या कला शिकेन."

"कला शिकण्याचं एकेक वय असतं. मला आता नवीन कला कशा अवगत होणार?"

"मग माझं मोठं कठीणच दिसतं आहे!" आशेच्या डोळ्यांतून अश्रु टपटप् गळू लागले. तिचं तोंड रडवें झालें आणि रडक्या आवाजांत ती पुढे म्हणाली, "पैसा नाही तर नाही; तेंहि मी पत्करलं; पण एकही कला येत नाही. तुमच्या संगतींत दिवस तरी कसे जातील माझे?"

विश्रामने आशेला पोटाशी धरलें, तिच्या डोळ्यांतले अश्रु पुसले. या वेळीं तीं दोघे जण जितकीं एकमेकांजवळ आलीं होतीं, तितकींच त्यांची अंतःकरणें एकमेकांपासून दूर दूर गेलीं होतीं. आशेचे अश्रु विश्रामने पुसले, तरी तिच्या मनांत वाहणारे निराशेचे पाट त्याला पुसतांच काय, पण थांबवितांहि आले नव्हते. प्रत्येकास आंतून एकच भीति वाटत होती आणि ती ही की, "आपलें दुसऱ्याशीं कायमचें कसें जमणार?" आणि ही भीतीहि एकमेकाजवळ बोलून दाखविण्याचें कणास

धैर्य झालें नाही, तिचें निराकरण करण्याचे मार्गहि शोधावेसे वाटले नाहीत, अगर सुचलेहि नाहीत.

तसेच ते दोघे जण अधिक एकत्र राहते, तर खात्रीने त्या उभयांमधील बेबनावाचें अंतर अधिकच वाढत गेलें असतें; पण दुसऱ्या दिवशींच विश्रामला मुंबईस नोकरीच्या मुलाखतीस येण्याबद्दल पत्र आलें. मधुचन्द्र संपवून तीं परत आलीं. त्यांच्या वैवाहिक क्षितिजावरचा आल्हादाचा चन्द्र उगवतांक्षणींच एकदम मावळला आणि प्रेमळ सगर्ताचा मधु त्यांच्या हातीं कधीच लागला नव्हता. त्यांचे हिरमुसले चेहरेच त्यांच्या निराशा जाहीर करीत होते आणि उसन्या हसण्यांनी झाकतां येण्यासारख्या त्या निराशा क्षुल्लक स्वरूपाच्या नव्हत्या.

विश्रामला सरकारी कॉलेजांत प्रोफेसरची नोकरी मिळाली. सुरवातीला पगार तीनशेच मिळणार होता. नोकरीवर ताबडतोब रुजू होण्यासाठी तो आला. कॉलेजांत येतांच दरवाज्याशींच त्याला भार्गव भेटला. भार्गव याच कॉलेजांत डेमॉन्स्ट्रेटर म्हणून नोकरीवर होता. आपला स्नेही याच कॉलेजांत नोकरीवर असल्याचें पाहून विश्रामला पुष्कळच धीर आला व आनंद वाटला. दोघांच्या पुष्कळ गप्पागोष्टी झाल्या. विश्रामने राहण्यासाठी बंगला भाड्याने ठरविला आणि चार दिवसांची किरकोळ रजा घेऊन. तो परत गावीं आला. त्याच्या संसाराची मांडामांड करावयाची होती, सामानसुमान न्यावयाचें होतें, म्हणून तो आपल्या घरीं आला. बाजीराव कोर्टाच्या कामासाठी निघून गेले होते. घरांत एकटी इंदिराच होती. तिने सामानसुमान भांडीकुंडीं नेण्यासाठी काढलीं. मुंबईस असतांना इंदिरेने चहाचा सेट, निरनिराळ्या डिझाईनचीं टेबलक्लॉथ्स, ट्रे-कव्हर्स, उशा-तक्क्यांचे अभ्रे. अंथरापांघरायच्या भरलेल्या तऱ्ह-

तऱ्हेच्या चादरी वगैरे बराच माल खरेदी केला होता. त्या सर्व जिनसा तिने काढल्या. सामानसुमानाची रवानगीहि झाली.

" आपण घराची मांडामांड करून द्यावी, मग आशाला बोलवू. नाही ? "

" खरं म्हणजे आशादेवींनीच यायचं ! हौसेनं संसाराची मांडामांड करायची !! माझी तिकडे यायला ना नाही; पण त्यांना आवडेल न आवडेल ! "

" त्यांना म्हणजे कुणाला ? "

" त्यांना म्हणजे आशादेवींना ! यांना मी कधीच सांगून ठेवलं आहे की, संसार मांडून द्यायला, मी आपली जाणार ! एवढ्यासाठीच तर नंदाला बरोबर घेऊन मी मुंबईहून कापडंचोपडं विकत आणली. "

" खरंच, नंदाला घेऊन चला. म्हणजे एकीला दोघी सोबत होतील. आणखीन् कदाचित् नंदाच तिथे गेली, तर फायदाही होईल. "

" होय. बोलावून घेतें. तिचा काय फायदा व्हायचा आहे ? "

" दोन दिवस तेवढीच हवापालट. माझा स्नेही भार्गव आला नव्हता का इथं ? "

" मग ? "

" तो माझ्या कॉलेजांतच नोकरीला आहे, आणखीन् त्याचं लग्नहि व्हायचं आहे अजून ! मी त्याला विचारलंय्. "

" काय ? "

" त्यानं नंदाला पाहिलेली आहे. त्याला विचारलं की, नंदा पसंत आहे का तुला. म्हणजे तिच्या आईवडिलांना विचारतों. "

" मग ते काय म्हणाले ? "

" होय म्हणून म्हणाला. नंदा कशी झाली तरी माझी मानलेली बहीण आहे. आम्ही एका गावांत असलों, तर एकमेकांना तेवढाच आधार. भार्गव त्यांतून माझा बालमित्र. "

" विचारूं तिला अन् मग तिच्या वडिलांना सांगूं. तिला अगोदर पसंत पडलं पाहिजे. नंदा स्वभावानं आश्राप आहे. तिला तिच्यासारखाच गरीब स्वभावाचा नवरा पाह्यला पाहिजे. पैशानं गरीब असला, तरी चालेल. मनं जर जमलीं नाहीत, तर त्या पैशाला काय करायचं आहे ? "

" खरं आहे आपण म्हणतां तें ! "

" आशादेवींना ही नोकरी पसंत आहे ना ? त्या राह्यला येणार आहेत ना ? "

" बघायचं आता काय काय होतं तें ! "

" पण असं कां सुरवातीलाच हें ? "

" आपल्या त्यांच्या स्थितींत पुष्कळच अंतर आहे, नाहीं ? वेळ लागेल त्यांना परिस्थितीशीं जुळवून घेतांना ! "

" मग आपण त्यांना परिस्थितीशीं जमवून घेण्यांत मदत केली पाहिजे, नाही का ? त्यांना संसारांत आपलेपणा वाटल्याशिवाय त्यांचं मन तरी कसं रमणार ? म्हणून म्हटलं की, संसाराची मांडामांड, थाटाघाट सगळी दोघांनी एका विचारानं करावी. साहजिक आहे. त्यांना आपला संसार म्हणजे भातुकलीचा खेळच वाटायचा ! कंगालही दिसायचा; पण कांही दिवस त्यांच्याच कलानं, त्यांच्याच विचारानं घेतलं पाहिजे.

त्या समजुतदार आहेत, शहाण्या आहेत."

"पण पहिल्यांदा तर संसार आपण मांडून द्या. ती आली तर बरोबर पांचदहा गडी, कारकून, नोकर घेऊन येईल, वाटेल तशा जिनसा खरेदी करील. बरं, आपल्याला नाहींहि म्हणतां यायचं नाही. आपल घर मांडलेलं असलं, म्हणजे सुरवातीलाच जास्त जिनसा घ्यायला नकोत. तिच्याबरोबर मोटार, दोन गडी येणारच आहेत."

"बरं, मी येईन. नंदाला बोलावतें. आज पंधरा दिवसा माझे सोळा सोमवार उजवायचे आहेत. ते उजवीन तिथं अन् परत येईन."

"सोळा सोमवार केले होते? कर्ज फिटण्यासाठी का?"

"परीक्षा पास होण्यासाठी. परीक्षा पास झाली. मोठी नोकरी मिळाली. माझ्या नवसास देव पावला. आशादेवी येतील तोंपर्यंत. त्यांच्या देखत सोमवार उजवीन म्हणजे बरं अन् मी गुरुवार करीत जाईन नेहमीसारखे. पाहिजे तर गुरुचरित्राची पोथी वाचीत जाईन; पण परवा कुणीसं म्हणालं की, बायकांनी गुरुचरित्र वाचूं नये."

"मी गुरुवार करीत जाईन, आणखीन् गुरुचरित्राची पोथीहि वाचीत जाईन. मी हिंदुस्थानांत असतांना माझा नेम कधी ढळला नव्हता, परीक्षेंतला पहिला नंबर मी कधी सोडला नव्हता. आता पुन: सुरवात करावी."

"बरं, पण विलायतेला जाऊन आल्यावर आस्तिकपणा राहला आहे एवढा?"

"माझा स्वत:चा विश्वास त्याच्यावर आहे, असं नका समजूं! माझ्या आईनं मरतांना सांगून ठेवलं होतं की, मी गुरुवार करावेत आणि गुरुचरित्र वाचावं. आई हयात असती तर मी तिची समजूत घालून

तिलाहि तें सोडायला लावलं असतं; पण तिची समजूत घालतां येणं आता शक्य नाही; तेव्हा तिची शेवटची आज्ञा तेवढी कायम राहली आणि आईची आज्ञा म्हणून मी नेकीनं पाळीत आलो. आईचा आशीर्वाद म्हणा, कांही म्हणा, पण तिनं सांगितलेलं केल्यानं माझा फायदाच होत गेला आहे."

"बरं, पण आईची तेवढी आठवण ठेवलीत."

"मला दुसरं विरंगुळ्याचं साधनच नव्हतं. वसतिगृहांत माझ्यासारखीच सावत्र आया असल्यामुळं घरास पारखी झालेली मुलं होतीं. आम्हां सगळ्यांना आई म्हणजे परब्रह्म वाटे."

इंदिरा नंदाला घेऊन विश्रामच्या रोजगाराच्या गावी आली. त्या दोघींनी संसाराची मांडामांड लवकर केली. नवीन संसार मांडण्याची हौस इंदिरेला कधीची होती आणि ती हौसेने विश्रामचा टापटिपीचा संसार मांडीत होती. कुणा तिऱ्हाईत पाहणाराला असेंच वाटलें असतें की, जणू इंदिरा स्वतःचाच संसार मांडीत आहे. मुलाचा संसार मांडून देतांना आपण भलतीच हौस दाखवीत आहोंत, याची जाणीव मधून-मधून इंदिरेला होत असावी. मांडामांड यथास्थित झाल्याच्या आनंदातिशयांतहि 'हा आपला संसार नाही,' अशी तिला टोचणी वाटे आणि नंदाच्या दृष्टीला आपलें करणें गैरवाजवी दिसू नये, म्हणून तिने न विचारतां मुद्दामच तिला ऐकूं जाईल, असें ती म्हणे, "कुणीतरी चांगलीचुंगली मांडामांड करून दिली पाहिजे ना? आशा आली असती, तर कशाला हें पहावं लागणार होतं? आपल्याकडून आपण आपला संसार त्यांचा मांडून द्यावा, म्हणजे आपलं काम संपलं."

"अन् पुढं सुखांनी संसार करण्याबद्दल ?"

"त्याची जबाबदारी ज्याची त्यानं पार पाडायची असते. माझ्यासारखी तिऱ्हाईत फार झालं तर आसपास उभी राहून पाहिजे तर दोन कामंधामं करील, कुणाचं चुकत असेल, तर सांगेल, 'बाई ग, असं नाही, असं वागावं.'"

"ताई, तूं आता इथंच कां नाही रहात? घरींतरी एकटी कशाला राहतेस?"

"नवऱ्याच्या बायकोनं, घरीं कांही असलं, तरी आपापल्या घरी असावं. माझं काय इथंहि राहीन, यांना मी पाहिजे असेन तर—"

"त्यांना पाहिजे असेन तर म्हणजे काय?"

"हीं दोघं सुखासमाधानानं नांदत आहेत, तोंवर मला यांच्या इथं राह्यला कांहीच वाटायचं नाही. कुठंतरी काम करायचं, पोटाला खायचं. यांच्या इथंहि राहीन; पण उद्या जर यांचं पटेनासं झालं, तर मात्र एक पळभरदेखील राह्यची नाही या घरांत."

"मग माझ्याकडे रहा."

"बघेन. सावत्र झाला तरी तो माझा मुलगा! त्याच्या घरांत माझी सत्ता आहे. तुझं लग्नकार्य झालं, तर तुझाहि संसार मांडून देईन.. मी लहानपणीं सगळ्या मैत्रिणींचे खेळ मांडून देत असे. मला दुसऱ्याचे संसार मांडून देतां येतात चांगले."

"आणि म्हणूनच स्वतःचा संसार मांडायची तुला सवय नाही,. बरं का? इथं कशी तूं मांडामांड केली आहेस! नाहीतर घरीं? कुणाला वाटणारसुद्धा नाही की या बाईला इतकी मांडामांड करतां येत असेल."

"मी मैत्रिणींचा खेळ मांडून देई, तर स्वतःचा का मला मांडतां

येत नव्हता ? पण दैवानं मोडकळीस आलेला संसारच माझ्यापुढं मांडलान्. मला त्यांत आपलेपणा कधीच वाटला नाही. आणखीन् पुरुष जर सगळींच बायकांचीं कामं स्वतः हौसेनं करीत राहिले, तर बायकांना तरी कशानं आपलेपणा वाटणार आहे त्यांत !"

भार्गवाला घेऊन विश्राम एक दिवस घरीं आला. त्याला त्यानें सगळा बंगला दाखविला. तो त्याला म्हणालाहि, "विश्राम, राजकुमारीचं स्वागत करण्यालायक झाला आहे आता हा बंगला."

भार्गव बाहेर येऊन बसला. विश्रामने नंदाला बोलावलें आणि तिघे जण इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलत बसले.

"भार्गव, तुला काय काय कला येताहेत ! गाणं, वाजवणं, शिवणंटिपणं, स्वयंपाकपाणी, सगळी माहिती सांग पाहूं ?" विश्राम म्हणाला.

"शिवणंटिपण, स्वयंपाकपाणी, झाडणंलोटणं, आणखीन् नाहीं का कांही ? विश्राम, यांना कला का म्हणतां तुम्ही ? आम्हीं बायका याला घरकामं समजतों." नंदा हसून म्हणाली.

"यांतल्या बघा मला, इतक्या बाबती येतात." भार्गव म्हणाला. "मला स्वयंपाक उत्तम येतो. मधे मी शिपी होणार होतों, म्हणून शिवणंटिपणं येतं. अन् विश्राम तुला माहीतच आहे की, मला गाणं चांगलं येतं. नाटककंपनींत मला बोलवीत होते."

"हे पहा !" विश्राम म्हणाला. "काय काय येतं त्याची परीक्षा इथं दिली पाहिजे. मी साथ देणार नाहीं. नंदा, आंतून पेटी आणवतां का ? भार्गव तुझं गाणं ऐकल्याला पुष्कळ वर्षं झालीं. दोन

चिजा म्हण. अन् नंदा, गरम चहा आणा बरं का! घसा तापला पाहिजे, त्याशिवाय चांगला लागायचा नाही."

नंदाने आंतून बाजाची पेटी आणली. इंदिरेने चहाचें सामान आणलें. सगळ्यांचें चहा पिणें होतांच भार्गवाने पेटी हातीं घेतली आणि गाण्यास सुरवात केली.

भार्गवचा आवाज मंजूळ होता आणि तयारीसुद्धा बरी होती. दोन पदें झाल्यावर तो थांबला.

"बरं भार्गव, असं कर, नंदाताईंना आपल्या कॉलेजची इमारत दाखवून आण आणि असं बघा, तुमची ओळख कशासाठी करून देत आहोंत, तें तुम्हांला माहीत आहेच. तेव्हा नुसतंच हिंडूं नका. बोलाहि बरं का नंदाताई! भार्गव आपल्या घरांतलाच आहे."

नंदाला घेऊन भार्गव फिरायला गेला. इंदिरा विश्रामला म्हणाली,

"भार्गव स्वभावानं चांगला दिसतो आहे. नंदाच्या वडिलांचं लिहून आलं आहे कीं, स्थळ त्यांना पसंत आहे. नंदाला पसंत आहे कीं नाही, तें विचारून कळवावं. ठरवायला आम्ही येतों."

# ११

इंदिरेचे सोळा सोमवारचें व्रत उजवायचे होतें, त्याच्या तिसऱ्या दिवशीच नंदाच्या लग्नाचा मुहूर्त नक्की झाला होता. अर्थात् नंदाचे आई-वडीलही इंदिरेकडे भोजनास येणार होते.

आशा यापूर्वीच येऊन दाखल झाली होती. इंदिरेने केलेली मांडामांड तिने गड्यांकडून पार बदलून टाकली आणि माहेरहून आणलेलें सामान व फर्नीचर यांची स्वतःच्या देखरेखीखाली पुन: मांडामांड केली. बंगल्यापैकी अर्धा भाग आशेने आपणांकडे स्वतंत्र म्हणून ठेवला आणि अर्ध्या भागांत इतर सर्वांचा समावेश व्हावयाचा होता. तरीहि बाकीची मंडळी आणि विश्राम यांनी कुणी कांहीच हरकत घेतली नव्हती. ती पावलागणिक विश्रामला 'असं वागा, तसं वागा' असें बजावीत असे. स्वतः तिच्या तैनातीसाठी राजेसाहेबांनी दोन गडी, एक शागीर्द आणि एक मोलकरीण एवढीं माणसें पाठविलीं होतीं. तीं नोकरमाणसें फक्त आशेलाच ओळखीत, विश्रामासुद्धा सर्व.. आशेचे नोकर म्हणून लेखीत.

इंदिरा घरांत स्वयंपाक करी आणि शिवाय वरचीं कामेंहि तीच करी. आशेने घरांत आल्यापासून एका शब्दानेसुद्धा इंदिरेला विचारलें नव्हतें, कीं तिची वास्तपूस्त घेतली नव्हती. तिची ती चमत्कारिक आणि उद्दामपणाची वर्तणूक पाहून नंदाने इंदिरेला म्हणावेंसुद्धा की, ' ताई, तुझी जर त्या मुळींच किंमत ठेवीत नाहीत, तर तूं तरी कशाला राहिली आहेस ?' त्यावर इंदिरेने उत्तर द्यावें, ' मी विश्रामसाठी राहिलें आहे. विश्रामचीसुद्धा जी किंमत ठेवीत नाही, ती तुझीमाझी किंमत ठेवणार आहे का ? एवढं व्रत उजवलं, तुझं लग्न झालं की, मी कशाला राहतें आहे इथं ? "

नंदाचें भार्गवाशीं सहजासहजीं लग्न जमलें. नंदाने त्याला पसंत केलें; कारण तो विश्रामचा मित्र होता आणि विश्रामच्या मनांत त्या दोघांचें लग्न व्हावें, असें होतें. विश्रामच्या गावींच आपल्याला राहायला मिळेल, विश्रामच्या स्नेह्याची बायको म्हणून आपल्याला त्याच्याकडे जातांयेतां येईल, याच विचारांचा पगडा तिच्या पसंतीवर विशेषेंकरून होता. भार्गव दिसण्यांत सुरेख होता, गुणी होता, विनयशील होता आणि विश्रामच्या अर्ध्या वचनांत होता, कमावताहि होता; म्हणून तिला तो पसंत पडणें साहजिकच होतें. भार्गवावर विश्रामचे पुष्कळ उपकार होते. त्याची शाळाकॉलेजांतली फी, पुस्तकें विश्रामने पुरीं पाडलीं होतीं. तो त्याच्या आज्ञेंत असे. विश्रामने नंदाबद्दल शिफारस केली, ती आपली मानलेली बहिण असल्याचें सांगितलें, यामुळे भार्गवानेहि नंदाला पसंत केलें होतें. जेवढ्या प्रकाराने बाह्य आणि आवांतर गोष्टींवर विसंबून लग्नें ठरविण्यांत येतात, त्या सर्व गोष्टींचा विचार होऊन, नंदाभार्गवाचें लग्न ठरलें होतें आणि होणार होतें.

सोळा सोमवारचें व्रत उजविण्याचें समजतांच आशेच्या कपाळांत

तिडीक उठली. तिला हें आवडत नाही, ही गोष्ट इंदिरेला माहीत नव्हती. तिने चहाच्या वेळेला ब्राह्मणाहाती निरोप पाठविला की, 'संध्यांकाळी पूजेला जोडप्यानं बसाल का?' त्यासरशी आशा एकदम उसळलीन् म्हणाली,

"आईसाहेबांना सांगा की, कुणा भटाभिक्षुकाची मुलगी सून म्हणून करून आणली नाहीत!"

"पण–" विश्राम आवंढा गिळून म्हणाला, "पण एवढं रागवायचं काय कारण? तुम्हांला नसलं वाटत, तर नका बसूं. मी आपला बसेन."

"खुश्शाल बसा. तुम्ही तरी कुणासारखे होणार? बोलून-चालून आजोळ भिक्षुकांचं! तेच संस्कार उतरले आहेत अंगांत!"

"पेशवाईच्या अगोदर सगळे भटभिक्षुकच होते. सरदार, जहागिरदार, संस्थानिक आज जे दिसताहेत, ते सगळे सगळे भटभिक्षुकच होते!"

"पूर्वी असतील; पण आज तरी ते गृहस्थासारखे वागताहेत ना? नाहीतर तुम्ही बघा! म्हाताऱ्या बायकासारखे गुरुवार काय करतां, क्षौरी भटासारखी पोथी काय वाचतां? एक, एक लक्षण मला आवडत नाही तुमचं! खरंच सांगतें. मला लग्नाच्या अगोदर म्हणालांत कसं, की मी तूं सांगशील तसं ऐकत जाईन. हें माझ्या मनासारखंच वागत अहां ना?"

"अन् मी तुमच्या मनाप्रमाणं वागेन, अशा तूंहि आणाशपथा घेतल्या होत्यास! तूं ज्याप्रमाणं माझ्या मनासारखी वागतेस, त्याचप्रमाण मीहि तुझ्या इच्छेप्रमाणे वागतों. अन् असं बघा! या पोथीबद्दल आणि उपास करण्याबद्दल मी परवा सांगितलं की, पुनःपुनः बोललेलं मला

खपत नाही. त्यांची टवाळी करण्यांत माझ्या मेलेल्या आईचा अपमान करण्यासारखं मी समजतों."

"अन् मलाहि हें तुमचं उपास करणं, पोथ्या वाचणं खपत नाही. माझ्या सुधारकी वागणुकीची ती धडधडीत टवाळीच तुम्ही आरंभली आहे, असं मी समजतें. अन् मी सांगतें, या बंगल्यांत व्रतवैकल्यें उजवायचीं नाहींत. पाहिजे तर गावांतल्या एखाद्या देवळांत, नाहींतर धर्मशाळेंत जा, खुश्शाल व्रतं उजवा, ब्राह्मणभोजन घाला!"

"आजचं हें होऊं दे. पुढल्या वेळेपासून सांगू."

"माझ्या इथं कांहींसुद्धा मी होऊं देणार नाहीं."

"आईसाहेबांना कसं सांगणार? त्यांचंहि हें घरच आहे!"

"माझ्यापेक्षा तुम्हांला तुमच्या आईची किमत जास्त वाटते. बरं, होऊं द्यात तुमचीं व्रतं! मी आज दुपारीं जातें घरी, आठ दिवसांनी येईन. परवा तुमच्या नंदाचं लग्न आहे. सगळं गोत तुमचं जमा होणार. माझी अडचण नको. तुम्हांलाहि मनमोकळेपणानं वागायला सापडेल. –अरे, माझी बांधाबांध कर. मोटारींत पेट्रोल टाकायला सांग. आज दुपारीं आपल्याला घरीं जायचं आहे बरं का!" आशा जागेवरून उठली, आपल्या खोलीत गेली आणि तिने खोलीचें दार धाड्कन् लाऊन घेतले. तिला आलेला राग तिने दारावर काढला.

विश्राम खिन्न होऊन बसला.

थोड्या वेळाने दार उघडून आशा गाण्याची लकेर फेकीत बाहेर आली. विश्रामकडे तिने पाहिलेंसुद्धा नाही. 'अंघोळीचं पाणी काढ. अन् न्हाणं झालं, म्हणजे म्हणावं गाडी पाहिजे आहे. मला गावांत जायचं

आहे.' असें म्हणून ती विश्रामच्या अंगावरून निघून गेली; पण कसली तरी आठवण होऊन ती परत आली आणि म्हणाली,

"मला शंभर रुपये पाहिजे आहेत, बरं का !"

"अजून पगार व्हायला अवकाश आहे !"

"पण मला आज खर्चायला पाहिजेत."

"पण पगार झाल्याशिवाय कुठून आणूं ?"

"म्हणजे! शिल्लक मुळीच नाहींत ?"

"शिल्लक कुठून असणार ? तुम्हांला माहीत आहेच की, माझा पगार हीच काय ती माझी श्रीमंती! बोलूनचालून मी गरीब आहें."

"गरीब, गरीब! गरिबीला तरी कांही मर्यादा असते! हजार दोन हजारसुद्धा हातखर्चासाठी शिल्लक नाही, ही काय गरिबी म्हणायची कीं काय ? कंगाल माणसं असतात, त्यांच्याजवळसुद्धा दोनपांच हजार शिल्लक असते."

"मी आहे हा असा आहे."

"हूं: ! आडली गाय, फटके खाय !! पैसा, रूप, गुण, स्वभाव, कांही म्हणतां कांहीच कसं चांगलं माझ्या वाट्यास आलं नाही."

विश्राम रागाने उठून गेला. आशेची बडबड त्याला ऐकूं येत होती. कर्मधर्मसंयोगाने इंदिरेने हें सर्व बोलणें आणि हा सर्व तमाशा पाह्यला नव्हता.

दुपारीं विश्राम कॉलेजांत गेला आणि आशा आपल्या माहेरी निघून गेलीं. सोळा सोमवारचें व्रत संध्याकाळीं उजवलें गेलें आणि पुढे दोन दिवसांनी नंदाचेंहि लग्न पार पडलें. इंदिरा घरीं परत गेली.

आठ दिवसांनी आशा परत आली. विश्राम तिच्याशीं अशा आदबीने आणि आनंदाने वागला की, जणू कांहीच बोलाचाली त्यांची झालीच नव्हती. आशाहि बरीच नरम झालेली दिसली. राजेसाहेबांनी तिची चांगलीच कानउघाडणी केली होती आणि पाठोपाठ ते विश्रामला भेटायला म्हणून आले.

विश्रामला एकीकडे घेऊन जाऊन, राजेसाहेब प्रेमाने म्हणाले, " आपण काटकसरीनं संसार करावा. या पगारांतूनच आपल्याला दोन पैसे मागे टाकले पाहिजेत. आशाला अजून कळत नाही. मी तिला समजावण्याचा प्रयत्न करीत राहीन. ती जरा पहिल्यापासून हट्टी आहे; म्हणून तिचं बोलणं मनावर घेत जाऊं नका." यावरून आशेला चांगलीच समजूत राजेसाहेबांच्याकडून मिळाली असावी, हे उघड होतें. यापुढे त्याच्या कुटुंबांत एकदम जास्त आनंद पसरावा, अशी घटना आपोआप घडून आली.

नंदाचें लग्न झालें, आणि ती आता त्याच गावांत रहात होती. नंदा ही विश्रामची मानलेली बहीण, त्यांतून ती जास्त समजूतदार. आशेच्या कलाने ती घेई. नंदाचा मुख्य हेतु विश्रामचा स्नेहसंबंध कायम ठेवण्याचा होता, तेवढ्यासाठी ती वाटेल तो अपमान आणि दगदग सोसायला तयार होती. आशेच्या मनाला रुचेल, असेंच बोलावयाचें, तिचीं सर्व गाऱ्हाणीं निमूटपणें ऐकून घ्यावयाचीं, तिच्या हरघडीं उपयोगीं पडायचें, अशी तिने वागणूक ठेवली होती; त्यामुळे आशेची नंदा थोडक्याच दिवसांत आवडती झाली. भार्गवहि आता सकाळ-संध्याकाळ विश्रामकडे येऊं लागला. त्याची ऐटबाज आणि खर्चिक राहणी, सुंदर रूप, बोलण्याचालण्यांतली आदबी, प्रसंगास अनुरूप शिष्टाचार, यांमुळे तो कुठेहि गेला, तरी ताबडतोब सर्वांना आवडूं लागे.

तशांत विश्रामचा तो बालपणाचा स्नेही. तो विश्रामचें मन संभाळीत असे. आशेशीं त्याची विश्रामने ओळख करून दिली, ती लवकरच दाट मैत्रींत परिणत झाली. आशेप्रमाणेच त्यालाहि कपड्यालत्त्यांची, टापटिपीची हौस; आशेप्रपाणेच त्याला इंग्रजी शिष्टाचारांबद्दल अभिमान आणि तिच्याप्रमाणेच त्याला गायनाची कला अवगत. तेव्हा त्यांची मैत्री जमणें साहजिक होतें. भांड्यावर भांडीं आपटूं लागलीं, म्हणजे मधे फडकीं किंवा गवतगळाठा घातल्याने त्यांची एकमेकांची टक्कर थांबली नाही, तरी आवाज निघण्याचे बंद होतात. पतिपत्नी एकमेकांशीं पदोपदीं वितंडूं लागलीं, म्हणजे तिऱ्हाईत माणसांची संगति त्यांच्या वितंडवादाला बराच आळा घालते. तसेंच विश्राम-आशेच्या कुटुंबांत भार्गव-नंदाच्या कुटुंबाच्या येण्याने झालें. विश्राम, नंदा, भार्गव, आशा, अशी ही चौकडी एकत्र बसे, खेळ खेळे, बरोबर फिरायला जाई, गाणींबजावणीं करी. आणि नात्याने नंदाला भार्गव, तसा आशेला विश्राम जवळचा खरा; परंतु नंदाचे आचारविचार विश्रामशीं तंतोतंत जमले होते, तर आशेचे भार्गवशीं झपाट्याने जमूं लागले होते. शिष्टाचार आणि स्त्रीदाक्षिण्याच्या नांवाखालीं भार्गव आशेचा कड घेई, तर विश्राम नंदाची बाजू घेई आणि पुढेपुढे असेंहि होऊं लागले की, खुद्द नंदालाही भार्गवपेक्षा विश्रामने आपली बाजू घ्यावी. असें वाटूं लागलें; तसेंच आशेलाहि विश्रामपेक्षा भार्गवनेच आपली कड घ्यावी, असे वाटे. नंदा-भार्गव व आशा-विश्राम ही नात्याने, संघटनाने, जितकीं जवळचीं होतीं, तितकीं भार्गव-आशा आणि नंदा-विश्राम हीं भावनांनी एकमेकाला चिकटून राहिली होतीं. चौघेंहि शिकलेलीं, तरुण आणि स्वतंत्र, त्यामुळे ती मनमोकळेपणाने वागूं लागली.

"विश्राम स्वभावाने फार चांगले आहेत नाही?" भार्गव

आशेला म्हणाला. त्या वेळेला ते दोघेच जण शिकारीसाठी रानांतून हिंडत होते.

" हूं:ऽ" असा सुस्कारा आशेने सोडला.

" तो ल्हानपणापासून फारच अभ्यासी! खेळाची कीं कलेची, कसलीच त्याला आवड नाही. खरं म्हटलं म्हणजे, त्यानं आता शिकलं पाहिजे तुमच्यासारखं वागायला!"

" पण माझ्याबद्दल एवढी कळकळ वाटत असती तर ना? ठीक आहे झालं!"

" जोडीदार जर आपल्या विचार-आचारांचा असेल, तरच मौज असते, नाही? नंदाची गोष्ट सांगतों. मी नव्या विचाराचा, तर ती जुन्या आचाराची. मला गाण्याबजावण्याचा शोक, तर तिला वाचण्याची हौस."

" अगदी तोच प्रकार आमचा आहे. भार्गव, तुम्हांला कल्पना नसेल. भावनांचा कोंडमारा किती सहन करते मी!"

" अस्सं!"

" पण मी पराकाष्ठेची सहनशील आहें. यांचा कल जुन्याकडे. नंदाच त्यांना बायको शोभली असती, नाही? अन् तुम्हांला माहीत असेल की, त्यांचंन् नंदाचं लग्नाचं पुष्कळ वर्षं अगोदर ठरलं होतं; पण पुढं पैशाची गरज लागली, अन् आमच्या वडिलांनी पैसे दिले म्हणून माझ्याशी लग्न करावं लागलं त्यांना!"

" अस्सं? नंदाचं त्याचं लग्न ठरलं होतं? एकमेकांचं प्रेम जडलं होतं?"

" प्रेम जडलं असल्याशिवाय का एकमेकांनी लग्नाचं जमवलं

होतं ? अजूनहि बघानात ! दोघं जणं कशीं नवराबायकोसारखीं एक-मेकांवर प्रेम करतात."

" पण लग्नाचं जमलं होतं, असं कुणी सांगितलं ? "

" त्यानंच सांगितलं. विश्राम तसा भोळा आहे. मीहि उदार मनाची आहें. खरोखरीच त्यांचं प्रेम आहे एकमेकांवर, तर खुशाल त्यानं तसं वागावं, अशा मताची मी आहें. म्हणून मी पहात असून, कानाडोळा करतें."

" बाईसाहेब ! आपण म्हणतां हें सगळं खरं ? "

" अहो, तुम्हांला नंदाशीं लग्न करण्याबद्दल विश्रामनं गळ घातली, ती कशाकरिता तुम्ही समजलात? अन् नंदानंसुद्धा चटकन् होय म्हटलं, तें कां ? पण मी नाहीं कुणाच्या भानगडी उकरीत बसत. मी सांगूं फार भोळी आहें. अन् माझ्या मी विवंचनेंतच चूर असतें."

" विवंचना अन् कसली ? "

" कसली म्हणजे कसलीतरी ! "

" तरीपण ? "

आशेने अंगातला कोट काढून खांद्यावर टाकला, गळ्याचा मफलर काढून हातांत घेतला आणि एका झाडाच्या बुंध्याला बंदूक टेकून टेऊन ती खाली बसली. तिचा चेहरा म्लान झाला, डोळे भरून आले आणि ती खाली मान घालून जोरजोराने उसासे टाकूं लागली. भार्गवाला कळवळा आला, तो जवळ जाऊन बसला आणि म्हणाला—

" बाईसाहेब, असं डोळ्यांतून तुम्ही पाणी काढूं लागलांत, तर कसं चालेल ! कसली विवंचना आहे ? एवढे राजेसाहेब असतांना विवंचना कसली ? "

❀

" माझं दु:ख निवारण करण्याचं राजेसाहेबांच्याहि हातांत नाही. अन् ते तर माझं बोलणं ऐकूनहि घेत नाहीत."

" मग कोणचं दु:ख आहे? कुणाला सांगितलं, तर माझ्यासारखा मदत करील."

" खरं? अगदी मनापासून बोलताहां ना?"

" असं काय विचारतां? माझी खात्री पटत नाही होय?"

" तुम्ही त्यांचे स्नेही आहांत. नाही म्हणाल!"

" छे: छे:! तो जसा माझा स्नेही आहे, तशा तुम्हीहि माझ्या स्नेहीच आहांत!"

" नुसता स्नेह काय कामाचा?"

" तुम्हीं सांगाल ती मदत करीन! कबूल."

" मला आपली म्हणाल? भार्गव, मी तुम्हांला शरण आले आहें. नाही म्हणूं नका!"

भार्गवचे दोन्ही हात आशेने आपल्या हातांनी घट्ट धरले आणि म्हणाली, " भार्गव, तुम्हांला काय सांगूं? आमचं नातं संपुष्टांत आलं आहे. मी कसे दिवस काढायचे? तुमचाच आता मला आधार! भार्गव तुम्ही भारीच भित्रे! तुम्ही इतके भितां, पण नंदा भ्यायली असेल का?"

आशेला भार्गवाने पोटाशीं धरले.

" आशा, माझ्यावर विश्वास ठेव. मी तुला कधी अंतर देणार नाहीं."

" अगदी कध्धी कध्धी विसरणार नाही ना?"

"नाही, नाही." असें म्हणतां म्हणतां आशेचें तोंड त्याने बंद केलें.

दोघे जण परत फिरलीं. आशेचा हात भार्गवच्या हातांत होता; तिचा कोट, मफलर भार्गवच्या बगलेंत होता. मागोमाग शिपाई बंदूक घेऊन येत होता. तरी त्यांना संकोच वाटला नव्हता. भार्गव म्हणाला—

"आशा, तूं इतकी सुरेख आहेस, इतकी सुस्वभावी आहेस की, कुणीहि आपला जीव तुझ्यावरून ओंवाळून टाकील. विश्रामचं नवल वाटतं मला की, त्याचं तुझ्यावर प्रेम कसं नाही बसलं? अगदीच अरसिक आहे, नाही!"

"खरं सांगूं? विश्राम मला पहिल्यापासून कधीच आवडला नाही. काय पाहून तरी मी प्रेम करावं? सांगा ना? का पैसा आहे? का स्वभाव आनंदी आहे? का रूप आहे? तूं कित्तीकित्ती सुरेख आहेस! भार्गव, तूं माझा ना? अगदी एकटीचा माझा!! बरं का?"

"तूंहि माझीच ना?"

"अगदी तुझी एकट्याची! विश्रामची तर मी कधीच नव्हतें, नाहीहि!"

आणि दुसरीकडे याच वेळीं बंगल्याच्या पुढच्या व्हरांड्यांत विश्राम नंदाशी बोलत बसला होता.

"भार्गव नीट वागतो ना तुमच्याशीं? तो सुधारक, तुम्हीं जुन्या वळणाच्या! म्हणून विचारतो." विश्रामने विचारलें.

"ठीक आहे. जुन्या वळणाची मी आहें, म्हणूनच वाटेल त्याच्याशीं मी जमवून घेईन. पति हा आमचा बोलूनचालून परमेश्वर!

एखादं दैवत कडक असलं, म्हणजे नाही का आपण त्याचं संभाळून करीत? तसं पतिदैवत जसं असेल, तशी त्याची सेवा करायची."

"भार्गव तसा स्वभावानं बरा आहे, पापभीरु आहे."

"कोण हे ना? बरे पापभीरु असतील? स्वारीचे एकेक विचार ऐकले, म्हणजे माझ्यासारखीच्या मनाला तर धक्का बसतो!"

"अस्सं?"

"फारच पुढे गेलेले विचार आहेत. तुमच्याजवळ काय बोलणार ते? पण फारच भयंकर विचार आहेत हो!"

"आहेत तरी असे कसले विचार?"

"दुसऱ्या कसल्या विचारांचा धक्का बसणार? नीतिबद्दलचे विचार भलतेसलते आहेत हो!"

"अस्सं? हें मी नवीनच ऐकतों!"

"नवराबायकोला वाटेल त्याच्याशीं स्वैराचार करण्याची मोकळीक असावी, असं म्हणतात! एकसारखं म्हणतात!! हट्टच धरून बसले आहेत म्हणानात!!! शेवटीं मी म्हटलं की, 'स्वैराचारच करायचा होता, तर लग्नाच्या यातायातींत कशाला पडलांत? दुसऱ्याला खोड्या-बेडींत अडकवून ठेवलंत्?'"

"मग तो काय म्हणाला?"

"ते म्हणाले, 'कायद्यानं मी सुटाच आहें, तुला मोकळीक द्यायला माझी ना नाही.'"

"तुम्ही त्याला आवडेनाशा झालांत तर नाही ना?"

"मी आहें तशीच आहें. आता आवडत नसेन त्यांना तर पूर्वीहि

आवडलें नसेन कधी! मला दिसतच होतं. मी रूपानं साधारण, ते स्वरूपानं सुरेख! त्यांना सुंदर बायकोची हौस होती; पण गाठ पडली माझ्यासारखीशी."

"स्वतः सुंदर माणसांना साधारण स्वरूपाच्या जोडीदाराचा तिटकारा येत असेल नाही?"

"मलासुद्धा असंच वाटूं लागलं आहे आताआताशा! आमची ताई, तुमची आई म्हणते तेंच खरं! ती म्हणते, नवराबायकोंच्या स्वभावांत, श्रीमंतींत, स्वरूपांत, वयांत अंतर असलं की, ती सुखाला अंतरतात!"

"खरं आहे त्यांच म्हणणं. कांही विधानं अशी असतात की, जों जो जास्त अनुभव येतो, तों तों त्यांची सत्यता अधिकाधिक पटूं लागते."

"पण ताई काय, मी काय; आम्ही आपली दैववादी माणसं! आम्हांला वडील मंडळींनी एकच शिकवलं. इमानंइतबारं स्वत.चं कर्तव्य बजावायचं, त्यांत कधीं प्रतारणा करायची नाहीं. मग लोक आम्हाला मूढ म्हणोत की भेकड म्हणोत."

"असंच असलं पाहिजे माणसांनी! नाहीतर घराच्या धर्मशाळा होतील!"

नंदा बोलण्याची बंद झाली, विश्राम गंभीर झाला आणि हाताचीं बोटें एकमेकांवर उडवीत त्याने सुस्कारा सोडला.

ती स्तब्धता असह्य होऊं लागली, म्हणून नंदाने हळूच विचारलें, "आशा केव्हा येणार आहेत?"

"कुणाला ठाऊक! राजेसाहेबांच्याकडे गेल्या आहेत, तिथून

शिकारीला जाणार होती. भार्गवलाहि सुट्टी आहे. दोन दिवस उशिरा आले तरी काय हरकत आहे ?"

"घर-संसार मांडल्यानंतर माहेरचा लोभ नको का आता सोडायला यांना ? मी पाहतें आहें उगीच. इथं चार आठ दिवस येऊन राहल्या की, लगेच माहेरीं जातात. महिन्या पंधरा दिवसांनी परत येतात, पुन: चार आठ दिवसांनी परत जातात. अशानं माणसांचीं मनं तरी एक-मेकांशीं जमायचीं कशी अन् घराबद्दल आपलेपणा तरी वाटायचा कसा ?"

"पण नुसत्याच राहण्यानं तिचं मन इथं थोडंच लागणार आहे ? आणि तिचं मन इथं रमावं, असं काय आहे ?"

"म्हणजे ? बायकांना नवऱ्याशिवाय दुसरं काय लागत असतं मन रमायला ?"

"एकमेकांचीं मनं जुळलीं असली, म्हणजे मग ती एकमेकांच्या संगतींत रमणारच ! हरकत आहे ती दोघांची मनं जुळण्याची ! तुम्ही म्हणालांत ना आत्ता, की नवराबायकोच्या स्वभावांत, श्रीमतींत, स्थितींत, स्वरूपांत, कशांतसुद्धा अंतर असतां कामा नये."

"बरं मग ?"

"हिच्यान् माझ्या स्वभावांत, स्वरूपांत, स्थितींत, एवढं जबरदस्त अंतर आहे की, तें तिला कधीच ओलांडतां यायचं नाहीं, अशी माझी खात्री होत चालली आहे. आशेला मी दोष देत नाही. तिनं पहिल्यापहिल्यांदा आपल्याकडून शिकस्त केली, माझ्याशीं जुळवून घेण्याची; पण दरेक वेळीं तिला अपयश येई, निराशेने ती दीन होई, हें मी एकसारखं निरीक्षण करीत होतों. आमच्यांतली विसंगति अशी कांही अभेद्य आहे की, मी वाटेल तें केलं, तरी तिच्या मनासारखं होणं शक्य नाही. तिचं

शिक्षण, पूर्ण संस्कार, सुस्थिति, स्वरूप, कलानैपुण्य, लक्ष्यांत घ्या! तिनं जोडीदाराविषयींच्या केवढ्या मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा मनांत धरल्या असतील! त्या सर्व आशांचा झालेला चक्काचूर आशेसारखीला सहजासहजी विसरून जातां येणं शक्य आहे का? तिच्या मनोराज्याची राखरांगोळी कशामुळं झाली, तर माझ्यामुळं! नव्हे माझ्या गरिबीमुळं!! मला जर त्यांचे पैसे देतां आले असते, तर त्यांनी माझ्या गळ्यांत हिला बांधण्याचा हट्ट धरला नसता! खरं म्हणजे तिचे वडीलच याबद्दल जबाबदार आहेत; पण शेवटी नवरा मनासारखा मिळाला नाही, म्हणून दुःखी झाले, असं तिला पदोपदी वाटणारच! आणि अखेर मीच तिला शत्रूप्रमाणं वाटणार, नाही का? अन् मग जर ती माझा तिरस्कार करीत असली, तर त्यांत तिचा काय दोष? मलाहि मनापासून वाईट वाटतं की, एका चांगल्या तरुणीचा आपण लग्न लाऊन घात केला! मी आंतून ओशाळा असतों, कष्टी असतो; त्यामुळं तिच्याशीं बरोबरीच्या नात्यानं बोलण्यावागण्याची मला हिम्मतच होत नाही. पुरुषाची कुठल्याहि बाबतींत एकदा का आपल्या बायकोच्या समोर हिम्मत खचली, म्हणजे तो तिला निस्तेज वाटूं लागतो, आवडेनासा होतो, नको-नकोसा होतो." विश्राम जागेवरून उठला आणि व्हरांड्यांत खेपा घालूं लागला.

"अगदी पहिल्यापहिल्यांदा माणसांची मनं जशीं जुळतात, तशीं तीं पुनः दुसऱ्याशीं कशीं जुळणार? शिळ्या कढीला ऊत आणल्यासारखंच ते! असलेली चव घालवील."

"काय म्हणालांत? याचा अर्थ मी समजलो नाही."

"असंच असतं."

"आपणा दोघांबद्दल तर नाही ना कांही म्हणालांत? मी तुम्हांला बहीण समजत होतों, समजत आलों आहे."

" तुमच्याबद्दल मी कशाला बोलूं?"

"मग आशेबद्दल बोललांत का हें?"

" मी उगीच कांहीतरी बोलायचं म्हणून बोललें. त्याचं काय मनावर घेतां?" नंदाने ओठ चावला. थांबून ती म्हणाली, "बरं आता मी जातें अन् आज संध्याकाळीं आमच्याकडेच जेवायला या की."

" आज नको. भार्गव आला, म्हणजे मी होऊन येईन. आज माझी तब्बेत बरोबर नाही. पाहिजे तर तुम्ही इथंच जेवा."

" आशादेवी आल्या, म्हणजे मी येईन जेवायला! जशास तसं. नाही का?"

नंदा उसनें हासली, विश्रामही बळेंच हासला. नंदा जड पावलांनी परत फिरली. ती खाली मान घालून कसलातरी विचार करीत चालली होती. विश्राम ती अदृश्य होईतोंवर शून्य नजरेने तिच्याकडे पहात राहिला.

# १२

आशेचा आणि भार्गवचा प्रेमसंबंध नंदापासून गुप्त राहणें शक्य नव्हतें; भार्गवाला तसा तो लपवून ठेवावासें वाटलेंहि नाही. तो उघड उघड आशेच्या सौंदर्याबद्दल, कलाकौशल्याबद्दल, परस्परांच्या आसक्ती-बद्दल नंदाजवळ खुशाल बोलत असे. नंदा भार्गवच्या या निर्लज्ज, बदफैली वागणुकीनें अगदी चिडून गेली होती. तिनें चिडून असेंच कांही म्हटले, तेव्हा भार्गव म्हणाला,

"तुझं कांही कमी पडत नाही, तोंवर तुला बोलण्याचा अधिकार नाही."

"मला कां अधिकार नाही? मी चांगली लग्न लावून आलें आहे."

"मला उगीच डिवचूं नकोस! आपण एकमेकांना चांगले ओळखतों, यांत समज. मी जोंवर तुझ्याआड येत नाही, तोंवर तुलाहि माझ्या उठाठेवी करण्याचं कारण नाही."

" याचा अर्थ मी समजलें नाही."

" विश्रामला विचार, तो सांगेल."

" म्हणजे त्यांनाहि हा तुम्हां दोघांचा सावळागोंधळ माहीत आहे वाटतं ? आणि ते खुश्शाल हें चालू देतात ? "

" आमचा संबंध विश्रामला माहीत आहे कीं नाही, मला माहीत नाही आणि त्याच्यासारख्यांनी या आमच्या कृत्याला हरकत कां करावी ? तुमचे जसे दोघांचे मार्ग, तसे आमचे दोघांचे ! "

" तुमचे दोघांचे म्हणजे कुणाचे ? "

" तुझे आणि विश्रामचे."

" आमचे काय मार्ग ? "

" ज्या मार्गाबद्दल तूं आम्हां दोघांना नांवं ठेवतेस ते मार्ग ! "

" म्हणजे ? हें काय भलतं तुम्ही बोलतां ! अन् असलं भलतं तुम्हांला सांगितलं तरी कुणी ? "

" कुणीतरी सांगितलं."

" हें साफ खोटं आहे."

" मोठी खरं बोलणारी माहीत आहे ! बरं, पाहूंच आता. खरं सांग, तुझी त्याची लग्नापूर्वी ओळख होती की नाही ? "

" होती."

" प्रेम होतं कीं नाही ? "

" बहीणभावाचं प्रेम होतं, अजूनही आहे."

" झालं. मला पाहिजे होतं तें उत्तर मिळालं."

" थांबा! मी अशी तुम्हांला सोडायची नाहीं. वाटेल ते आरोप जर माझ्यावर करूं लागलांत, तर मी नाहीं हो सहन करणार! माझा विश्रामचा असला किळसवाणा संबंध नाही. पाहिजे त्याची शपथ वाह्यला तयार आहें. सांगा, तुम्हांला कुणी सांगितलं तें!"

" आशाच सांगत होती. तिच्या नजरेस आलं असेल, म्हणूनच ती मला म्हणाली असेल."

" पुरे. उंदराला मांजर साक्ष. आशा काय मोलाची आहे, तें ज्याला माहिती नाहीं, त्याला तरी सांगा. तिला सांगा की, दुसऱ्यावर खोटेनाटे आळ घेतल्यानं आपलीं पापं धुवून जात नसतात."

" तिचीं काय पापं ?"

" लग्नापूर्वीचीं सांगूं कीं नंतरचीं सांगूं ?"

" असेल ! ती राजकन्या आहे, कलावंत आहे. विश्रामसारखा नंदीबैल गळ्यांत पडला, तर तिनं आपली हौस काय मारून टाकायची आहे, होय ?"

" अन् ती कशाला हौस मारील ! आपल्यासारखी कलावंत सुरेख माणसं तिला गवसलीं, तर ती कां म्हणून कमी करील ! चांगलं! चांगलं !! चांगलंच ती करते आहे, नाही !"

" मी केव्हाच ताडलं होतं की, एवढी सुरेख, श्रीमंत, सुसंस्कृत तरुणी आमच्या विश्रामला फार दिवस लाभायची नाही. असंच असतं. तुला नाही वाटत की, माझ्या मानानं तूं अगदीच टाकाऊ आहेस !"

" कशांत ?"

" विद्या, रूप, कला, कुठल्याहि बाबतींत तूं मला शोभतेस का ?

मनाशीं विचार करून सांग."

"समजा, मी कुठल्या बाबतींत कमी असेन तर?"

"तर ना? तर मला आपल्या ताब्यांत ठेवण्याची आशा उगीच बाळगूं नये. तुला जसा सुरेख नवरा हवाहवासा वाटतो, तसा मला सुरेख बायकोचा सहवास हवासा वाटणार नाही का? धूर्त पुरुष चोरून व्यवहार करतात; भित्रे आपल्या वासना मारून टाकण्याचा व्यर्थ प्रयत्न करतात. माझ्यासारखे धीट पुरुष राजरोस ऐषाराम भोगून, खरं सुख पदरांत पाडून घेतात."

"मग बोलणं उरलंच नाही!"

"कसं शाहण्यासारखं बोललीस बघ! आहे. बायकांना शेवटीं तरी शहाणपण सुचतं."

"पुरुषांना असं बोलायला काय होतं?"

"अलबत्! तुझ्याबद्दल—मग तें खरं असो खोटें असो— आशेनं मला सांगितलं, तेव्हा मलाहि संताप आला; पण विचार केला. मी जशी स्वतंत्रता स्वत:करिता घेतों, तशी स्वतंत्रता माझ्या पत्नीला तरी कां असूं नये? तुला माहीतच आहे. पतिपत्नींनी खुशाल आपल्या आवडीच्या मित्रांशीं संबंध ठेवावा, अशा मताचा मी पहिल्यापासून आहें. मी आपल्या मताला प्रामाणिक राहिलों; म्हटलं नंदालाहि मोकळीक द्यावी."

"शि:! मतापेक्षा नीतीला जर तुम्ही प्रामाणिक राहतां, तर किती चांगलं झालं असत! मला कोणत्या संकटांत आणून टाकलंत, ह्याची कल्पना आहे का तुम्हांला?"

"तूं चुकत आहेस! समज मी नीतीला चिकटून राहण्याचा प्रामाणिक निश्चय केला असता, तर मी स्वत: दु:खी झालों असतोंच,

शिवाय आताच्यापेक्षा तुझा जास्त तिरस्कार केला असता. माझ्या हौसेच्या आड तूं येतेस; तुझ्याशीं लग्न केलं, ही गोष्ट आड येते, म्हणूनच तुझा मी द्वेषहि केला असता. आज मी स्वत: सुखी आहें. तुझ्याबद्दल माझ्या मनांत द्वेष मुळीच नाही. असेल तर कींव आहे. वाटतं, लग्नबंधनं ढिलीं करून एकमेकांचे बांधलेले गळे सोडविण्याचा मार्ग कायद्यानं, रूढीनं नाही, म्हणून तूंहि अडकून पडली आहेस. तसा मार्ग जर उपलब्ध असता, तर—"

"तर काय केलं असतंत ?"

"मी आशेशीं लग्न केलं असतं, विश्रामचं तुझ्याशीं लग्न लाऊन दिलं असतं. शेकडा पन्नास स्त्रीपुरुषांनी जोडे बदलेले असते आणि वैवाहिक बेबनाव नांवालाहि शिल्लक राहता ना !"

"असले भयंकर विचार ऐकून माझे तर बाई हातपाय लटपट कापूं लागतात ?"

"तूं तर काय, सोळाव्या शतकांतली अस्सल सावित्रीछाप पोरगी ! आशा एवढी उदार मनाच्या गोष्टी करते ना ? पण तीसुद्धा तुझ्या संशयानं लाल होते. मी तिला म्हटलंसुद्धा की, विश्रामशी असलेला संबंधसुद्धा जर तूं तोडून टाकला आहेस–"

"म्हणजे ? हें खरं का ? अरेरे !"

"खरंच असणार ! प्रेम नसलं ना म्हणजे नवराबायकोचा संबंध बळजबरीचा वाटूं लागतो. आशेसारखी तल्लख बाई, असली मनाच्या विरुद्धची बळजबरी थोडीच चालूं देणार आहे ?"

"बघा, निदान माझ्यासमोर तरी असलं भलतंसलतं बोलत जाऊं नका. मला उगीच भीति वाटायला लागते."

" की मी टाकून देईन, म्हणून होय? "

" होय. त्याची अन् दुसरीहि भीति वाटते."

" दुसरी कसली? "

" हें तुमचं स्वैराचाराचं तत्त्वज्ञान नेहमी नेहमी ऐकत गेलें, तर त्याचा काय नेम? एखादे वेळेस दुष्ट विचार मनांत यायचे."

" मग त्याला उपाय आहे."

" काय? "

" कृष्ण कृष्ण म्हणून चुटकी वाजवायची."

भार्गवने हें बोलणें थट्टेवारी नेलें खरें; परंतु याने नंदाच्या काळजांत झालेली जखम अधिकच खोल गेली. विश्राम-आशेच्या संसाराची सत्य-कथा ऐकून विश्रामबद्दल तिला अत्यंत कळवळा वाटला. आपल्यापेक्षा सुंदर पत्नी विश्रामला मिळाली, संस्थानिक सासऱ्याचा आवश्यक असलेला आसरा गरिबीच्या फुपाट्यांत येऊन पडलेल्या विश्रामला लाभला, या दोन महान् गोष्टींवर लक्ष्य ठेऊन तिने स्वतःची झालेली निराशा गिळून टाकली होती; पण आज तिला खरी वस्तुस्थिति कळतांच ती आंतून विदीर्ण झाली. दरेक पुरुष जन्मापासून माता, भगिनी, कांता, कन्या इत्यादि नात्याच्या निमित्ताने स्त्रीप्रेमाच्या ओलाव्यावर जगत असतो; परंतु बिचाऱ्या विश्रामला यांपैकी कुठल्याच प्रकारच्या स्त्रीप्रेमाचा आसरा लाभला नव्हता. हें लक्ष्यांत येतांच ती गहिंवरून गेली. माता, भगिनी, कांता आणि कन्या यांपैकी सगळ्या अगर त्यांतील जास्तींत जास्ती कोणकोणत्या नात्यांच्या प्रेमाचा वर्षाव विश्रामवर आपणांस करतां येईल तो करावा, त्याला थोडातरी सुखाचा वारा घालावा, असें तिच्या मनांत आलें. मातेच्या वात्सल्यावर तिला हक्क सांगतां येईना; ती विश्रामपेक्षा

पुष्कळच लहान होती आणि तो हक्क अधिकाराने आणि जिव्हाळ्याने इंदिरेचा होता, हें तिला आठवलें. कन्या होण्याची तिची इच्छा नव्हती. भगिनी ती मानलेली होतीच; पण तेंहि मानलेले नाते तिला अपुरें वाटूं लागलें! एका आईबापांच्या पोटीं जन्म घेतां येणें जोंवर शक्य नव्हतें, तोंवर तें नातें मानलेलेंच, म्हणून वरकरणींच राहणार, असें तिला वाटलें. कांतेचें नाते, हे शब्द उच्चारतांना तिची जीभ अडखळे, मनांतल्या मनांत तो शब्द घोळत असतांनाहि पापाच्या भीतीने ती कावरीबावरी होई. कांतेचें नातें नव्याने का तिच्या मनांत आलें होते? छे: ! गेली तीन वर्षें याच एका नात्याचा निदिध्यास तिने धरला नव्हता का? याच एका नात्याकडे लक्ष देऊन विश्रामला आवडले, ते आपणांलाहि आवडले पाहिजे; विश्रामचे जे विचार, ते आपले विचार असले पाहिजेत; त्याचे जे आचार, तेच आपले राहिले पाहिजेत; इतक्या तादात्म्याने तिने आपले आचार, विचार, आवडीनिवडी, भावना आणि आकांक्षा घडविल्या नव्हत्या का? होय, मनाने ती एकट्या विश्रामचीच कांता होती. पुढे लग्नसंस्काराने ती भार्गवची कांता झाली; पण खुद्द भार्गवच्याच बदफैली वर्तनामुळे तिच्या मनाची चलबिचल झाली; भार्गवावरचे मन उडाले, तें निराधार होऊन स्तब्ध बसले. लग्नसंस्काराच्या अभेद्य तटाने विश्राम व नंदा यांच्यांत कायमचें अंतर उत्पन्न केले असले, तरी भार्गवच्या विचारांनी तिला नवीनच हुरूप आला. भार्गवची स्वैराचाराबद्दलची विचारसरणी तिच्या मनाला पटत नव्हती, तरी त्यामुळे होणारा लाभ तिला हवाहवासा वाटूं लागला. 'नवराबायकोच्यांत प्रेम उरलं नसलं, म्हणजे त्यांच्यांतला संबंध बळजबरीचा वाटतो, नकोसा होतो; ती एकमेकांचा द्वेष करूं लागतात.' हे शब्द तिच्या कानांशीं एकसारखे गुणगुणत होते, हप्त्याहप्त्यांनी तिच्या मनाची खात्री पटवीत होते. त्यांतला दरेक

शब्द सत्यच सांगत नव्हता का? अनुभवांतीं पटेल असेंच सत्य सांगत होता. भार्गवचें हलकें दिसणारें तत्त्वज्ञान, हेंच खरें पतिपत्नीसंबंधाच्या सुखाचें अधिष्ठान होय, असें तिला वाटूं लागलें. माणसाच्या विचारांची झेप नेहमी पुढेच पडेल, अशा हुलकावण्या सुखाची आकांक्षा त्यांना दाखवींत असते. विश्रामच्या संगतीचा अभिलाष जास्त वाढत गेला आणि तो आपल्या आटोक्यांत आता रहात नाही, असें समजतांच ती कावरीबावरी होई आणि खरोखरच 'कृष्ण कृष्ण' म्हणून चुटक्या वाजवी.

याच सुमारास इंदिरेची कुठल्यातरी बाबतीवरून बार्जारावांशीं बोलाचाली होऊन ती अचानकपणें विश्रामकडे आली आणि त्या वेळीं आशेचाहि मुक्काम तिथेच होता, त्यामुळे लगेच दोन दिवसांनी नंदाने इंदिरेला आपल्याकडे राहण्यासाठी आणलें. नंदाने इंदिरेला सर्व हकीगत सांगितली. इंदिरा ती हकीगत ऐकून चकित झाली.

"म्हणतेस तरी काय?" इंदिरेने विचारलें.

"अक्षरन् अक्षर खरं आहे. विश्रामची ही अशी गत झाली."

"हा लोभ नडतो बरं जिथंतिथं! विषयाच्या लोभानं माझा गळा कापला, पैशाच्या लोभानं मुलाच्या सुखाचं मातेरं केलं! मला तर म्हाताऱ्याचा राग असा येतो की, तोंड पाहूं नयेसं वाटतं."

"असं ना?"

"असं म्हणजे काय विचारतेस? त्याचा तो छचोरपणा पाहून तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोहोचते. पोरीसोरी, कामकरी बायका, मोलकरणी, कुणीही चालतें. अगदी त्यांच्या पुढं अठरा वर्षांच्या मुलाप्रमाणं नाचतो. मला दुरून त्याची सावलीसुद्धा घेऊं नयेशी वाटते. याच्या या छिनाल चाळ्यांमुळं मला मान खाली घालून वाटेल

ती विटंबना सहन करावी लागते."

"असं ना?"

"शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या बायका माझ्याकडे पाहून कुचेष्टेनं हसतात. अगदी माझ्या कानावर पडतील, असे शब्द बोलतात. 'सगळ्या गावाची हौस पुरवतो, तो घरचीची हौस पुरवणारच! असं असतं तिजवराचं!!' शी: !!! मला राग येतो तो याचाच. त्या बायकांना वाटत असेल की, हा म्हातारा माझ्याशीं असेच छचोर चाळे करीत असेल. लग्नानं मी त्याची बायकोच जर आहे, तर लोकांना असं वाटणारच. त्यापेक्षा वाटतं आम्ही भांडलों, एकमेकांचं तोंडहि पहात नाही, हें जगजाहीर व्हावं. आणखी याशिवाय दुसऱ्यांचे छळ सोसावे लागतात, ते निराळेच."

"कसले छळ?"

"ऐक. यांचे मित्र यांच्याबरोबरचेच वयानं ना? पण हे घरांत नसतांना मुद्दाम माझ्याशीं बोलायला येतील. कारण नसतांना सांगतील 'मला आता पंचावन्नावं वर्ष आहे, रावसाहेबांच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान.' असंच सुनावतात मला की, पासष्ट वर्षांचा म्हातारा जर चालतो, तर आम्ही तर त्याच्यापेक्षा पुष्कळच तरुण आहोंत. म्हाताऱ्याची बायको म्हटली म्हणजे सगळं जग मुळी तिच्याकडे याच दृष्टीनं पाहणार की, ती वाईट चालीची असेल. शेजारीपाजारी, यांचे प्रत्यक्ष नातेवाईक वेळीं-अवेळीं येतील, ऐसपैस गोष्टी करीत बसण्याची अभिलाषा धरतील आणि म्हाताऱ्याला वाटतं की, आपल्या बायकोला आपण झाकूनपाकून नाही संभाळली, तर ती कुणाचा हात धरून जाईल. विश्राम त्याचा मुलगा ना? अन् माझासुद्धा सावत्र असला तरी मुलगा ना? पण त्याचंमाझं

बोलणं झालेलं समजलं, तर आकाशपाताळ एक करील! वाईट, वाईट म्हातारा आहे अगदी!"

"बरे तूं दिवस काढलेस एवढे!"

"मी आपली जुन्या वळणाची म्हणून मूग गिळून स्वस्थ बसलें, सर्व छळ सहन केले. आशेसारखी असतें, तर दोन तासहि या नरकवासांत राहतें ना!"

"पण या आशेनं विश्रामची अगदी राळ चालविली आहे. मुळी म्हणतां मुळी ती त्याची किमत ठेवीत नाही. लोकांना दिसायला एका घरांत राहतात एवढंच."

"मी इकडे पुष्कळ कान-उघाडणी केली, तर मला म्हणतात की, 'तुझं मन विश्रामवर गेलेलं आहे, तर तूं त्याच्याशीं संबंध ठेव.'"

"म्हणतेस तरी काय? बरेच आहेत की भार्गव!! अन् तुझं मन विश्रामवर गेलं, हें त्यांना समजलं तरी कसं? तूं सांगितलंस कीं काय?"

"छे ग! पण त्यांना आशेनं सांगितलं की, यांचं दोघांचं प्रेम जडलं होतं."

"मग? कांही भलतंसलतं तर तुझ्या मनांत आलं नाही ना?"

"खरं सांगूं? मला रागाऊं नकोस! भावनांची उपासमार म्हणजे काय असतं, त्याची तुला कल्पना आहे, म्हणून मन मोकळं करून सांगतें. सांगूं?"

"हूं: सांग!"

“ माझ्या मनांत हजार वेळा येतं, पण– ”

“ पण काय ? ”

“ सांगूंच का ? विश्राम फारच भित्रा आहे, म्हणेनास ? ”

“ म्हणजे तूं त्याला विचारलं होतंस कीं काय ? ”

“ नाही. तसं नव्हे ग ! पण एक दिवस तो अन् मी असे आम्ही दोघच जण एकटे बोलत बसलों होतों. आशेवरून गोष्टी निघाल्या. माझ्या तोंडांतून कांहीतरी चुकून शब्द निघून गेले. विश्राम जागेवरून उठला अन् म्हणाला, ‘मी तुमच्यावर बहीण म्हणून प्रीति केली आणि अजून तीच प्रीति कायम आहे.’ आणि तेव्हापासून आशा किंवा भार्गव कुणी असलं, तरच माझ्याशीं बोलतो. नाहीतर मला तो टाळतो. ”

“ तो पापभीरु आहे, वडिलांच्यासारखा नाही निघाला. ”

“ पण फारच भितो, नाही ? नाही आपलं आशेला ! ”

“ हूं: ! चांगलीं माणसं भित्रीं असतात.” इंदिरेचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. तोंड चुकविण्यासाठी ती तोंड धुण्याचं निमित्त करून आंत गेली. पाण्याच्या चुळक्यांसरशीं तिने अश्रु धुवून टाकले; पण घोगरा आवाज तिला लपवून ठेवतां आला नाही.

“ ताई, तुला एवढं त्यांत काय वाईट वाटलं ? तो भित्रा आहे, हें चांगलं कीं वाईट ? ”

“ छे: ! वाईट ग, मला काय वाटायचं त्यांत ? बोलूनचालून माझा तो सावत्र मुलगा ! त्याची सख्खी आई असती, तर तिच्या डोळ्यांना पाणी आलं असतं. ”

“ पापभीरु म्हटल्याबरोबर तर तिला उलट आनंद झाला असता. तो पापभीरु आहे, याचं मला वाईट वाटतं. उघड बोलतेंच मी. त्यानं ते शब्द उच्चारले, त्या दिवशीं मी एकसारखी रडत होतें. ”

“ वेडी आहेस तूं! दुसऱ्याच्या जिनसेवर आपण कधीच दृष्टि ठेऊं नये. त्या जिनसेचा अभिलाष केला की, ती मिळणार नाही, या कल्पनेनं दुःख होणारच. ”

“ ताई, विश्रामचा कड घेऊन तूं बोलूं नकोस! पण तुला नाही वाटत की, तो वाजवीपेक्षा जास्त सरळ अन् साधा आहे? जगांत असलीं सीधीं माणसं हटकून दुःखी होतात. ”

“ पण त्याला काय उपाय? तीं माणसं बिचारीं सर्व सहन करायला तयार असतात. तीं दुःखीं झालीं, तरी त्यांना स्वतःची पर्वा नसते.”

“ अन् दुसरीं आपल्यापायीं दुःखी होतील, याचीहि पण पर्वा नसते त्यांना, असं म्हण. ”

“ तीं सीधीं माणसं साध्या रस्त्यानं जाणारीं. तीं कशाला कुणाला दुखवितील? सरळ मार्गानं सर्वांच्या सुखाकरिता धडपडतील. हीं सरळ मार्गानं जातात, म्हणून दुसरीं माणसं दुःखी होत असतील, तर त्यांचा काय दोष? ”

नंदा गप्प बसली. ती वरमली आणि आपण भलतेंच बोलून उगीचच आपलें मनोगत इंदिरेजवळ बोलून दाखविलें, असें तिला वाटलें. ती क्षमा भाकण्याच्या ओशाळ्या आवाजांत म्हणाली,

“ ताई, हें मनावर नको घेऊस आं कांही! आपण बरोबरीच्या मैत्रिणी! वादविवादच मी तुझ्याशीं केला म्हणेनास! ”

"मी कुठं काय म्हणतें तुला ? तुला वाटलं तसं सर्वांनाच वाटणार ! साहजिक आहे." इंदिरा सद्गदित झाली, तिच्या डोळ्यांत अश्रु चमकूं लागले.

"काय ? तुलाहि माझ्यासारखंच वाईट वाटलं ना ?" नंदानें दृष्टि रोखून विचारलें.

"छे: ! तोंडांतून चुकून कांहीं गेलं असेल, त्याचं काय मनावर घेतेस ?" इतकें बोलून इंदिरा जागेवरून उठून गेली.

# १३

विश्राम बाहेरून परत आला.

त्याने आशेच्या खोलीच्या दारावर टिचक्या मारल्या; पण कांही जबाब मिळाला नाहीं, म्हणून तिची वाट पहात तो पुढच्या दालनांत बसला.

इंदिरा आंतल्या दालनांतून तें सर्व पहात होती. बराच वेळ विश्राम बसला, नंतर उठून इकडेतिकडे येरझारा घालूं लागला. इंदिरेच्याने राहवेना. तिने विश्रामला खूण करून आंत बोलावलें आणि म्हटलें,

" आशादेवींशीं कांही काम आहे का ? "

" होय. राजेसाहेब आज संध्याकाळीं येणार आहेत, तें तिला सांगायचं आहे. "

" मग मी सांगेन. तुम्हांला बाहेर कुठं जायचं असलं, तर जाऊन यावं. "

" नाहीं, मी इथंच बसतों."

" आता तुम्ही बाहेर गेलांत तर बरं. म्हणून मी म्हणतें!"

" कां? कुणी येणार आहेत बायकामाणसं तिच्याकडे होय?"

" छेः! कोणीसुद्धा येणार नाही; पण आत्ताची वेळ कांही ठीक नाही. तुम्ही आपले बाहेर हिंडून या."

" म्हणजे? मला याचा कांही अर्थ समजत नाही. काय असेल, तें स्पष्ट करूं द्या!"

" यांचं कांही लक्षण बरोबर नाही. मी आशादेवींच्याबद्दल बोलतें आहे."

" कां? तुम्हांला कांही ती उलटून बोलली कीं काय?"

" छेः! माझ्याबद्दल मी कांहीच सांगणार नाहीं. तुमच्या नवराबायकोच्या भानगडींतहि मी पडत नाहीं; पण त्यांनी दोघांनी अगदी ताळच सोडला आहे!"

" त्यांनी दोघांनी म्हणजे कुणी?"

" भार्गव आणि आशादेवींनी."

" अस्सं!"

" सगळ्या गावांत झालं आहे, अन् तुम्हांला नाही माहीत? भार्गव अन् आशा आत्ता खोलींत आहेत. म्हणून म्हटलं, हें डोळ्यांनी बघण्यापेक्षा बाहेर गेलेलं बरं."

" मग तर मी इथंच बसून राहतों."

" तुम्ही आपल्या जिवाला जपत जा! त्याचा काय नेम? एखादे दिवशीं जिवावर बेतायची! एकेकदा सगळे प्रकार झालेले आहेत. नकोसे

झालांत, म्हणजे नाहीसं करून टाकायला काय त्यांना वेळ लागणार आहे?"

"कसले प्रकार झालेले आहेत?"

"तुम्हांला नंदानं सांगितलंच असेल!"

"नाही बुवा! नंदाशीं मी असल्या गोष्टी कधीच बोलत नसतों."

"अन् मी तरी तुमच्या हितासाठी म्हणून बोलतें. कुणिसा म्हणे मास्तर हिला शिकवायला ठेवला होता; पुढं कांही उघडकीला आलं, मास्तर विहिरींत पडून मेला. लोक म्हणतात त्याचा खून झालान् मग विहिरींत त्याला टाकलं. याहि कुठंशा जाऊन बाळंतपण करून आल्या. या सगळ्या लग्नाच्या अगोदरच्या मी गोष्टी ऐकल्या आहेत. वाटलं होतं लग्नानंतर सुधारतील; पण जित्याची खोड मेल्याशिवाय जायची नाही."

"असं काय? बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला आज!"

"म्हणून म्हणतें जिवाला जपा. यांना नकोसे झालांत, तरी बाकीच्या मंडळींना हवेहवेसे आहांत अजून!"

"बाकीच्या माणसांना तरी मी कुणाला पाहिजे आहे? वडिलांना मी पहिल्यापासून नकोच आहे. अन् आता मी त्यांना पैसे पाठवूं शकत नाही, म्हणून तर ते माझं तोंडसुद्धा पाह्यला तयार नाहीत."

"पण त्यांना एक नकोसे झालांत, तरी बाकीचीं माणसं आम्ही आहोंत ना? नंदा आहे, मी...."

"नंदाला माझ्यामुळे त्रासच होत आहे. तिलान् मला त्रास होऊं नये, म्हणून मी तिच्याशीं अलीकडे एकट्यानं असं बोलणं टाकून

दिलं आहे."

"उघडलं वाटतं दार! अन् कांही रागांत बोलूं नका. माझं ऐक बरं का! माझ्या गळ्याची शपथ आहे." इंदिरा मोठ्याने ओरडली.

पण त्वेषाने बेफाम झालेल्या विश्रामने हे शब्द ऐकलेच नाहीत आशा खोलीच्या दारांत दोन्ही बाजूंस हात धरून उभी राहिली. तिं इंदिरेचे शब्द ऐकले होते. ती इंदिरेकडे आणि नंतर विश्रामकडे डो वटारून उभी होती.

"बाजूला हो! आंत दुसरं कोण आहे, तें मला पाह्यचं आहे!' विश्राम खोलींत घुसूं लागला, तसें आशेने त्याला हातांनी मागे ढकललें

"खोली माझी आहे. वाटेल त्याला मी खोलींत आणीन."

"बंगला माझा आहे. तुझ्या खोलींत कोण आहे दुसरा, तें पाह ण्याचा माझा हक्क आहे."

"मग त्यासाठी एवढी धिंगामस्ती कशाला! माझ्याशीं मारामार करतां? लाज नाही वाटत? पुरुपासारखे पुरुप बायकांशीं मस्त करायला? मी साफ जाऊं द्यायची नाहीं! अग– आईआई–मारा- मारा–मेलें तरी मी जागेवरून दूर सरकणार नाही."

आशा विश्रामशीं झटापट करीत होती. विश्राम बेफाम होऊ आशेवर चाल करीत होता, तिला सापडेल तिथे लाथाबुक्क्यांनी मारी होता. इंदिरा दारांत येऊन उभी राहिली. गडीहि धावत आला. आशेल जोर चढला, विश्राम शरमला. आशेने विश्रामचा कोट फाडला आ त्याच्या हाताला धरून लोंबकाळत ती राहिली आणि मोठ्याने ओरडल "भार्गव! बाहेर ये. मला काय कुणाची चोरी आहे? काय तुम्हांल आंत दुसरा कोण आहे, तें पाह्यचं होतं ना? भार्गव, मी म्हणतें

बाहेर ये म्हणून ?"

भार्गव खोलींतून बाहेर आला आणि एक शब्दहि न बोलतां बाहेर निघून गेला.

"आशा, तुम्ही दोघं जण काय करीत होतां ?"

"तुम्ही मायलेक जें करीत होतां, तेंच आम्ही करीत होतों."

"आशा, तुमच्या तोंडाला हाड असूं द्या कांहीतरी !" इंदिरा चवताळून ओरडली.

"भलतंसलतं बोलशील, तर दात पाडीन ! काय समजली आहेस तूं ?" विश्रामने आशेचे खांदे धरून तिला रागाच्या भरांत गदगदा घुसळलें.

"मी अशी भ्यायची नाहीं. अन् गण्या, तूं बघत काय राह्यलास ? पकड !" आशेचा हुकूम होतांच गड्याने विश्रामचे हात धरले. विश्राम एकदम बाजूस सरकला. आशेचें बोलणें चालूच होतें. 'गण्या, आत्ताच्या आत्ता पोलिसांत वर्दी दे, बायकोचा खून करण्याचा प्रयत्न केलान् म्हणून. राजेसाहेबांना तार करून बोलाव. तुला माझ्या रक्षणाकरिता ठेवलं आहे ना ? मालकिणीच्या जिवावर बेतली, तरी खुशाल उभा राहिलास ? नोकरीवरून राजेसाहेबांना सांगून काढून टाकवतें."

"आशा, तूं हा काय तमाशा मांडला आहेस ?" विश्रामनें विचारलें.

"तुमच्याशीं मी साफ बोलूं इच्छीत नाहीं. मी तमाशा मांडला अन् तुम्ही काय करताहां ? नंदाचं तुमचं होतं ! पण मी सगळं सहन केलं ! चकार शब्द कधी उच्चारला नाहीं. मी भार्गवाशीं गोष्टी बोलत बसलें होतें, तर आईने दिले कान भरवून; मुलगा लागला माझ्याशीं दांडगाई

करायला. मी मधल्या दारांतून सगळं ऐकत होतें, पहात होतें. आप
तमाशा करून उलट मलाच म्हणतां, तमाशा करतेस म्हणून? मी कां
कुण्णाला भीत नाही. भार्गवबरोबर मी राजरोस आज सहान् सहा महि
हिंडत आहें. दुसऱ्यांनी भरवून दिलं म्हणून बेफाम झालें."

"बेफाम? तुझ्या नरडीचा घोट नाही घेतला, भाग्य समज!
विश्राम मुठी वळीत म्हणाला. "नवऱ्याचं वारं तुला नको अन् भार्गवर
घेऊन बसतेस?"

"बसणार! भार्गवला घेऊन मी खुश्शाल बसणार! का
तुम्हांला करायचं असेल तें करा! आजपर्यंत निदान लोकदृष्टीला त
आपलं नवराबायकोचं नातं होतं. मी घर धरून राहिलें होते. आजपासू
आपलं नातं सुटलं. मी तुमची कुण्णी नाही आजपासून! म्हणे नरडीच
घोट घेतला असता! गण्या, ऐकून ठेव. तुला कोर्टात साक्ष द्यावी लागेल.

"एवढी निर्ढावली असशील तर प्रश्नच नाही. खुश्शाल भार्ग
जवळ रहा." विश्राम म्हणाला.

"एकदा सांगितलं ना? भार्गवशी मी स्नेह ठेवणार. तुम्ही
मला या मार्गाला लावलंत."

"मी तुला या मार्गाला लावलं?"

"होय, तुम्हीच लावलंत. माझं प्रेम तुमच्यावर बसावं, अर
एकतरी गुण आहे का तुमच्यांत? रूप, गुण, पैसा, स्वभाव, कां
कांहीसुद्धा नाही. अन् नंदाशी तुमचं वर्तन अशा प्रकारचं. मी मना
म्हटलं, त्यांचं मन नंदाकडे ओढतं, आपण आपल्या जबाबदारींत
सुटलों. भार्गवचीसुद्धा ओळख तुम्हीच करून दिलीत. तुम्हांला नंद
पाहिजे होती, म्हणून तुम्ही भार्गवचा माझा स्नेह जमवून दिलांत, अ

मी समजत होतें. अन् शेवटचं सांगून टाकतें. तुम्हांला आवडो न आवडो, मी अश्शी वागणार."

सर्व मंडळी स्तब्ध होऊन आशेचें बोलणें ऐकत होतीं. ती आंत खोलींत गेली. पुन: बाहेर आली. "मोटार काढायला सांग रे. मीच बाहेर जातें." असें म्हणून ती आंत गेली.

विश्राम कोचावर सचिंत बसला.

इंदिरा स्वयंपाकघरांत जाऊन हनुवटीला हात लावून अश्रु ढाळीत बसली.

अर्ध्या तासाने आशा पोषाख करून बाहेर निघाली. मोटार कांपाउंडच्या बाहेर गेल्याचा 'भुर्र' आवाज ऐकून इंदिरा बाहेर आली आणि विश्रामला हळूच म्हणाली,

"मी सांगितलं होतं बाहेर जा म्हणून! आज हा तमाशा टाळतां आला असता."

"सोक्षमोक्ष एकदा झालाच पाहिजे. अशा स्थितींत किती दिवस राहणार? मला वाईट वाटत नाही."

"आजचा दिवस कांही चांगला नाही. शांतपणा ठेवावा. संध्याकाळपर्यंत कायकाय थेरंथेरं ही बया करील कुणाला ठाऊक! नाही तर आपलं बोलवून घ्यावं."

"तिचे वडील, माझे वडील आज येतातच आहेत संध्याकाळपर्यंत. त्याचा निकाल लावून टाकूं."

"पुन: सांगतें. जिवाला जपा. वाटलं तर नोकरी सोडून द्या. इथं हा भार्गव राहणार. रोज अस्सान् अस्सा प्रकार चालणार. नोकरी

सोडून घरीं बसलांत, तरी तिघांच्या पोटापुरतं आहे. एक वेळेला जेऊन राहूं; पण सुखांत तर राहूं! ही श्रीमंती नको अन् जिवाची धास्तीहि नको. अन् नोकरी करून तरी काय करतां? या उधळपट्टीपुढे पैशाला पैसा भेटत नाही. नेहमी पैशाची अडचण. कांही नको. नोकरी नको, चाकरी नको अन् असली ही प्राणावर उठलेली बायकोहि नको. तुम्ही आपले घरीं चला."

"अन् मला आता घरींहि येतां येणार नाही. ही काय बोलली, तें ऐकलंच आहेत तुम्ही! कदाचित् हेंच आपलं शेवटचं बोलणं!"

विश्राम जागेवरून उठला. त्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रु त्याला आवरतां येत नव्हते, तो खिडकीच्या बाहेर तोंड काढून रडें लपवीत होता.

इंदिरा माजघरांत आली आणि अंधाऱ्या कोपऱ्यांत बसून पुष्कळ वेळ रडत होती.

दुपारीं आशा जेवणास आली नाही; पण जेवणाच्या ऐन वेळेला नंदा घाईघाईने आली. तिचा रडवा चेहरा पाहून इंदिरेच्या काळजांत धस्स झालें. विश्रामने तिला लांबून येतांना पाहिलें होतें, तोहि आंत आला.

"काय ग, तुझा चेहरा कां असा? अन् तुझे दिवस भरत आलेले, अन् ऐन दुपारची तूं उन्हांतून आलीस? आहे तरी काय आज हें?" इंदिरेने विचारलें.

"आशा आमच्याकडे राह्यला आल्या आहेत, अन्—" नंदा ओक्साबोक्सी रडूं लागली.

"अन् काय?" इंदिरेने नंदाला पोटाशीं धरलें व म्हणाली "नंदू, काय झालं तें सांग. हूं, आम्ही आहोंत ना तुझ्या मदतीला?"

"आशेनं सांगितलं की, घरांत नंदा राहतां कामा नये. मी तरी राहीन, नाहीतर नंदा तरी राहील."

"आत्तापुरतंच ना?" इंदिरेने विचारलें.

"नाही, कायमची! अन् यांनी सांगितलं की, 'तूं माझ्या घरांतून चालती हो. पुन: येऊं नकोस.' मी जातें आता. तुला सांगायलाच आलें होतें!" नंदा म्हणाली.

"अन् तूं कुठं जाणार? टेकलेली बाई तूं, कुठं एकटी जाणार? चल, माझ्या इथं मी तुला घेऊन जातें. मला अर्धी भाकरी मिळाली, तर चतकोर मी तुला देईन. उगी."

"जाऊं दे. कुठंतरी नदीओढ्यांत ...." नंदाला वाक्य पुरें करतां आलें नाही व रडें आवरतां आलें नाही.

"छे ग! बाई!! मी तुला तुझ्या आईवडिलांच्या हवालीं करीन, मग तुला सोडेन. नवऱ्याला बायको नकोशी झाली, म्हणून जिच्यातिच्या आईबापाला कांही स्वत:ची मुलगी नकोशी नाही होत कधी! उगी."

नंदाचा दु:खावेग कमी झाला.

"आज संध्याकाळी यायचं आहेच. ते येऊन गेले, म्हणजे आपण जाऊं. असा हा बखेडा इथं माजला आहे, म्हणून माझा हिथून पाय निघत नाही. नाहीतर आत्तासुद्धा आपण निघालो असतों." इंदिरा म्हणाली.

"तुम्ही दोघी जणी जेवणं करा अन् दुपारच्या गाडीनंच जा!" विश्राम म्हणाला.

"मी नाही हो जायची तुम्हाला एकटे टाकून इथं! म्हणूं नये,

पण मला आपलं दुष्ट स्वप्न पडावं, तशी हुरहूर लागली आहे एकसारखी. काय होणार आहे कुणास ठाऊक ? " इंदिरा म्हणाली.

संध्याकाळीं राजेसाहेब आले व ते भार्गवकडेच आशेला भेटायला गेले. बाजीराव आले, त्यांना इंदिरेने सर्व हकीगत सांगितली आणि तिने त्यांना बजाऊन सांगितलें, " विश्रामला बरोबर घेऊन गेलं पाहिजे. आता त्याला इथं एकटा राहूं देतां उपयोगी नाही. तो इथं राहणार असला, तर मी आपली इथं राहणार. " बाजीराव, " बरं, राजेसाहेबांना भेटतों, आम्ही दोघं जण ठरवितो काय तें." असें म्हणून राजेसाहेबांना भेटायला गेले.

रात्रीं आशा, राजेसाहेब आणि बाजीराव परत आले. त्यांनी विश्रामला बोलाविलें आणि ते चौघे जण टेबलाभोवती बसले. राजेसाहेब म्हणाले–

" विश्राम, मीच आपल्याकडे कमीपणा घेतों. आशेच्या वरची मीच आपली माफी मागतों. हें पहा, तुम्ही विसरून जा. तुम्हां दोघांना विनाकारण एकमेकाबद्दल संशय आलेले दिसतात. तुम्ही विलायतेला जाऊन आलेले, अन् आशाहि थोडीफार परदेशांत हिंडून आलेली. थोडीशी उदार दृष्टि ठेवली पाहिजे तुम्ही. काय आशा ! तूं विसरलीस ना ? क्षमा मागण्यास तयार आहेस ना ? "

" मी कधी नाहीं म्हटलं आहे ? "

" विश्राम, आमच्या मुलीच्यासाठी आम्ही आपली क्षमा मागतों. विसरून जा, झालेला प्रकार विसरून जा. अन् यापुढं सुखासमाधानानं नांदा. " राजेसाहेब कळवळून म्हणाले, त्यांचा कंठ दाटून आला.

" विश्राम, राजेसाहेबांना काय सांगायचं ? " बाजीरावांनी थोड्या

वेळाने विचारलें.

" आपणच सांगा त्यांना, जें काय सांगायचं तें. मी वडील मंडळींच्या बाहेर नाहीं."

" विश्राम ! " राजेसाहेबांनी उपरण्याने डोळ्यांचे कोपरे पुसले आणि म्हणाले, " आम्हांला पदरांत घेतलंत, फार उपकार झाले. अरे, आंत कोण आहे ? म्हणावं कॉफी आणा करून. काफी घेऊं अन् मी जातों. प्रवासानं मी थकलों आहे."

समेट झाल्याचा सर्वांना आनंद झाला. आशा आणि विश्राम हीं जमिनीकडे पहात सचिंत बसलीं होतीं.

काफी पिणें होतांच राजेसाहेब जाण्यास निघाले. त्यांनी विश्रामला आणि आशेला जवळजवळ उभें केलें, दोघांच्या पाठींवरून हात फिरवून म्हटलें, " बरं, मी जाऊं ना ? उद्या आमच्याकडे चहाला या, बरं का ? " दोघांनी 'होय' म्हणून मानेने खुणावलें.

राजेसाहेबांना पोहोचविण्यासाठी बाजीराव पायऱ्यांपर्यंत गेले.

" मी याचा बंदोबस्त करतों. आपण बदलीचं तेवढं करावं." बाजीराव म्हणाले.

" मी ताबडतोब तें करतों. आपण मात्र असा बंदोबस्त ठेवावा की, एकमेकाला पुन: नख दिसूं नये." राजेसाहेब म्हणाले.

अंधेरांत इंदिरा त्यांच्या पाठोपाठ हळूच जाऊन उभी होती. तिने तें भाषण ऐकलें होतें.

राजेसाहेबांची मोटार निघून गेली. बाजीराव घरांत येऊन इंदिरेला म्हणाले, " आपण केव्हा जायचं ? "

" आमची बांधाबांध तयार आहे. नंदाला बरोबर नेणार आहें. तिचे दिवस भरत आले आहेत, तर तिला वाटेंत तिच्या घरीं पोचवूं अन् पुढं जाऊं."

" बरं, मग आताच आपण निघूं. अजून गाडीला बराच अवकाश आहे. गाडी सापडेल. मग उगीच बसून तरी काय करायचं आहे ?"

बाजीराव, इंदिरा आणि नंदा जाण्यास निघालीं. आशेची मोटार त्यांना पोहोचविण्यासाठी उभी होती.

विश्राम कोट-टोपी घालून निरोप देण्यासाठी बाहेर आला. त्याच्या मनांत स्टेशनवर यावयाचें होतें, हें उघड दिसत होतें.

इंदिरा, नंदा मागच्या बाजूस बसल्या. बाजीराव मुद्दामच पुढच्या बाजूला बसले आणि म्हणाले, " विश्राम, तूं कशाला येतोस ? उशीर आहे गाडीला ! विनाकारण जाग्रण होईल."

विश्राम कांहीच बोलला नाही.

मोटार चालूं लागली.

अंधुक प्रकाशांत दिसणाऱ्या विश्रामच्या आकृतीकडे नंदा-इंदिरा पहात होत्या. मोटार सुरू झाल्यावर कुणी कांहीच बोललें नाही. इंदिरेने पदराने तोंड पुसण्याचं सोंग करून, नाक वर ओढलें, खाकरून घसा साफ केला अन् म्हणाली, " वारं काय नाकातोंडांत शिरतं !"

नंदाने कांहीच उत्तर केलें नाही. इंदिरेच्या गळ्याला तिने एकदम मिठी मारली आणि ती हुंदके देऊं लागली.

❀

# १४

" पाह्यलास कसा उलटा न्याय आहे तो? आपली शिंदळकी जिरविण्यासाठी दुसऱ्यावर भलभलते आरोप ठेवलेन्, कांगावा केलान्! पुरुषांना खरं वाटलं. मला यांनी बजावलं जातांना " इंदिरा म्हणाली.

" काय बजावलं ? " नंदा बाजेवर कुशीस वळून म्हणाली. बोलण्याच्या आवाजाने दचकून उठूं नये, म्हणून तिने डावा हात अलगद आपल्या तान्ह्या मुलाच्या अंगावर ठेवला.

" दुसरं काय ? " इंदिरा हलक्या आवाजांत बोलूं लागली. " की विश्रामचं पुन: मी मुखावलोकन नाही करायचं. मी म्हटलं, देहावर सत्ता आहे, गाजवा सत्ता जेवढी गाजवितां येईल तेवढी. मनावर तर नाही ना कुणाचा ताबा चालायचा ? "

" मग काय म्हणाले बाजीराव ? "

" म्हणाले की, याचा अर्थ काय ? मी म्हटलं याचा अर्थ जो होत

असेल, तो घ्यावा. मीहि आता निर्भीड झालें आहे. मी सांगितलं की, विश्रामबद्दल माझ्या मनांत जें काय वाटतं, तें तर कांही तुम्हां नाहीसं करूं शकणार नाही ना ? एकेक जन्माचे योगायोग असतात. पुढल्या जन्मीं कुणी सांगावं कोणकोणाचीं नातीं कसकशीं जमतात तीं ! खूप रागावलें मी. शेवटीं सांगितलं की, माझी उमेद मारून टाकलीतच आजवर, शरिराची माती केलीतच; पण मन मात्र मारून टाकूं शकणार नाही कुणी!"

"बरीच बाई तूं धीटपणानं बोललीस! करायचं काय म्हणा! 'अती झालं, हसू आलं' अशांतली गत."

नंदा बाळंतीण होती. तिचें पोट दुखूं लागलें, म्हणून इंदिरा तशीच तिथे राहिली. कालच ती अंग धुतली होती.

नंदावर एक आणि इंदिरेवर एक अशीं दोन पाकिटें पोस्टांतून आलीं.

"चि० विश्राम मोटार-अपघातांत ठार झाल्याची तार आल्यावरून मी तिकडे जात आहें." असें बाजीरावांचें इंदिरेला पत्र आलें होतें.

"विश्राम एकटाच मोटार घेऊन फिरायला गेला, अन् त्याला मोटारचा वेग आवरतां न आल्यामुळे मोटार घाटांतल्या कड्यावरून खाली कोसळली. तो ठार झाला. हें कळविण्यास वाईट वाटतें. त्याच्या मृत्यूबद्दल पोलीसतपास चालू आहे; तुझ्याकडे कदाचित विचारायला येतील, तर तुला हकीगत कळवून ठेवली आहे. 'माझी बदली × × कॉलेजांत झाल्याचा हुकूम विश्रामचा अपघात झाला त्याच्या आदल्या दिवशींच माझ्या हातीं आला." असें भार्गवचें नंदाला पत्र आलें होतें.

"कांहीतरी दगा झाला ग! चांडाळणीनं खून केलान्!" असें म्हणून नंदा आक्रोश करूं लागली.

" नंदा, दुःख आवर. विश्रामनं आत्महत्या करून घेतली आहे. मला तर असं वाटतं. झालं! संपलं आपलं आता जगण्याचं कार्य!! हूं!!!" इंदिरा अत्यंत गंभीरपणानं बोलली. तिने बाळंतिणीच्या खोलीचें दार घट्ट लावून घेतलें. गळ्यांतील मंगलसूत्र तिने तोडलें, हातांतल्या बांगड्या फोडल्या आणि आंबाडा सोडून, कपाळाचें कुंकू पुसून ती नंदाला म्हणाली—

" नंदा, संपलं आता माझं सगळं! शरिरानं मी लग्नाच्या दिवसापासूनच विधवा झालें होतें, आज सर्वतोप्रकारांनी मी विधवा झालें. माझं संपलं सौभाग्य."

" ताई! ताई! तूं हें काय आरंभलं आहेस? अन् हें काय तूं बोलत आहेस?"

" नंदा, माझ्या मनांतलं होतं तें मी बोललें. सगळ्याचीच चोरी होती माझ्यासारखीला! आता मी कुणाची पर्वा करीत नाहीं. मी जातें."

" ताई, थांब, थांब, कुठं जातेस तूं? मला तूं असंच थांबवून घेतलं होतंस. मी तुझं ऐकलं होतं. माझं ऐक. माझा तरी आज आधार गेला आहे ना? मी दीन झालें आहे, माझं ऐक."

" अग, तुला थोपवून धरली, तुझ्या पोटांत तुझ्या आशेचा अंकुर होता. तुझा आधार तुझ्यापुढंच निजला आहे. मला आशा आता कसली? नात्यामुळं मी अंतरावर राहिलें, अंतरवैरी झालें. आता मी अंतर राहूं देणार नाहीं. सोड मला. हा माझा हट्ट पुरा करण्यांत तुला पुण्य आहे."

इंदिराने नंदाचा हात अलगत सोडवला. ती धूम ठोकीत गेली आणि मागच्या बागेंतल्या विहिरींत तिने उडी घेतली.

नंदा ओरडत मागोमाग धावत सुटली, माणसें गोळा झालीं, पोहणारा आला, आंत उतरला.

त्याने इंदिरेचें प्रेत बाहेर काढलें.

नंदा वरमून परत आली. तिचें रडणें आता पार ओसरलें होतें. इंदिरेच्या बांगड्या आणि मंगळसूत्र खोलींत पडलेलें होतें, त्यांच्याकडे पाहून नंदाने एक दीर्घ सुस्कारा सोडला.

" असं एकंदरींत होतं का? आणि यासाठीच का ती माझं विश्रामशीं लग्न लाऊन देणार होती? विश्राम जगतां तरी हिनं त्याला माझ्या हाती थोडाच लागूं दिला असता? विश्रामनं आत्महत्या केली, हें हिलाच कसं एकदम समजलं? दोघांचं कांहीतरी ठरलेलं असावं! हिच्यासाठीच त्यानं आत्महत्या केलीन्. मग एकंदरींत आशेनं घेतलेला आळ खरा ठरला! पण–पण मला आता कुणाचा आधार? विश्राम–विश्राम–विश्राम– तूं आशेचा असतास, ताईचा असतास, आणखीन् कुणाचा कुणाचा असतास, तर मी कुण्णाच्या आड आलें नसतें. मला तुझाच एकच्या एक आधार होता ना रे! काय करूं ग? मी ताईला नाहीं दोष देत! काय करील बिचारी! पुष्कळ सहन केलन्. मरून गेली. सुटली मी म्हणतें; पण माझा पाय आणखीन् रुतला चिखलांत आणि आधार तर एकदम तुटला. आई आई–" असें विलाप करीत नंदाने जमिनीवर धाडकन अंग टाकलें आणि ती गडबडा लोळूं लागली.

× × × ×

विश्रामच्या मृत्यूसंबंधी अनेक बातम्या पसरल्या. विश्राम सहसा मोटार हाकीत नसे, त्यामुळे एकटाच मोटार हाकीत गेला आणि अपघात झाला, यावर कुणाचा विश्वासच बसेना. मोटार–ड्रायव्हरसह त्याचा मुद्दाम अपघात करविण्यांत आला, अशी एक अफवा उठली.

शेवटीं खून, कीं अपघात, कीं आत्महत्या' याचा उलगडा होईना. खुनाचा प्रत्यक्ष पुरावा सापडला नाही. अपघात झालेला दिसतच होता. आत्महत्याहि असेल, एवढा तर्कच जागेवर शिल्लक राहिला.

आत्महत्याच विश्रामने केली, अशी दृढ कल्पना होण्याला मुख्य कारणहि घडून आलें होतें.

अपघाताच्या आदल्या दिवशींच बातमी येऊन पोहोचली की, भार्गवची दुसऱ्या कॉलेजांत बदली झाली. भार्गवची बदली झाल्याने नंदालाहि भार्गवबरोबर जावें लागेल आणि नंदाचा विरह होणार, ह्या कल्पनेने व्याकुळ होऊन त्याने आत्महत्या केली, असा समज सर्वांचा सहज झाला. नंदा-विश्रामचा संबंध जगजाहीर झाला होता,नव्हे आशा-भार्गवांनी आपणहून जगजाहीर केला होता. त्यांचा तो बेत यशस्वी झालाहि. त्यांनी आपल्यावरचें किटाळ अनायासें नंदाच्या डोक्यावर ढकलून दिलें.

" पाह्यलंस भार्गव! आता तरी खात्री झाली ना तुझी नंदाबद्दल? जा म्हणावं त्याच्या पाठोपाठ सती! सावत्र आई गेली ना सती, तशी जा म्हणावं." आशा म्हणाली.

" नंदाचा विरह होईल, म्हणून तो आत्महत्या करील, असं वाटलं नव्हतं. अन् असं तिच्यासाठी आत्महत्या करण्यासारखं आहे तरी काय तिच्यांत?"

" तरीसुद्धा तुम्ही तिला पुन: राह्यला आणायच्या गोष्टी बोलतां."

× × ×

इंदिरेने विहिरींत उडी टाकून जीव दिला, हें वर्तमान समजतांच बाजीराव ताबडतोब निघून आले. तपास करतांना जीव देण्यापूर्वी ती

नंदाच्या खोलींत होती, तिच्याशीं कांहीतरी बोलत होती, असें त्यांना कळलें. म्हणून बाजीराव नंदाच्या खोलींत गेले. नंदाने खोलीचें दार लाऊन घेतलें आणि त्यांना घोंगडीवर बसायला सांगितलें.

" नंदाताई ! मी सत्य हकीगत ऐकायला आलों आहे. जें काय बनलं असेल तें सांगा. "

" आणि मलाहि खरं काय घडलं तें ऐकायचं आहे, म्हणून मी दार लाऊन घेतलं. विश्रामला अपघात कुणी केला कीं त्यानं करून घेतला? खरं खरं सांगा ! "

" आपण खरं काय सांगणार ? मोटार कड्यावरून कोसळली आणि तो एकटाच मोटारींत होता. त्याला कुणी गाडीला वेग देऊन नंतर सोडून दिलं कीं तो आपणहून घसरला, कीं त्यानं मुद्दाम आत्महत्या केली, कांहीच थांग लागत नाही. लोक म्हणतात, आत्महत्या असावी. "

" पण आत्महत्या कां म्हणून ? "

" भार्गवची बदली झाली, तुमची त्याची ताटातूट होणार, म्हणून त्यानं आत्महत्या केली, असं लोक म्हणतात. "

" खरंच ! मी कुठं एवढी भाग्याची होतें ? की विश्रामनं माझ्याकरिता आत्महत्या करावी. "

" म्हणजे ? हें खरं का ? "

" पोटच्या पोराची शपथ घेऊन सांगतें, आम्ही धुतल्या तांदुळाप्रमाणं होतों. मी म्हणतें, मग तर तो तिनं खूनच करवला ! "

" खून ? आणि कोणी केला असेल ? छे: ! खून करणं शक्य नाही. पचणं कठिण असतं. "

" खूनच ! माझी मनोमय साक्ष आहे. माझी ताटातूट होणार, म्हणून आत्महत्या करायचं काय कारण होतं ? मला यांनी तर टाकून दिलेलीच आहे ! आम्ही तसे राहूं शकलों असतों. अन् मी तेथून आल्याला इतके दिवस झाले ना ? भेटीसाठी हपापलेला माणूस मागेच आत्महत्या करता. निदान बोटभर चिठ्ठी तरी मला लिहिता ! मी खात्रीनं सांगतें, विश्रामचा खून केला. मुद्दाम कुणीतरी त्यांना अपघात करविला. अपघाताचा पुरावा तयार केला."

" तुम्ही नाही म्हणतां, पण भार्गवची बदली होतांच दुसऱ्या दिवशीं हा अपघात होतो."

" आशा–भार्गवची आता ताटातूट होणार, म्हणून हें सर्व त्यांनी कारस्थान रचलं. भार्गवची बदली झाली, तरी आशा बघा त्याच्या बदलीच्या गावीं जाऊन राहते कीं नाही ! "

" असेल ! असेल !! " बाजीरावांनी दीर्घ सुस्कारा सोडला. पित्याचें अंतःकरण द्रवलें, त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. " बरं हिनं कां जीव दिला, तें सांगा."

" विश्राम मेल्याचं ऐकतांच ती गंभीर झाली आणि हातांतल्या बांगडया उतरल्या, कपाळाचं कुंकू पुसलंन्, मंगळसूत्र तोडून माझ्या पुढं टाकल्या सगळ्या जिनसा, अन् 'माझं संपलं सौभाग्य' असं म्हणून ती धावत सुटली. विहिरींत तिनं उडी घेतली."

" काय ? हीं सगळीं सौभाग्य–चिन्हं तिनं हातांनी उतरलीन् अन् 'माझं सौभाग्य संपलं' म्हणाली अन् जीव दिलान् ? " बाजीरावांचे डोळे रागाने लाल झाले; अश्रु जागचे जागीं आटून डोळ्यांतून ज्वाला

" होय ! सांगितलं त्यांतलं एक अक्षरहि खोटं नाही."

" कारटा मेला, तें बरंच झालं म्हणायचं ! अन् ही मेली तेंहि बरंच झालं म्हणायचं."

" मेलेल्यांवर दया दाखविली पाहिजे, नाही ? मला ताईबद्दल वाटायचं, वाटलंहि खरं; पण विचार केला. तिनं तरी काय करायचं ? विश्रामनं तरी काय करायचं ? ज्याचं त्याचं यथास्थित नसलं ना म्हणजे माणसं नुसत्या आशेच्या मृगजलावर जगत असतात. जन्मभर ज्यांनी तटतटीत उपास काढले, जीं तडफडत मेलीं, त्यांच्याबद्दल आपण दया दाखविली पाहिजे; नाही ? "

" दया ! कींव !! क्षमा !!! दुराचारी माणसांना परमेश्वराच्या इथंसुद्धा दया मिळत नाही. ज्यांना दुखवलं त्यांच्याकडून तरी दया मिळणार नाही."

" ताईत आणि तुमच्यांत हेंच अंतर ! तिनं बिचारीनं सर्व सहन केलं ! ती असं कधीसुद्धा म्हणाली नाही की, दुराचारी माणसाला दया मागण्याचा अधिकार नाही. परमेश्वरालासुद्धा जें करतां येत नाही, असं तुम्ही म्हणतां, तें आमच्या ताईनं करून दाखविलन्. स्वतः सुटली अन् दुसऱ्याला सोडविलंन्."

" दुसऱ्याला सोडवलंन् ? "

" बायकोचं बंधन नको ! असं बघा, मला तुमच्या दोघांच्या मधल्या खडानूखडा गोष्टी माहीत आहेत. आता सगळंच नातं संपलं. कांही बोलायला हरकत नाही." नंदाचा आवाज जास्त जास्त रडवा आणि उंच होत गेला आणि शेवटीं ती खळखळून रडूं लागली.

" नंदाताई ! माझ्याकडे बघा ! कसा जरी असलों, तरी मी विश्रामचा

बाप होतों. तुमची त्याच्याशीं मैत्री होती. मलाहि आता दुसरं कोण आहे ? तुम्ही माझ्या इथं राह्यला चला. हिच्या हयातींत तुम्ही येत नव्हता का ? तशाच आताहि चला राह्यला."

"काय ?" नंदा जागेवर उठून उभी राहिली. तिच्या आवाजांत एकदम फरक पडला. ती रागाने म्हणाली, "काय म्हणतां ? मी अन् तुमच्या इथं राह्यला चलूं ? रावसाहेब, तुम्ही हें काय बोलतां ? एकुलता एक मुलगा मेल्याला दहा दिवसहि नाही झाले अन् तुम्हांला असला विषय माझ्याजवळ काढायला लाजहि कशी नाही वाटली ? छचोर-पणाला तरी कांही मर्यादा असते !"

"छे, छे: !" बाजीराव वरमून म्हणाले. "मी भलतं कसं बोलेन ? तुम्ही मला मुलीसारख्या ! विश्राम मेला, माझा वंशक्षय झाला. तुमचा मुलगा हाच काय तो विश्रामचा पाठीमागं राहिलेला वंशवेल. माझ्या इथं तुम्ही त्या मुलाला घेऊन रहा, असं म्हणालों मी. उगीच गैर-समज नका करून घेऊं !"

"कोण ? हा माझा मुलगा अन् तो विश्रामचा वंशवेल ? आय-आय ! काय हो किळसवाणं बोलतां ! असलं अभद्र बोलतांना तुमची जीभ झडून पडायला पाहिजे. गाव वाटेल तें बोललं, म्हणून तुमच्या-सारख्यांनी तरी कांही विचार करून बोलायला पाहिजे होतं. हा तर भार्गवांचाच मुलगा आहे; पण आशेच्या पोटींसुद्धा भार्गवचाच वंश वाढत आहे !"

"म्हणजे ? विश्रामचं कांहीच का नाही राह्यलं कांही पाठीमागं ?"

"आठवणीशिवाय विश्रामचं कांहीच राह्यलं नाही पाठीमागं ! ताईचंहि आठवणीशिवाय कांहीच मागं राह्यलं नाही. तम्ही आमचा

घात केलात."

"नंदाताई ! मी तुमचा कशाला घात करूं?"

"पैशाच्या लोभानं तुम्ही विश्रामचा बळी दिलात. विषयाच्या लोभानं आमच्या ताईचा बळी घेतलात. तुम्ही विश्रामचे वडील म्हणून मी ऐकून घेतलं. विश्रामला—माझ्या मानलेल्या भावाला—वाईट म्हटलेलं साफ खपायचं नाही. जा ! जा !! जा !!! तुम्ही इथून जा." असें म्हणतां म्हणतां ती हुंदके देऊन रडूं लागली.

बाजीराव वरमून बाहेर निघून गेले.

नंदा तान्ह्या मुलाला पोटाशीं घेऊन म्हणाली, "हाच माझा आता आधार ! तुझ्यासाठीच रे बाळा, जगायचं आता. बघ बरं ! तुझी आई किनई प्रेमासाठी भुकेली आहे. नाही ना मला कध्धी कध्धी अन्तर देणार?"

\+ + +

"आशा ! आता हें शोभत नाही. अजून दहा दिवस नाही झाले, तर तूं खुश्शाल भार्गवाच्या बदलीच्या गावीं जाऊन राहण्याचा हट्ट धरतेस ! आपल्या कुलाला, आमच्या अब्रूला शोभत नाही." राजेसाहेब आशेला एकीकडे घेऊन म्हणाले.

"मला आता कुलाची अब्रू संभाळून काय करायची? तुमच्या कुलाला शोभणार नाही, म्हणून माझ्या मास्तरचा खून करविलात, अन् मला विश्रामसारख्याच्या गळ्यांत बांधलीत ! मी आजवर तुमच्या कुलासाठी पुष्कळ पुष्कळ सहन केलं. आता मी मनाप्रमाणं वागणार?" आशा म्हणाली.

"आशा, तुझ्या हातून चूक होत आहे."

" माझ्या बाबतींत तुमच्या हातून इतक्या अनेक गंभीर घोड-चुकाच होत गेल्या आहेत की, मी ठरविलं शेवटीं की, आपणच मनासारखं वागून चुका सुधारल्या, तर त्या सुधारणार आहेत. अन् सुख लागणार आहे."

" अशा मार्गांनी तुला सुख लागेल, असं तुला वाटत असेल, तर तुझी सपशेल फसगत होत आहे."

" चांगल्या म्हणून तुम्ही ज्या ज्या गोष्टी केल्यात, त्यांपासून नेमकं दुःखच ओढवलं, तर आता वाटतं वाईट; गोष्टी तरी करून पहाव्यात! एकदा सरळ मार्गावरून गाडी घसरली, म्हणजे जसा तिला मार्ग सापडेल तसाच तिनं प्रवास केला पाहिजे. विजोड जोडपी जोडून टाकण्याच्या गंभीर चुका वडील मंडळी करतात, त्यांपैकीं एखादीच चूक माझ्या-सारखी अशी सुधारते."

" मग पाहिजे तर पुनर्विवाह कर. राजरोसपणें रहा. पुनर्विवाह करणार असशील, तर चांगला नवरा पाहीन."

" छेः, छेः ! आता पुनः तुमच्या पसंतीच्या माणसाशीं लग्न ? कालत्रयींहि करणार नाहीं. आम्ही दोघं जण पुनर्विवाहच करणार आहोंत. सुतक फिटण्याचीच वाट पहात आहोंत. पुनर्विवाह मला लवकरच केला पाहिजे. मला कांहीं दिवस गेले आहेत. मला भार्गवच्या मुलाची आई व्हायची हौस आहे."

राजेसाहेब कांहींहि न बोलतां दुसरीकडे निघून गेले.

× × ×

भार्गव व आशा यांचा, विश्राम वारल्याच्या चौदाव्या दिवशीं पुनर्विवाह झाला.

बाजीराव आशेला भेटायला म्हणून गेले. बाजीरावांना येतांना आशेने लांबून पाह्यलें होतें; पण ती वर्तमानपत्र वाचण्याचें सोंग करून बसली होती. ते आले व कोचावर बसले, तरी तिने त्यांच्याकडे पाह्यलें नाही. इतक्यांत भार्गव आंतून आला, बाजीरावांच्या जवळ जाऊन बसला. बाजीरावांनी 'आपण आशादेवींना भेटायला आलों आहोंत,' असें सांगितलें.

"आशा ! एकलंस ना ? हे तुला भेटायला आले आहेत." भार्गव आशेला म्हणाला.

"मी ऐकलं! त्यांना म्हणावं आता नातं संपलं. भेटायला यायचं कारणहि संपलं. तुम्हीच त्यांना सांगा तें." आशेने तोंडापुढचें वर्तमानपत्र हलविलें नाही, बाजीरावांच्याकडे वर नजर करूनहि पाहिलें नाही.

"मी अशाकरिता आलों आहे की, राजेसाहेबांनी विश्रामला शिकण्यासाठी आमचं इनामगाव गहाण लिहून घेऊन कर्ज दिलं होतं. तुमच्या लग्नाच्या वेळीं ठरलं होतं की, कर्ज माफ करायचं. लग्न होतांच कर्ज वळतंच झालं म्हणायचं; पण आता तें कर्ज माझ्याकडे मागताहेत राजेसाहेब. म्हणून रदबदली करायला आलों आहे."

"भार्गव, त्यांना एकदा सांगून टाका ना की, राजेसाहेबांनी गहाणाचं कर्ज मला देऊन टाकलं आहे. अन् मला कांही तें कर्ज सोडतां यायचं नाही. कर्ज फेडाल तर गाव कबजांत परत मिळतील, नाहीतर आम्ही कबजा सोडणार नाहीं." आशा म्हणाली.

"पण न्यायानं पहा. माझा मुलगा गमावला अन् पैसाहि गमावला. याचा विचार करा." बाजीराव काकुळतीने म्हणाले.

"भार्गव, यांना जायला सांग. आपल्या घरांत ही रडारड नको

आहे. मला त्रास होतो या गोष्टीपासून, हें तुम्हांपैकी कुणालाच कसं कळत नाही ? त्यांना एक म्हातारे म्हणतील, चळले म्हणून म्हणतील; पण भार्गव, तुला नको का समजायला ? " आशा जागेवरून उठली.

" मग मी पुन: एखाद्या वेळीं येईन. " बाजीराव म्हणाले.

" माफ करा ! भार्गव, पुन: त्यांना येऊं नका म्हणून सांग. " असें म्हणून ती गेली. तिने दार जोराने आपटलें.

बाजीराव आल्या वाटेने परत फिरले.

× × ×

आशा–भार्गव यांच्या पुनर्विवाहाची बातमी नंदाला कळतांच तेला रडूंच कोसळलें.

" आजवर आशा होती उगीच की, आशेचा नाद कधीतरी फुटेल. आम्ही पुन: एकत्र नांदूं. पण आता आशा कायमची सवत होऊन राह्यली. बरं, चला. आमच्यांतलं बेबनावाचं अंतर इतक्या थराला जाऊन शेवटीं पोहोचलं ना ? ताईचे शब्द पदोपदीं आठवतात. नवराबायकोच्या स्वभावांत, स्वरूपांत, श्रीमंतींत, वयांत, आचारविचारांत अंतर असलं की, तीं दोघं सुखाला कायमचीं अंतरतात; तेंच खरं. अन् नवराबायकोच्यांत तिसरं घुसलं, म्हणजेहि तीं एकमेकांपासून दूर अंतरावर सरकतात, एकमेकांच्या संगतीला अंतरतात. "

समाप्त